


म. ग्रं. सं. ठाणें
विषय
क्र. ६६६
REFBK-0009871

# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे



REFBK-0009871

## भाग चौथा : सिद्दी जौहर–मोहीम

चित्रकार श्री. दलाल
मुद्रण आनंद
प्रकाशन राजहंस

मूल्य रु. तीन फक्त सर्वाधिकार स्वाधीन

प्रकाशक : ब. मो. पुरंदरे, राजहंस प्रकाशन, १५०० सदाशिव, पुणें २.
मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव, पुणें २.

विजयादशमी
२१ ऑक्टोबर १९५८

प्रिय वाचक,

'राजा शिवछत्रपति' या माझ्या सत्यकथनरूप शिवचरित्राचा हा चवथ भाग. यांत प्रतापगडच्या विजयानंतर महाराजांनी विजापुरी मुलखावर केलेलें तुफानी आक्रमण, मोंगल सरदार शाइस्तेखान व विजापुरी सरदार सिद्दी जौहर यांच्या प्रचंड मोहिमा, चाकणचा वेढा, पन्हाळ्याची कोंडी व बाजी प्रभूची अद्भुत स्वामिनिष्ठा असा कथाभाग आहे.

या सर्व घडामोडींचा हा कालखंड फक्त आठदहा महिन्यांचाच आहे (नोव्हेंबर १६५९ ते जुलै १६६०).

या माझ्या शिवचरित्राच्या एकूण स्वरूपाविषयी माझी भूमिका काय आहे ती मीं सविस्तरपणें पहिल्या भागाच्या प्रस्तावनेंत सांगितलीच आहे. अधिक कांही सांगण्यासारखें नाही.

बहूत काय लिहिणें? आमचें अगत्य असों द्यावें.

ब. मो. पुरंदरे

# अनुक्रमणिका



- जावळीच्या अरण्यांत ५
- पन्हाळगड १९
- टोपीकर इंग्रज ३७
- सलाबतखान सिद्दी जौहर ४५
- वेढा पडला ५२
- औरंगझेब ६२
- नवाब शाइस्तेखान ६७
- नेताजी आणि जिजाबाईसाहेब ७८
- किल्ले पन्हाळगड आणि चाकण ८८
- हेजीब ९९
- गजापूरची खिंड ११३
- विशाळगड १३४



महाराष्ट्राची महालक्ष्मी, कोल्हापूर

२४४०८
८६७ १२-२-५८


जय लक्ष्मी जय महन्मंगले उदो उदो अंबे ।
पावनखिंडित तुझा गाजला गोंधळ जगदंबे ॥




पन्हाळगड–दरवाजा

इथें तरळती गवाक्षांत ह्या, अनंत इच्छा शिवराजाच्या
ऐकूं याव्या नौबतभेरी नवयुवकांच्या दिग्विजयाच्या

पन्हाळगड–अंबरखाना



अनु. २४४८२
क्रमांक ८९६
वि. चरित्र
नों: दि: [illegible] ५९



# १. जावळीच्या अरण्यांत

e(७१

प्रतापगड चिंताक्रांत होता.

वैरीहि चिंतीत नाही तें मन चिंतीत असतें.

आणि मनांतहि येणार नाही तें अफजलखान चिंतीत होता.

शिवाजी महाराजांनी खानाच्या भेटीसाठी शामियान्यांत पाऊल टाकलें.

एका भयंकर प्रसंगाचा मजकूर लिहिण्याच्या तयारीने, यमसभेंत चित्रगुप्ताने लेखणी उचलली !

एक क्षण–दोन क्षण–पांच–सहा–दहा क्षण गेले !

–आणि शामियान्यांतून खानाची भयंकर किंकाळी उठली ![१] पृथ्वी शहारली ! एकदम भीषण आक्रोश उसळला ! खानाच्या त्या किंकाळीने चित्रगुप्तहि एकदम दचकला ! त्याच्या स्वतःच्याच हाताच्या धक्क्याने त्याचें लेखनपात्र खळ्ळ्कन् कलंडलें ! तांबडी तांबडी लाल शाई भूर्जपत्रावरून खळाळून वाहूं लागली !

–आणि जावळीच्या जंगलांत रक्ताचा लोंढा फुटला ! तोफेचा आवाज कानीं पडतांच, जंगलांत दडून बसलेल्या[२] मावळ्यांनी आणि तान्हाजी, कान्होजी, बाजी वगैरे सरदारांनी अफजलखानाच्या वीस हजार गाफील फौजेवर चहूंबाजूंनी अकस्मात् झडप घातली !

यमसभेंत हजारो घटका ‘ घुंईऽऽ ! घुंईऽऽ ’ करीत बुडूं लागल्या. अफजलखानाची घटका हेलकावे खात खात बुडाली !

पूर्वी अर्जुनाने खांडववन जाळलें तेव्हा जो भयंकर कल्लोळ उडाला,

त्यानंतर अरण्यांत उडालेला हा पहिलाच हाहा:कार ! महाभयंकर ! नेताजी पालकराने तर तुफान उठविलें होतें. हत्ती–घोडे वगैरे जनावरें बुजून बिथरलीं होतीं. झाडावर पाखरूं बसत नव्हतें. खानाच्या फौजेंत धीर उरलाच नव्हता. प्राण वांचवायची जो तो धडपड करीत होता. एक–दोन–तीन–चार तास उलटले. तरीहि मराठ्यांचें तांडव चाललेंच होतें. त्यांतून सुटका फक्त शरण येणारांना होती.

त्या भयंकर दंगलींतून कित्येकजण दाट जंगलांत घुसत होते. प्रतापराव मोरे आपल्याबरोबर तीन चार माणसें घेऊन झाडींत घुसला. त्याला त्या निबिड अरण्याची पुरेपूर माहिती होती. त्याच्याच सल्ल्यावरून खानाने ही आपली फौज त्या घनदाट वनांत आणली होती. तोच तर खानाचा एकमेव वाटाड्या होता ! तोच पळाला. चंद्रराव मोऱ्यांचा तो भाऊबंद होता. चंद्रराव मोऱ्यांच्या वधाचा सूड घेण्यासाठी तो अफजलखानास सामील होऊन, विजापुरापासून सारखा त्याला सल्ला-मसलत देत होता.[४]

फाजलखान, मुसेखान, हसनखान, याकूतखान, अंकुशखान वगैरे बडे सरदारहि भांबावले-भेदरले होते. फाजलखानाच्या पायावर जखमा झाल्या होत्या. सर्वांसच फटकारे बसले होते. फाजलखान म्हणजे अफजलखानाचा थोरला मुलगा. हे सारे लढत होते. पण मराठी भुतावळीपुढे त्यांचा टिकाव लागेना. धीर सुटला. एवढ्यांत फाजलखानाचे दोघेहि धाकटे भाऊ म्हणजे अफजलखानाचे धाकटे मुलगे मराठ्यांनी पकडले.[५]

अगदी प्रारंभीं मुसेखानाने अगदी सिकंदराचें अवसान आणलें होतें. तो मोठमोठ्याने आपल्या फौजेला लढण्यासाठी प्रोत्साहन देत होता. पळून जाणाऱ्यांना चिडून शिव्याशाप देत होता. त्यांचा धिक्कार करीत होता.[७] आता गनिमाची फौज माझ्या तलवारीने जमीनदोस्त

करतों म्हणून गर्जना करीत होता.[८] त्याने घोड्यावर स्वार होऊन मराठ्यांवर हल्ला चढवलाहि. त्याच्या मागोमाग हसनखान व इतर सरदार मराठ्यांवर चालून निघाले.[८] त्यांनी अत्यंत जोराची चढाई केली. पण हाय! नशीबच फिरलें होतें बिचाऱ्यांचें! मराठ्यांच्या पुढे कोणाचाहि क्षणभरसुद्धा टिकाव लागेना. मुसेखानाचा घोडाच ठार झाला.[९] याकूतखान तर तोंड फिरवून पळतच सुटला! वृक्षांच्या आणि मराठ्यांच्या कोंडींत सापडलेले हे बहादर जीव चिमटींत धरूनच लढत होते. कोण हाल त्यांचे! अंकुशखानाच्या पायांतलीं पायताणेंच निसटलीं![१०] मुसेखान आता पळून जायला फट शोधीत होता.

सारे रडकुंडीला आले. मरण नाही तर शरण, याशिवाय मार्गच उरला नाही. सूर्य मावळला. मराठ्यांची कत्तलबाजी चालूच होती. अखेर फाजलखान वगैरे खानांनी जीवाचा निर्धार करून दाट झाडीकडे एकदम धूम ठोकली अन् ते झाडींत घुसले. वाट नव्हतीच. पण अंग घुसेल तिकडे पळत सुटले. मुख्य कत्तलखान्यांतून तर निसटले. त्यांचें तकदीर केवळ शिकंदर! मोठ्या मुष्किलीने बचावले. आणि मग भयभीत नजरेने दाही दिशांस टकटका पाहात, त्या दाट झाडींतून फांद्या, पारंब्या, बुंधे ओलांडीत आणि एकमेकांना घाई करीत पळत सुटले. पळतां येतच नव्हतें. त्यांनी जीव मुठींत धरला होता. कोणत्या झाडाआडून सपकन् वार पडेल याचा नेम नव्हता. कोणत्या वृक्षावरून अंगावर धडाधड उड्या पडतील याचा अंदाज नव्हता. कुठे जात आहोंत हें त्यांचें त्यांनाहि समजत नव्हतें. हे शेर इतके विलक्षण घाबरले होते की, जरा कुठे पाचोळा वाजला की, खुदाचीच आठवण होत होती त्यांना! फाजलखानाने आपल्या अंगावरचे सरदारी कपडेच काढून टाकले.[९] अंकुशखान तर बिचारा अनवाणीच त्या काट्याकुट्यांतून चालला होता.[९] फाजलच्या पायाला जबर जखम झाली होती.

दाट झाडीमुळे या सरदारांची फारच दैना उडत होती. काट्याकुट्यांनी अंगावरचे सर्व कपडे ओरबाडून फाडले होते. जखमांतून रक्त गळत होतें. ठेचकाळत धडपडत चालावें लागत होतें. शरीरांत त्राण उरलें नव्हतें. घसे कोरडे पडले होते. दिशा समजत नव्हत्या. हळूहळू उजेड नाहीसा होत होता. सर्वजण श्रमांनीं व यातनांनीं होरपळत होते. फाजलखानाच्या दुःखाला तर सीमा नव्हती. बिचाऱ्याचा बाप गेला, सारी दौलत गेली, फौज बुडाली, सख्खे भाऊ कैद झाले[५] आणि आता या यातना.

एवढ्यांत दचकून एकदम फाजलखान थबकला. बाकीचेहि थांबले. ते जास्तच घाबरले. काय झालें ?

त्या किर्रर्र झाडींत एकदम समोर फाजलखानाला कांहीतरी दिसलें ! त्याने त्या झाडीकडे तलवारीने खूण केली. लांब अंतरावर झाडींत तीन चार मराठे त्याला अन् मग सर्वांनाच दिसले ! मराठे ! हरे....नव्हे ! –यह खुदा ! आता कुठें पळायचें ? इथेंहि हे दुष्मन आहेतच का ? त्यांच्या जिभा टाळ्याला चिकटल्या. चेहरे रडवे झाले. डोळे ताणताणून सारेजण त्या मराठ्यांकडे पाहात होते. त्या मराठ्यांचें मात्र यांच्याकडे लक्ष गेलेलें नव्हतें. रोखून पाहतां पाहतां फाजलखान एकदम अंगांत वारें संचारल्यासारखा उसळून त्या मराठ्यांच्या रोखाने धावत सुटला ! तो चिडून तलवार परजीत धावत निघाला ! म्हणजे नवलच ! एवढें अवसान कोठून आलें एकदम ? बाकीच्यांना उमजेना. मुसेखानहि विस्मित झाला. फाजलच्या मागोमाग बाकीचीं खानेंहि निघालीं. फाजलखान दात खाऊन पुटपुटत होता[११] :

" इसकू कत्ल ही कर डालना चाहिये ! "

तें मराठ्यांचें टोळकें स्पष्ट दिसूं लागलें. दिसलें. त्यांत प्रतापराव मोरे होता ! साऱ्याच खानांना आता अवसान चढलें. या प्रतापरावा-

मुळेच या गहन अरण्यांत आपण येऊन पडलों. याच्यामुळेच सर्वनाश झाला. यानेच अफजलखानाला बदसल्ला दिला. हाच बदमाष ! हाच हरामखोर ! कापा याला !

फाजलखान आणि इतर चौघे-पांचजण आपल्यावर चिडून, आपल्याला ठार करायला येत आहेत हें प्रतापराव मोऱ्याने पाहिलें. तो आधीच मरणाच्या भीतीने लपत छपत पळत होता. त्यांतच हें आकस्मिक संकट कोसळलेलें पाहून, तो जास्तच घाबरून भयाने लटलटूं लागला. सर्वांनी त्याला गाठलें.[१२] आपलें मरण समोर येऊन ठाकलेलें पाहतांच प्रतापराव मोरे पटापट मुजरे करीत केविलवाण्या शब्दांत विनवूं लागला की, दया करा ! मला मारूं नका ! मी पायां पडतों![१३]

फाजलखान वगैरे सर्वचजण प्रतापरावावर फार चिडले होते. पण, प्रतापरावाचा खूप राग आलेला असूनहि मुसेखान मात्र प्रतापरावाची गाठ पडतांच आनंदितच झाला ! तो इतरांना आवरूं लागला. शांत करूं लागला. प्रतापरावाला मारूं नका, असें इतरांना विनवूं लागला. पण फाजल, अंकुश, याकूत वगैरे चिडून म्हणाले,[१४]

" इसे क्यॅंव जिंदा छोडे ? इसीने ही जालसाजीसे खान वालाशान अफजलखान हजरतको इस घने जंगलमें आनेकी सलाह दी और ला फसाया । इसीके सबब हमारी बर्बादी हुई । इसीने ही इन मराठों की भडकी हुई आगमें हमारी कुर्बानी दी । इसकूं कत्ल ही कर डालना चाहिये । "

प्रतापराव काकुळतीने मुजरे करीत गयावया करीत होता. त्यांत मुसेखानच दूरदर्शी होता. तो हलक्या आवाजांत सर्वांस म्हणाला की, अरे बाबांनो, याने आपल्या सर्वस्वाची धूळधाण केली हें खरें आहे. पण आता जर याला तुम्हीं ठार केलेंत, तर आपल्याला वाईपर्यंत सुखरूप कोण पोहोचवील ? आपल्याला तर वाटहि सापडत नाही.

दिशाहि समजत नाहीत. या जंगलांतच आपल्याला काळोखांत मरावें लागेल ना ! आपल्या नशिबाने आपल्याला हा वाटाड्या अचानक मिळाला आहे. आता याला मारूं नका.

हें मुसेखानाचें म्हणणें आता मात्र सर्वांनाच पटलें. याला ठार मारून आपलाच आणखी घात करून घेत होतों, हें फाजलल्लाहि पटलें. आणि मग मुसेखान हलक्या व गोड शब्दांत प्रतापरावास म्हणाला,[१५]

" इस घने जंगलसे अब तुम ही जल्द बाहर वाईतक ले चलो। तुम तो हमारे भाई हो। हम तुम्हे कभी न भूलेंगे। जल्दी करो। "

मुसेखानाच्या तोंडून निघालेले ते शब्द ऐकून प्रतापरावाला किती हायसें वाटलें ! त्याने मोठ्या उत्साहाने कबूल केलें की, तुम्हांला वाईला तडख सुखरूप पावतें करतों.[१६]

सर्वांचाच जीव जंगलांतून निसटून बाहेर पडायला अगदी आसुसला होता. अजूनहि आपण मरणाच्या ओठांतच आहोंत, असें त्यांना वाटत होतें. तें खरेंच होतें. फाजलचा जीव वाईकडे ओढ घेत होता. कारण वाईतील सुभेदारवाड्यांत त्याच्या कुटुंबांतील बायकामाणसें होतीं. अफजलखानाने विजापुराहून येतांना आपला जनानाहि बरोबर आणला होता ![१७] शिवाजीची फौज वाईंत पोहोचायच्या आंत वाई गाठायची सर्वांना घाई होती. जर का शिवाजी किंवा शिवाजीचा एखादा नेताजी वाईंत जाऊन पोहोचला तर तेथे अफजलखानाने ठेवलेला खजिना, हत्ती, घोडे आणि जनानाहि शिवाजीच्या ताब्यांत जाईल ही भीति सर्वांना, विशेषतः फाजलखानाला बेचैन करीत होती. तो झपाझप पावलें टाकीत होता. प्रतापरावाच्या मागोमाग अंधारांतून ही यात्रा चालली होती. प्रतापरावाला वाटा माहीत होत्या. कोणासहि माहीत नसलेली एक आडवाट प्रतापरावाने पकडली.[१८]

अनुक्रम २४४८२ वि. ...
क्रमांक ...८९७... नों: दि: १२-२-...

## भाग चौथा

वेळूच्या बेटांतून, करवंदीच्या जाळ्यांतून, वोरीसावरीच्या फांद्या-फांद्यांतून ही मंडळी चालली होती. येथील झाड न् झाड महाराजांशीं निष्ठावंत होतें. या मंडळीस सहजासहजीं चालतां येत नव्हतें. अंधार वाढत होता. खाली वेलींच्या वेटोळ्यांत पाय अडकून ते पडत होते. काटेरी फांद्यांनी तर प्रत्येकाला ओरबाडून ओरबाडून रक्तबंबाळ केलें होतें. अंगावरील कपड्यांच्या चिंध्या लोंबूं लागल्या होत्या.[६] जंगली रातकिड्यांनी कर्कश सूर धरला होता. किर्रर्र र्र र्र र्र र्र ! डोळ्यांपुढे काजवे चमकत होते. पायांचे तुकडे पडायची वेळ आली होती. प्रत्येक अडथळ्यासरशी तें झाड अन् झुडूप त्यांना जाब विचारीत होतें, ‘काय ? याल पुन्हा आमच्या वाटेंत ? हें स्वराज्य आहे !’

आता अंधार फारच दाटला. पुढे येणाऱ्या त्या आडव्या फांद्या दिसेनाशा झाल्या. थडाथड त्यांच्या थपडा खाऊन, त्यांचा जीव हैराण झाला. आणि अजून वाई खूपच दूर होती. अजून पांच कोस जंगल तुडवायचें होतें ! अल्लाचें नांव घेत अन् शिवाजीला शिव्या देत, आदळत आपटत ते प्रतापरावाच्या मागोमाग चालले होते.[६] एकमेकांस ते घाई करीत होते. पहाटेच्या आंत वाईतून पसार झालें पाहिजे, नाहीतर मराठे फाडून काढतील ही भीति होती.

आणि असे भयंकर हाल सोशीत सोशीत ऐन मध्यरात्रीं ही मंडळी पसरणीचा डोंगर उतरूं लागली.[६] काळाकुट्ट अंधार. खडी उतरण. बिकट वाट. शत्रूची चाहूल भेडसावीत होतीच. भयाने डोळे मिटून घ्यावेसे ...., पण डोळे मिटले काय आणि उघडे ठेवले काय सारखेंच होतें. अंधारांत कांही दिसतच नव्हतें ! त्यांतल्या त्यांत एक फक्त सुख होतें. तें म्हणजे प्रतापराव मोऱ्याने ही अगदी वेगळीच, म्हणजे सहसा कोणालाहि ठाऊक नसणारी वाट धरली होती. त्यामुळे शिवाजी महाराजांचे मराठे वाटेंत भेटत नव्हते !

आणि अखेर एकदाचे ते उघड्या व सपाट मुलखांत आले. इतके विचारे भुकेने, तहानेने व जखमांच्या वेदनांनी कासावीस झाले होते की, केवळ जीव शिल्लक राहिला होता. पाय इतके बधिर झाले होते की, ठेच कोणत्या पायाला लागली आहे व जखम कोणत्या पायाला आहे, हेंहि समजेनासें झालें होतें! एकदम मरूं तर बरें, असें त्यांना वाटत होतें. पण मरवत नव्हतें म्हणून तर या साऱ्या यातना!

शक्य तेवढ्या जलदीने ही सर्व मंडळी वाईंत आली. वाईचे रहिवासी महाराजांना औक्ष चिंतीत अंधारांत जीव धरून बसले होते. प्रताप-गडाखाली काय झालें हें अद्याप वाईंत कांहीच समजलेलें नसावें. कारण खानाच्या वाड्यांत अगदी प्रसन्न शांतता होती.

हे सारे घायाळ, रक्ताळलेले हतभागी वीर धावत वाड्यावर आले. पहाऱ्यावरच्या लोकांनीं पाहिलें.

वाड्यांत एकदम गडबड उडाली. खान मेला हें समजतांच जनान्यांत आक्रांत उडाला. पण रडायला सवड नव्हती. फाजलखानाने ताबडतोब तेथल्या फौजेला पळण्याची तयारी तातडीने करण्याचा हुकूम केला. सबंध खजिना बरोबर घेणेंहि अशक्य होतें. नेतां येण्याइतका खजिना घेतला. हत्ती, पागा वगैरे सर्व घेणें अशक्यच होतें. कुऱ्हाडच कोसळली होती आणि पुढचा घाव चुकवावयाचा होता. फाजलची कूच करण्यासाठी घाई चालू होती.

फाजलने ताबडतोब हुकूम दिला. जनाना घोड्यावर घालून जीव घेऊन सारे दौडत सुटले. वाईच्या बाहेर त्यांचे घोडे पडतात न पडतात तोंच पसरणीच्या डोंगरावर कांही मशाली दिसल्या. मराठ्यांची फौज प्रतापगडाहून वाईकडे येत होती! फाजलने ती पाहिली!

पळत सुटले! जीव अन् अब्रू,—जी थोडी उरली होती ती—वांचविण्याकरिता! [१८]

या सगळ्या गडबडीने वाई खडबडून उठली. पसरणीचा घाट उतरून हजारो सैनिक खाली येत होते.

मशालवाले स्वार जवळ आले. काय प्रकार आहे हें वाईकरांस समजेना. खाड खाड टापा वाजवीत स्वार वाईत शिरले. मराठे! प्रत्यक्ष नेताजी पालकर सरनौबत आघाडीस होता.[१९]

खान मेल्याची खबर त्या अंधाऱ्या रात्रीं वाईत पसरली अन् एकदम आनंद उसळला. लोक उठून बाहेर आले. कृष्णाने नरकासुर मारला तसाच महाराजांनी खान मारला. दिवाळी आली! आनंद मावेना.[२०]

नेताजीने एकदम वाड्याला गराडा घातला. सारा खजाना, हत्ती, पागा व इतर मालमत्ता नेताजीस सापडली. एवढ्यांत फाजलखान वगैरे पसार झाल्याचें समजतांच नेताजीने एकदम घोड्यावर उडी टाकली. त्याची फौजहि निघाली. पाठलाग सुरू झाला.

फाजलखान खूप खूपच दूर गेला होता. जीवाच्या आशेने तो बेहाय दौडत होता. काय वाटेल तें झालें तरी चालेल, दौडतां दौडतां छाती फुटून मरण आलेलें परवडेल, पण मराठ्यांच्या कचाट्यांत सापडणें नको, म्हणून तो सारी ताकद एकवटून दौडत होता. जनाना अन् फौजहि दौडत होती.[१८]

नेताजी दौडत होता. पण फाजलच्या फौजेचा कांहीहि सुगावा लागत नव्हता. खूप वेगाने दौड मारली तरीहि माग लागेना. अखेर नेताजीस वाटलें की, आपणच रस्ता चुकलों, नाहींतर एव्हांना सापडावयास हवे होते. तो थांबला.

अखेर माघारी फिरण्याचा नेताजीने आपल्या फौजेस हुकूम दिला. सारे लगाम माघारी फिरले. नेताजी पुन्हा वाईकडे निघाला. फाजल-खानाचें किस्मत तालेवार म्हणूनच तो बचावला. जर नेताजीने नेट धरून आणखी चार कोस धाव घेतली असती, तर फाजलची धडगत

नव्हती. पण अंधारांत मराठ्यांना मफासला समजेना. नेताजी पुन्हा माघारी वाईकडे दौडत निघाला[२१] ( दि. ११ नोव्हेंबर १६५९ ची मोठी पहाट ).

खानाला मारलें आणिं त्याच दिवशीं ( दि. १० नोव्हेंबर १६५९ ) महाराजांनी लगेच पुढची एक सोंगटी चटकन् हलविली. दोरोजी नांवाच्या आपल्या एका शिताफीच्या समशेरबहाद्दराला कोकणांत राजापुरावर त्यांनी फौजेसह सोडलें. कारण महाराजांना आधीच एक बातमी मिळाली होती की, राजापूरच्या बंदरांत अफजलखानाच्या मालकीचीं कांही जहाजें मालाने भरून उभीं आहेत ![२२] तीं जहाजें कबजांत घेण्याकरिता महाराजांनी प्रतापगडावरून ताबडतोब हा फासा फेकला.

महाराजांच्या डोक्यांत राजकारणाचा पट मांडून तयार होता. ते सोंगट्या हलवीत होते. मध्यरात्र उलटली. अन् महाराज स्वतःच निघाले. पांच हजार स्वारांना इषारा झाला. एका लढाईचा शीण जायच्या आंतच,—नव्हे, शीण यायच्या आंतच दुसऱ्या मोहिमेवर महाराज निघाले.

मध्यरात्रीं फाजलखानाच्या तारांबळीने वाई दचकून उठली होती. पण आता उषःकाल झाला. पूर्वा तांबडा लाल शालू नेसून हसत हसत सह्याद्रीच्या पायऱ्या चढूं लागली. तिच्या विशाल भालप्रदेशा-वर शुक्र—चांदणी चमचम करीत होती. वाईंत घराघरांपुढे सडे पडले होते. रांगोळ्या अन् गोपद्में उमटलीं होतीं. वृंदावनांतल्या तुळशी डोलत होत्या. पक्ष्यांनाहि आनंद झाला होता. कृष्णाबाईच्या तीरावरील वृक्षराजी त्यांच्या किलबिलीने गजबजली होती. वारा मंद अन् प्रसन्न वाहत होता. कृष्णेच्या घाटावर स्नानसंध्येकरिता गर्दी उडाली होती. ग्रहण सुटलें ! आता स्नान ! लंगोटीवालीं पोरें दणादण उड्या फेकून डुंबत होतीं. युवती कमरेवर घागरी घेऊन ओचे सावरीत घाटाच्या पायऱ्या उतरत होत्या. त्यांच्या हातांतलीं काकणें किणकिणत होतीं. वेणींत

सोन्याच्या मुदी गुंफून खोपा घातलेल्या प्रसन्न प्रौढा खांद्यावर धुण्याचे पिळे टाकून आपल्या घागरी जलप्रवाहांत बुडवीत होत्या. 'घुड घुड घुड घुड ! पोट भरलें ! पोट भरलें !' असेंच जणू त्या घागरीहि म्हणत होत्या. जो तो मुखीं शिवस्तोत्र गात होता.[१३] वाईच्या घाटावर नेहमीच दिसणारें हें प्रसन्न दृश्य खूप दिवसांनंतर आज पुन्हा दिसंत होतें.

प्रभा उजळली, किरणांचे झोत क्षितिजावर चढले. उषा किरणांआड दडली. आणि आपल्या तेजाचा सुवर्णध्वज फडकवीत तो प्रतापवंत सूर्यनारायण हसत हसत पूर्वेस वर आला.

—आणि कोणाला कल्पनाहि नव्हती. वाईच्या पश्चिमेकडून घोड्यांच्या टापांचा फार मोठा खडखडाट ऐकूं येऊं लागला. शिंगांचे आवाज उठले. धूसर धुरळा आकाशांत चढला. सारी वाई हातचीं कामें टाकून धावली. आनंदांत आनंद मिसळला. महाराज आले ! महाराज पांच हजार स्वारांची हुजरात पाठीशीं घेऊन आले. लोक आसुसल्या डोळ्यांनी तिकडे पाहात राहिले. राजा आला.

वाईच्या बुरुजबंद पश्चिम वेशींतून घोडेस्वार छाती काढून मोठ्या दिमाखांत दौडत दौडत आंत प्रवेशले. त्यांच्या मुखांवर आनंद अन् उत्साह ओसंडत होता. झेंडा वाऱ्यावर फडफडत होता. शिंगांच्या ललकारींनीं वाई भारावली. अन् झेंड्याच्या मागोमागच महाराज वेशींतून आंत प्रवेशले. त्यांचा पांढराशुभ्र घोडा रुबाबांत धावत होता.

एवढ्यांत फाजलखानाच्या पाठलागावर गेलेला नेताजी फौजेसह माघारीं वाईंत दाखल झाला.[२१] आनंदाची आणखी एक सागरलाट नाचत आली. हर हर महादेवाच्या गर्जनेने आकाश भरून गेलें.

महाराजास मुजरा घालीत घालीत नेताजी पुढे झाला. त्याचें मराठी लष्करहि मुजरे घालीत आलें.

काल खानाच्या वधानंतर नेताजीने अचाट पराक्रम करून विजापुरी

फौजेची दाणादाण उडविली होती. महाराजांस हें कळलें होतें. महाराजांनी शाबासकी देऊन नेताजीच्या अन् त्याच्या शूर सैनिकांच्या फुरफुरत्या उत्साहाच्या मशालींवर जणू तेलाचा शिपकावा दिला. त्या मशाली उत्साहाने अधिकच चेतल्या.

महाराज प्रतापगडाहून निघाले ते डोक्यांत खूप खूप नवे डाव योजूनच. पराभवाने दाणादाण झालेल्या, सैरावैरा पळत सुटलेल्या व घाबरलेल्या शत्रूवर इतक्या त्वरेने, इतकी जोराची चाल करायची की, आपला विक्राळ आवेश पाहूनच शत्रु मरगळला पाहिजे. सिंहाने झाडाखाली त्वेषाने आरोळी मारतांच झाडावरचीं माकडें कशीं पटापट आपोआप कोलमडून पडतात—बस्स्, तेंच करायचें! शत्रूला अंग सावरायलाहि सवड द्यायची नाही. एकदम चढाई! एकदम झडप! आता घटकेचीच काय, क्षणाचीहि अवास्तव विश्रांति घ्यायची नाही. आदिलशाहीला काल भगदाड पडलें आहे. यांतच काय तें साधून घ्यायचें असें महाराजांनीं ठरविलें.

महाराजांनीं स्वतः सातारा प्रांतांत घुसून थेट कोल्हापूर गाठायचें ठरविलें. आता कोणांत ताकद नव्हती आडवा हात घालून त्यांना रोखायची. आपण पन्हाळगडापर्यंतचा सारा मुलुख स्वराज्यांत दाखल करायचा अन् नेताजी पालकरने जें उठायचें तें थेट विजापूरपर्यंत लुटालूट करीत सारा शाही मुलूख ताख्तताराज करून टाकायचा! ठरलें! (दि. ११ नोव्हें. १६५९.)

तावडतोब सारे उठले. इशाऱ्याचें शिंग फुंकलें गेलें. कूचाची नौबत झडली. नेताजीची अन् महाराजांची फौज घोड्यावर चढली. महाराजांनी एका तुकडीला, वाईपासून पांच कोसांवर असलेले, चंदनगड व वंदनगड हे जुळे किल्ले काबीज करण्याचा हुकूम दिला.[२३]

नेताजीने व त्याच्या फौजेने निघण्यापूर्वी महाराजांस मुजरे केले.

जय भवानी ! महाराजांनी निरोप दिला.

हर हर महादेवाचा प्रचंड पडसाद देऊन नेताजीच्या फौजेने टाच मारली. महाराजांच्या समशेरीचें टोक विजापुराकडे टवकारलेलें होतें. चंदन-वंदनकडेहि स्वार दौडले.[२३] महाराज लगेच स्वतःहि निघाले. फौज इशारतीची वाटच पाहात होती. घोडे फुरफुरत जमीन टापांनीं उकरीत होते.

सूर्याच्या तळपत्या तेजांत भाले झेलले गेले. महाराजांचा घोडा ताड ताड झेप टाकीत चौखूर निघाला. त्यांच्या मागोमाग शिवगंगा !

प्रतापगडाहून निघण्यापूर्वीच महाराजांनी दोरोजी नांवाच्या आपल्या मराठा सरदारास कोकणांतील आदिलशाही मुलखावर चालून जाऊन तुफान तांडव करण्याचा हुकूम केला होता. तोहि तसाच आदिलशाही कोकणांत घुसला.[२२] त्याचें तर जमिनीवरील घोडदौडीने समाधान होईना. त्याने समुद्रावरहि पालाण घातलें. सारी कोकणचीं शाही ठाणीं थरकांपूं लागलीं.

महाराज, नेताजी आणि दोरोजी हे तिघेहि तीन वाटांनी आदिल-शाहींत घुसले. दशदर दुष्मनाची दाली तोडण्याकरिता मुस्तकीम चढाई ! पाहूंच कोण करतो त्यांची हिफाजत ! आता ही चढाई रोखायची ताकद कोणांनाहि नव्हती. शिवशाहीचा हा त्रिशूळ आदिल-शाहीवर सुटला होता.

महाराजांच्या व मराठी शिलेदारांच्या घोड्यांच्या टापा पुढे पुढे धावत होत्या. त्यांच्या प्रत्येक टापेगणिक प्रत्येक क्षणाला महाराष्ट्राची भूमि स्वतंत्र होत होती. उषःकालानंतर सूर्याचीं किरणें जशी अंधाराचा पाठलाग करीत सर सर धावतात तसेच महाराजांचे हजारो घोडे पारतंत्र्याचा पाठलाग करीत दौडत होते. कृष्णा ओलांडली. वेणा ओलांडली. वसना ओलांडली. उर्मिला ओलांडली. आता महाराज

धावत होतें. कृष्णा-कोयनांच्या संगमाकडे. या नद्यांच्या दरम्यानचा प्रदेश स्वतंत्र झाला होता. यादवांच्या आणि शिलाहारांच्या विनाशा-नंतर साडेतीन शतकांनी दक्षिण महाराष्ट्राच्या नद्यांचें पाणी स्वतंत्र होत होतें. महाराज आणि स्वातंत्र्याचे शिलेदार ओंजळीओंजळींनी तें गोड अमृत पीत होते. त्या महाराष्ट्रमातांना केवढा आनंद होत होता म्हणून सांगू! खूप खूप दिवसानंतर, खूप खूप व्रतवैकल्यें, उपासतापास आणिं आराधना केल्यानंतर एखाद्या स्त्रीला पुत्र व्हावा; अन् मग त्याने केलेल्या पहिल्या स्तनपानाने तिला जशा गोड संवेदना व्हाव्यात, तिचें अंग रोमांचित व्हावें आणि तृप्त आनंदाचे अश्रु तिच्या गालावर घरंगळावे—अगदी तसाच आनंद शिववाने मुखीं ओंजळ लावल्यावर त्या महाराष्ट्रगंगांना होत होता.

* * *

---

**आधारः**—(१) शिचप्र पृ. ५७. (२) पोवाडा पृ. १४. (३) पोवाडा पृ. २१; जेधे शका, करीणा, शिभा अध्याय २२. (४) शिभा १८।८ ते १२. (५) शिभा २२।५३. (६) शिभा २३।२४ ते ३५. (७) शिभा २२।१५ ते १९. (८) शिभा २२।१९ ते २५. (९) शिभा २२।४१ ते ४४. (१०) शिभा २२।४३. (११) शिभा २३।३६. (१२) शिभा २३।३६. (१३) शिभा २३।३९ ते ४०. (१४) शिभा २३।३७ ते ३८. (१५) शिभा २३।४१ व ४२. (१६) शिभा २३।४३ व ४४. (१७) शिभा २३।४५ व ४६. (१८) शिभा २३।२३, ४५ व ४६. (१९) शिभा २३।२० व २२. (२०) शिभा २३।५०. (२१) शिभा २३।४७ व २२. (२२) पसासंले ८०० ते ८०५.



## २. पन्हाळगड

अफजलखान व शिवाजीमहाराज यांच्या मुलाखतीकडे स्वराज्याचें लक्ष लागून राहिलें होतें. सारें स्वराज्य चिंतातुर झालें होतें. पण त्या चिंतेंत चीडहि भरलेली होती. स्वराज्याचे शत्रु मात्र अत्यंत आतुरतेने प्रताप-गडाच्या बातमीकडे डोळे लावून बसले होते. त्यांच्या उत्सुकतेंत आनंद दाटलेला होता. खुद्द बादशाह आदिलशाह आणि बडी साहेबा अत्यंत रम्य स्वप्नें रंगवीत आतुर नजरेने बातमीच्या सांडणीस्वाराची वाट पाहात होती.मुलाखतीच्या दिवशीं विजापुरांत उत्सुकता बेडकीसारखी फुगत होती. दुपार झाली, आता खान शिवाजीला भेटायला गेला असेल, कदाचित् शिवाजी कैदहि झाला असेल, कदाचित् ठारहि झाला असेल! रात्र झाली, तेव्हा आता खान शिवाजीला जिवंत कैद करून किंवा त्याचें मुंडकें तबकांत घालून विजापुराकडे निघाला असेल!...घडीघडीला अशीं स्वप्नें रंगत होतीं. उत्सुकतेची बेडकी तर्रर्र फुगत होती! सारखी फुगतच चालली होती! बादशाह आणि बडी साहेबीण बातमीची वाट पाहात तळमळत होते.

एवढ्यात विजापुरांत बातमी दौडत आली! बातमी आली? काय? शिवाजीचें काय झालें?

बेडकी फुगली, फुगली, फुगली आणि...फाडकन् फुटली! खान मेला! शिवाजीने खानाचें पोट फाडून खानाला ठार मारलें! खानाच्या फौजेचा फडशा उडाला! सारी दौलत लुटली गेली! या बातम्या विजापुरांत फुटल्या आणि पसरल्या.

बादशाहाच्या उरावर पर्वतच कोसळला ! बेगमेने पलंगावर धाडकन् अंग टाकलें ! आक्रांत उडाला. बेगमेने शोक मांडला. तिला हें दु:ख सहनच होईना.

" या अल्ला ! या खुदा ! या सुलतान पीर पैगंबर परवरदिगार ! रहमानुर्रहीम ! यह तुमने क्या किया ! मेरा लाल मारा गया ! अब मैं क्या करूं ? तुम्हारी नाराजगीहीसे आदिलशाही सल्तनत आज खाकमें मिल गई ! अब यह हरामखोर सीवाजी दारूस्सल्तनत बीजापूरपरभी चढ आयेगा ! यह खुदा ! " [१]

ती आक्रोश करूं लागली. तिच्या दु:खाला हद्द राहिली नाही.

खुद्द बादशाह अली आदिलशहाच्या डोक्यावर पेश्मानीचें अस्मान फाटलें. शिवाजीचें मुंडकें भर दरबारांत पाहायला मिळेल हें त्याचें स्वप्न होतें. पण झालें साफ उलटें ! अफजलखानाचें मुंडकेंदेखील परत आलें नाहीं ! एवढा तोलदार सरदार हकनाक बुडाला. लाखो रुपयांची दौलत बरबाद झाली. आदिलशाही शुजाअत नामोहरम झाली. एका डोंगरी उंदराने ढाण्या वाघ मारला ! हाय ! हाय !

एकदम साऱ्या शहरांत खळबळ गोंधळ अन् रडारड सुरू झाली दु:खांत शहर बुडालें !

वजीरे आझम इख्लासखान याने शाही नगारखान्यास नौबत बंद करण्याचा हुकूम फर्मावला.

नौबत बंद झाली. नौबतवाले नौबत पालथी घालून अन् माना खाली घालून उभे राहिले.[२]

बेगमेने अन्नपाणी वर्ज्य केलें.[३] बादशाहाने दरबार बंद केला. तख्तावर चादर पांघरली. केवळ शाही हवेल्यांतच नव्हे तर सबंध शहरभर सुतकी हवा पसरली. घरोघर बिब्या अन् बेगमा रडत होत्या. महाराजांच्या नांवाने शिव्यांची बरसात बरसत होती.

फाजलखान, मुसेखान, अंकुशखान वगैरे मंडळी जनान्यासह विजापुरापाशी येऊन पोहोचली.[४] सर्वजण गलितगात्र झाले होते. हालांनी हैराण झाले होते.

शहरांत दुःखाचा नवा उमाळा आला. सर्वांच्या माना खाली वाकल्या होत्या. लोकहि दुःखी मुद्रेने पाहात होते. फाजलखानास सर्वांत जास्त दुःख होत होतें. अपमान, बेअब्रू, हाल अन् नुकसानी! त्याची मान वर होईना. पायाला जखमा झाल्या होत्या. त्यावर बांधलेल्या चिंध्या लोंबत होत्या. अनेकांच्या कपड्यांचीं फाटून लक्तरें झालीं होतीं. चेहरे भकास झाले होते. आदिलशाहीच्या अलीशान इभ्रतीची स्मशानयात्रा संपवूनच जणू ते परत आले होते.

मोठ्या दुःखाने फाजलखान बादशाहास भेटावयास गेला.[५]

तीन दिवस लोटले आणि शहरांत पुन्हा भयंकर खळबळ उडवून टाकणारी बातमी येऊन पोहोचली. शिवाजीची फौज कोल्हापुराकडे दौडत सुटली आहे! वाटेंतील सर्व मुलुख जिंकून घेण्याचा तिने तडाखा लावला आहे! लौकरच फौजा घेऊन तो कोल्हापुरांत घुसेल! एका मागोमाग एक अशा बातम्या बादशाहाला सादर होऊं लागल्या. त्याची छातीच दडपली गेली. शिवाजी कोल्हापुरावर निघाला! म्हणजे मग त्याचा हल्ला पन्हाळगडावर खासच होणार![६] आता या तुफानाला आवरायचें कसें? वाईपासून कऱ्हाडपर्यंतचा मुलुख शिवाजीच्या कबजांत गेला, हें ऐकून दरबारचें धाबेंच दणाणलें.

—सारी दुनिया अजून प्रतापगडाकडे नजर लावून बसली होती. अफजलखानाच्या पंजांतून शिवाजी बचावत नाही, अशी प्रत्येकाची खात्री होती. इंग्रज, डच, फ्रेंच, पोर्चुगीज, कुतुबशाह, औरंगजेब, जंजिऱ्याचा सिद्दी आणि या सर्वांचे किल्लेदार, ठाणेदार, सुभेदार, अमीन वगैरे सर्वजण यामुळे खुषींत होते. गाफील होते.

परंतु प्रत्यक्ष झालें वेगळेंच! अद्याप खानाच्या साफ बर्बादीची मुस्तकीम खबर कोणालाच कळलेली नव्हती. प्रतापगडाच्या अगदी जवळच्या मुलखांत फक्त पोहोचली होती.

महाराज वाईहून निघाले. वादळी चढाई करीत झपाट्याने ते मुलुख जिंकीत चालले होते. शिवाजी आपल्यावर चालून येईल हें कोणाला स्वप्नांतहि खरें वाटत नव्हतें.

एक ठाणें जिंकायचें, झटपट त्याचा बंदोबस्त करायचा, चार घटका विश्रांति घ्यायची, कूचाची आरोळी झाली की, उठलीच सारी फौज. अशी लगबग करीत महाराज चालले होते. मराठ्यांच्या घोड्यांना वसतां येत नव्हतें! खटावानंतर मायणीवर छापा घातला. मायणी घेतली. लगेच रामपूर. तेथून कलेढोण, वाळवें आणि अष्टी घेतली. मागच्या ठाण्यावर काढलेले बंदुकीचे बार हवेंत विरायच्या आंत पुढच्या ठाण्यावर झडप पडत होती. अष्टें—वडगांव—वेळापूर—औदुंबर—मसूर कऱ्हाडपर्यंतचा प्रदेश घेतला.[७] कऱ्हाडची उत्तरालक्ष्मी प्रसन्न झाली. स्वराज्यांत आली.

नेताजी, तान्हाजी, कान्होजी वगैरेंच्या पराक्रमांची अन् विजापुरी फौजेच्या फजितीची गंमत सांगायला कृष्णाबाई वाईहून लगबगीने आली होती. खान कसा मेला हें सांगायला जावळीहून कोयनाबाई आली होती. दोघी एकमेकींना मिठ्या मारून महाराजांचें यश गात होत्या. पण दोघींच्या आधी महाराज कऱ्हाडला दाखल झाले होते.

तेथून महाराजांनीं सुपें गाठलें. तांबें, पाली, नेरलें, कामेरी, विसापूर, सावें, उरण, कोळें हा सबंध मुलुख घेतला. खानाच्या वधानंतर अवघ्या तेरा दिवसांत![७] गरुडाची भरारी, सागराची लाट आणि महाराजांची दौड सारखीच! कोण अडविणार!

—आणि महाराज मार्गशीर्ष वद्य ६ रोजीं ( दि. २५ नोव्हेंबर

१६५९) कोल्हापुरांत घुसले. कोल्हापूर जिंकलें! महाराजांची नजर पन्हाळ्याकडे गेली. तेथून अवघा पांच कोस पन्हाळगड! पन्हाळगड! एक अभेद्य किल्ला! प्राचीन किल्ला! महाराष्ट्राच्या वैभवकाळीं राजा शिलाहार गंडरादित्याच्या राजधानीचा प्रचंड किल्ला!

महाराजांच्या समशेरीचें टोक पन्हाळ्याच्या छाताडाकडे रोखलें गेलें. मराठी फौज तिकडे दौडत निघाली.

कोल्हापुरांत शिवाजी घुसला ही खबर ऐकतांच दचकून आदिलशाहाने छातीवर हात ठेवला. दरबारची छाती धडधडूं लागली. आता काय करायचें तरी काय?

शिवाजीचा सरनौबत नेताजी पालकर याने गदग, तिकोटे, हुकेरी, गोकाक हीं ठाणीं लुटलीं! लक्ष्मेश्वर लुटीत आहे, आता विजापुरांत घुसणार, अशा वातम्या विजापुरांत येऊन थडकल्या!

लगेच नवी वातमी आली की, शिवाजीने पन्हाळ्याला वेढा घातला![१०]

—धुळीचे लोट उसळले. महाराज आपल्या फौजेसह पन्हाळ्याच्या पायथ्याशीं थडकले. महाराजांनी भराभर हुकूम फर्मावले. एका घटकेंत गडाला मराठी मोर्चे लागले.

गडावर धावपळ उडाली. हा आला तरी कोण? कोठून? कधी? कसा? किल्लेदाराचे पाय लटपटले. मराठे गडाला विलगले. गुळाच्या ढेपीला जशा मुंग्या. गडावर अगदीच तयारी नव्हती. शिवाजीचाच वेढा पडला असल्याचें किल्लेदाराला समजलें. तो आश्चर्याने गडबडला. घाबरला. शिवाजी? मग आपल्या खानसाहेबांचें काय झालें?—ते वारले!

पन्हाळगडाची त्रेधा उडाली. किल्लेदाराने भराभरा तोफा चढवल्या. डागल्या. मारा सुरू केला. आस्मान धुराने भरून गेलें. मराठे तरीहि वर वर सरकत होतेच. खालूनहि बंदुकांचा मारा चालू होता. गडाचा

घेर केवढा अफाट! एका बाजूस रोखावयास धावावें तर दुसऱ्या बाजूने मराठे तुरुतुरु वर चढत. किल्लेदार भांबावून डायाडोल झाला.

—नेताजी पालकर लक्ष्मेश्वरपर्यंतची प्रचंड लूट घेऊन कोल्हापुराकडे पसार झाल्याचें दरबारला कळलें.

नेताजी सारी लूट घेऊन कोल्हापुरांत दाखल झाला. त्याने गेल्या चौदा दिवसांत आदिलशाही मुलुख अक्षरशः नागडा करून टाकला.

पन्हाळ्याच्या वेढ्याची दुसरी रात्र उगवली. किल्ल्याचा जीव गळ्याशीं आला. गडावरून सुटणारे तोफांचे गोळे अंधारांत तुटणाऱ्या ताऱ्यांप्रमाणे दिसत होते. मराठे गडाच्या गळ्याशीं भिडूं पाहात होते. हीं वानरें अंधारांत किती पुढे सरकलीं हें समजत नव्हतें.

मराठे तटाच्या टप्प्यांत आले. तटावरून मशाली घेऊन धावपळ करणाऱ्या गनिमी हशमांस गोळ्यांनी व तिरंदाजीने अचूक टिपून घेण्याचा मराठ्यांनी सपाटा लावला. तोफा बंद पडल्या. मेहताबा विझल्या. मराठे तटाला भिडले. माळा करून भराभर तटावर चढले. भयंकर कापाकाप सुरू झाली. आंतून दरवाजा उघडला गेला. मराठी फौजेचा लोंढा गडांत घुसला. मशालींचा पाठलाग सुरू झाला. आवाजाने कानांचे पडदे फाटले. गनिमाचे असंख्य लोक ठार झाले. राहिलेल्यांचा धीर पार पार सुटला. हत्यारें टाकून ते शरण आले. गड काबीज झाला![८] शिंगें—नौबती वाजूं लागल्या. दरवाजावर भगवाझेंडा फडफडूं लागला. महाराज पायथ्यास होते. त्यांस विजयाची वातमी सांगण्यासाठी मशाल गेली. ते गडावर लगेच आले. मशालींच्या नाचऱ्या उजेडांत, गर्जत गर्जत मराठ्यांनी महाराजांचें स्वागत केलें (दि. २८ नोव्हेंबर १६५९). यावेळीं मध्यरात्र उलटलेली होती.[८]

महाराज खूष झाले. सबंध रात्रभर जागून महाराजांनी त्या अप्रतिम गडाची पाहाणी केली.[८]

नेताजीहि गडावर येऊन दाखल झाला.[२४]

चढती शीग होती पराक्रमाची, उत्साहाची, धाडसाची, विजयाची !

अफजलखानाला मारल्यापासून अवघ्या अठरा दिवसांत वाईपासून पन्हाळ्यापर्यंतचा पट्टा हस्तगत झाला. वसंतगड, वर्धनगड, कऱ्हाडचा कोट, मच्छिंद्रगड अन् कल्याणगडासारखे अवघड गड फत्ते झाले.

बापाच्या वधामुळे फाजलखानाची आंतल्या आंत संतापाने लाही होत होती. खरोखरच जर महाराज त्याच्या तावडींत सापडले असते, तर त्याने त्यांचें काय केलें असतें कोण जाणे ! सूड घेण्याकरिता तो तळमळत होता. शिवाजीचा नाश व्हावा अन् तो आपल्याच हातून

*चढती शीग होती धाडसाची आणि विजयाची...*



व्हावा हें त्याचें अन् प्रत्येकाचेंच आवडतें मनोराज्य होतें. पण—?

आता फाजलखानाच्या जोडीला समदुःखी सरदार मिळाला! त्याचें नांव रुस्तुमेजमान. महाराजांनीं कोल्हापूर घेतलें. पन्हाळा घेतला, नेताजीने रायबागवर छापा घातला, या बातम्या विजापुरांत आल्यावर फारच खळबळ उडाली. रुस्तुमेजमानची उलघाल झाली. कारण त्याच्या जहागिरीच्या मुलखांतच महाराज शिरले होते.

रायबाग, कोल्हापूर, राजापूर व कारवार ह्या मुलखाची जहागीर त्याची होती. पन्हाळा गेला हें कळाल्यावर त्याची झोप उडाली. फाजलखानाला रडायला, चिडायला अन् लढायला दोस्त मिळाला. दोघांनीहि बादशाहापाशी तातडीने जाऊन मागणी केली की, शिवाजीवर ताबडतोब आम्हांला रवाना करा! बादशाहानेहि ताबडतोब हे दोन पेटलेले बाण महाराजांवर सोडले.[९]

विजापुराहून रुस्तुम आणि फाजल दहा हजार फौज, हत्ती, तोफा, उंट वगैरे सारा थाट घेऊन निघाले. मलिक इतबार, सादातखान, फत्तेखान, मुल्ला हय, घोरपडे, सर्जेराव घाटगे वगैरे सरदार त्यांत होते. मोठ्या रागावेगांत निघाले होते, पण प्रत्येकाला आंतून भीति वाटत होती.

प्रतापगडच्या पायथ्याशीं नुकतीच जी अफजलखानाची दाणादाण उडाली, तिचा हवका प्रत्येक हशमाला बसला होता. बावीस हजार फौजेची आणि अफजलखानासारख्या पोलादी सरदाराची अवघ्या पांच सहा तासांत चटणी वांटून टाकणाऱ्या शिवाजीबद्दल आणि त्याच्या साथीदारांबद्दल त्यांच्या मनांत कांही चमत्कारिकच कल्पना होऊन बसल्या होत्या. हीं माणसें नव्हेत! भुतें असलीं पाहिजेत![११] विजापूर दरबारांतील एक महशूर शायर मुहम्मद नुस्रती याने तर लिहूनच टाकलें की, शिवाजी हा दिसतो माणसासारखा, पण आहे मात्र भूत![११]

—आणि आता तर त्या शिवाजीशींच गाठ ! म्हणजे मरणच ! विजापूरची ही फाजलखानी फौज लढाईच्या आधीच निम्मी पराभूत झाली होती ! आपला टिकाव लागणें शक्य नाही, असें त्यांचें मन त्यांना सांगत होतें ! केवढा हा जबरदस्त आत्मविश्वास ! असें हें दहा हजार लष्कर घेऊन रुस्तुमेजमान आणि फाजलखान विजापुराहून निघाले.

हा रुस्तुमेजमान म्हणजे, शहाजीराजांवर मनःपूर्वक प्रेम करणाऱ्या प्रख्यात रणदुल्लाखानाचा पुत्र होता आणि हा फाजलखान कोण होता हें सांगण्याची जरुरी नाहीं !

महाराजांच्या हेरांनीं पन्हाळगडावर खबर आणली. महाराजांनीं रायबागेकडे गेलेली आपली फौज ताबडतोब माघारीं बोलावली. गोदाजी जगताप, वाघोजी तुपे, हिरोजी इंगळे, भिमाजी वाघ, सिधोजी पवार, महाडिक, जाधव, पांढरे, खराटे व सिद्दी हिलाल हे महाराजांचे साथीदार शिकार आली म्हणून उठले. नेताजी पालकर महाराजांच्या उजव्या हाताशीं होताच.

अफजलखानाच्या वधापासून प्रत्येक दिवसागणिक मिळत गेलेल्या विजयांनीं मराठी लष्कराची ठाम खात्री होती की, आपण आता वाटेल तें करूं शकूं. जिथे महाराज तिथे यश. महाराजांच्या माथीं आईने यशाचा हात ठेवला आहे. अपेश नाहीच यायचें !

रुस्तुमेजमानची फौज मिरजेपाशी आली. लगेच कोल्हापुराकडे दौडत निघाली. हेरांनीं लगोलग पन्हाळ्यावर महाराजांस खबर दिली.

महाराजांनी कूचाच्या इशाऱ्याकरिता नौबत वाजविण्याचा हुकूम दिला. सबंध किल्ला उठला. घोड्यांवर जिनें चढलीं. कमरेला तरवारी लटकल्या. सारी फौज सज्ज झाली. पन्हाळगडच्या बंदोबस्ताकरिता आधीच माणसें आणि फौज नेमून दिली होती. त्यांनी गडाचा कडेकोट बंदोबस्त केला.

महाराजांनी जगदंबेचें दर्शन घेतलें. आईसाहेबांचे आणि शहाजीराजांचे पाय स्मरले.

महाराज आले. समोर पांच हजार मराठे बहादर हुकमाकरिता कान टवकारून उभे होते. सर्वांनी ‘ हर हर ’ गर्जना केली. बस्स् ! आग चेतली ! महाराजांस मुजरे करून त्यांनी भराभर घोडयांवर उडया टाकल्या. महाराजांचीं जणू तीं पांच हजार प्रतिबिंबेंच घोड्यावर नाचत होतीं. आदिलशाहांचीं, कुतुबशाहांचीं आणि दिल्लीच्या मोंगली बादशाहांचीं प्रतिबिंबें दिसत तीं शाही शीशमहालांत वा जनानखान्यांतल्या दो नयनांच्या आयन्यांत! आम्हां मराठ्यांच्या या महादेवाचें प्रतिबिंब प्रत्येक मराठ्यांत दिसत होतें ![१३]

रुस्तुम अन् फाजल कोल्हापुरानजीक आले. कोल्हापुरांत बिनधोक घुसतां येणार असा विश्वास त्यांना वाटूं लागला. एवढ्यांत त्याने आघाडीस पिटाळलेल्या टेहळणीच्या स्वारांनी खबर आणली की, खुद्द शिवाजी अन् नेताजी पांच हजार फौज घेऊन येत आहेत. प्रत्यक्ष शिवाजी अन् नेताजी ? दोन भुतांशीं एकदम गांठ ? विजापुरी फौजेने आवंढा गिळला !

रुस्तुमेजमानने लगेच भराभर आपल्या फौजेची लढाईसाठी जय्यत तयारी सुरू केली. त्याने आघाडीस घोड्यावर राहून मोठमोठ्याने आपल्या सरदारांस हुकूम देण्यास सुरुवात केली.[१४] त्याच्या एका हातांत नागवी तरवार होती.

वह देखो ! मऱ्हाठोंकी फौज आ रही है ! अब तुम्हारी बहादुरीकी कर्तब दिखानेका वख्त है ! तुम्हारी हो चुकी हुई बेइज्जतीका बदला आज ले लो ! तुम्हारी हिम्मत किसीसे कम नहीं है ! तुम अपनी अपनी फौजोंको ठीक तर्तीब दो ! तुम खुद महाजपर डटे रहो ! जराभी कदम न डगमगाने पायें ! मै बजाते खुद फौजके मर्कजमें

खडा रहूँगा ! फाजलखान ! तुम फौजके बायें बाजू रहो ! मलीक इतबार ! तुम और सादतखान दोनों मिलकर फौजकी दायें बाजू रहो ! घाटगे ! तुम गस्त लगाते रहो ! फत्तेखान ! तुम और मुल्ला यह दोनो मिलकर फौजके पीछेकी तरफ रहो ! जल्दी करो, जल्दी करो ! चलो ![१४]

लगेच आदिलशाही फौजांची हालचाल सुरू झाली. महाराजांच्या चाणाक्ष हेरांनी सर्व वातम्या तपशीलपूर्वक त्वरेने पोहोचविल्या.

महाराज नजीक आले. मराठी फौजेंत महाराजांनीं एकेका सरदारास आपापली कामगिरी वांटून दिली. चढाईसाठी मराठी सेना उत्सुक झाली. वाद्य वाजविणारांनी एकदम हलकल्लोळ सुरू केला.[१६] मराठी सेना सज्ज झाली.

समोर विजापूरच्या फौजेची रचना रुस्तुमेजमान करीत होता. महाराजांच्या व रुस्तुमच्या फौजांत अंतर बरेंच होतें. परंतु एकमेकांना एकमेकांच्या फौजा व सरदार दिसूं शकत होते. महाराजांनी आपली नजर शत्रूवरून बारकाईने फिरविली. अनेक सरदार लोक महाराजांनी अचूक ओळखले.[१५] त्यांतील कांही मंडळी पूर्वी कधीना कधीतरी महाराजांच्या मराठी फौजेकडून ‘ प्रसाद ’ खाऊन पळून गेलेली होती ! नेताजी, हणमंतराव खराटे, पांढरे, इंगळे, भिमाजी, गोदाजी वगैरे महाराजांचे सौंगडी त्यांच्याजवळच उभे होते. महाराज त्यांना उद्देशून अत्यंत हिरिरीने म्हणाले :[१५]

“ हिराजी, तूं मलिक इतबारवर हल्ला चढवावयाचा ! महाडीक, तुम्हीं फत्तेखानाशीं झुंजायचें ! सिदोजी, तुझी गाठ सादातखानाशीं ! गोदाजी, तूं सर्जेराव घाटग्याला आणि घोरपड्याला घेरायचेंस ! नाईकजी राजे, आपण आणि खराटे राजे यांनी गनिमाच्या उजव्या बगलेवर मारा करायचा ! जाधवराव तुम्हीं आणि सिद्दी हिलाल यांनी गनिमाची डावी बगल झोडपून काढायची ! आणि मी खाशा रुस्तुमेजमानवर

आघाडीला एल्गार करतों ! चला ! व्हा तयार ! ”

महाराजांच्या हुकमांनी सर्वांना अवसान चढलें. मराठी हशमांनी सांगाती आणलेल्या रणनौबती, कर्णे, ढोल, शिंगें सरसाविलीं आणि वाद्यांचा दणदणाट सुरू झाला.[१६] हर हर महादेव आणि तुळजा भवानीच्या उदोकार गर्जनांनी आभाळ भरलें. मराठी स्वारांच्या छात्या तटतटून फुगल्या. आघाडीवर भगवे झेंडे थयथय नाचूं लागले.[१७]

रुस्तुमेजमाननेहि आपल्या फौजेला मराठ्यांवर चालून जाण्याचा हुकूम दिला. आदिलशाहीचे नारे लावीत विजापुरी फौज सुटली.

महाराजांच्या तलवारीचें पातें सपकन् गनिमाच्या रोखाने फिरलें. आणि धरण फुटलें ! मराठी फौज तुफान दौडत निघाली. महाराज आघाडीवर दौडत होते. वाघिणीच्या जिभेसारखी त्यांची ‘ भवानी ’ लवलवत होती. मस्तकावरचा मोतियाचा तुरा थयथयत होता. महाराजांनी थेट रुस्तुमेजमानचा वेध घेतला होता, तर नेताजी पालकर पूर्वी त्याच्या झडपेंतून निसटलेल्या सावजावर झापा टाकीत निघाला होता. तें सावज म्हणजे फाजलखान ! भिमाजी वाघ, हिरोजी इंगळे, सिद्दी हिलाल वगैरे सर्वजण, महाराजांनी फर्माविलेल्या हुकमाप्रमाणे आपआपल्या गिऱ्हाइकावर तुटून पडले होते. शत्रुसेनेपेक्षा मराठी सेना कमी असूनहि तिचा ज्योश विलक्षण होता. खात्रीच की, जिंकणार ! मारणार !

धुळीचे ढग आस्मानांत चढले. दोन लोंढे दोन्हींकडून धाड धाड धाड उसळत उड्या मारीत आले आणि एकमेकांवर थाडकन् थडकले. हत्यार खणखणूं लागलें. एक फरक अगदी उठून दिसत होता. रुस्तुमेजमानच्या फौजेंत हत्ती होते. महाराजांच्या फौजेंत हत्ती नव्हते. चपळाईच्या, हातघाईच्या, झटापटीच्या लढाईंत हत्तीसारखे अगडबंब आणि मंद प्राणी काय उपयोगाचे ? महाराजांनी आपलें युद्धतंत्रच बदलून टाकलें होतें.

अवजड तोफखाना किंवा हत्ती ते कधीहि फौजेंत वागवीत नसत. महाराजांच्या फौजेंत चपळ, चतुर, पट्टेबाज वाघांचाच भरणा असायचा !

विजापुरी फौजेच्या चहूंबाजूंनी मराठी लाटांचा गराडा पडला. ती बेटासारखी मध्यावर अडकली. चौफेर मारा सुरू झाला.[१५] नेताजीला तोंड देतां देतां फाजलखानाच्या नाकीं नऊ आले. त्याला तें महाग पडूं लागलें. आधीच घाबरून गेलेल्या त्याच्या फौजेची गाठ पडली नेताजीशीं ! मग कसें जमायचें ! शेवटीं व्हायचें तेंच झालें ! फाजलखानाची फळी फुटली. फाजलची भीतीने गाळणच उडाली. त्याची फौज वारेमाप कापली जाऊं लागली. महाराजांनी रुस्तुमच्या फौजेचीहि अशीच वाताहत केली. सादात, इतबार, मुल्ला हे घाबरून गेले. आणि ती पाहा गम्मत ! तो पाहा पळतोय ! हरणासारखा पळतोय !–कोण ?–फाजलखान ! फाजलखान बिन अफजलखान मुहम्मदशाही ! बिचाऱ्याला धीरच धरवेना. फाजलसारख्या मातबराला पळतांना पाहिल्यावर सादातखानालाहि पळून जाण्यास धीर आला ! मग, मलिक इतबार फत्तेखान, बाजी घोरपडे, घाटगे वगैरे सर्वच विजापुरी वीर धूम पळत सुटले ! पार सर्वांची विल्हेवाट लागली. रुस्तुमेजमानला हें एक विचित्रच चित्र डोळ्यापुढे दिसूं लागलें. जिकडे पाहावें तिकडे पळापळ चालली होती. तो ओरडूं ओरडूं सांगत होता, थांबा म्हणून. लढा म्हणून. पण कोणाला तें पटेना. चौफेर दाणादाण उडाली.

आणि केवढी फजिती ! खुद्द रुस्तुमेजमानहि पळत सुटला ![१९] त्याची जिलेबी महाराजांच्या तलवारीखाली साफ मारली गेली होती. आता पळालेंच पाहिजे असा क्षण आला होता. खरोखर तोच क्षण भाग्याचा ! पळून गेल्यावर लौकरांत लौकर विजापूर गाठायचें ! रुस्तुम पळाला तेव्हा त्याच्या सांगाती फक्त पांच–सहा स्वार होते.[१९]

खरें म्हणजे पळून जाण्याचा विचार आधीपासून सर्वांचाच असावा. फक्त प्रथम कोणीं पाय काढावयाचा एवढाच प्रश्न! फाजलखानाने प्रथम पळून जाण्यांत केवढी विलक्षण हिम्मत दाखविली ! डरला नाही गडी ! पण पळून जाण्याची कला त्याच्या अंगवळणीं पडलीच होती.

रुस्तुमेजमान पळाला तेव्हा महाराजांचे लोक त्याचा पाठलाग करूं लागले. पण महाराजांनी त्यांना थांबवलें. [२०] महाराज हसत हसत ती पळापळ पाहात होते. महाराजांना असेंच जणू म्हणावयाचें होतें की, पळूं द्या, पळूं द्या त्याला! तुमचा पराक्रम खास बादशाहाला रुस्तुमच्याच तोंडून ऐकूं द्या !

जयघोषांनी करवीरचें आभाळ भरून गेलें. बादशाही फौजेचा आणखी हा एक प्रचंड पराभव झाला. सारा जंगी असबाब महाराजांना मिळाला. शिवाय दोन हजार घोडे आणि बारा हत्ती हातीं लागले. एकूण फार नफ्यांत पडली ही लढाई. विजयाचा हा दिवस होता, माघ वद्य दशमी शके १५८१ ( दि. २८ डिसें. १६५९ ).

वाईच्या जवळचे चंदनगड आणि वंदनगड हे दोन आवळेजावळे किल्लेहि स्वराज्यांत दाखल झाले. तसेंच कोकणांतहि दाभोळ बंदर कबजांत आलें[२२] ( दि. ४ फेब्रु. १६६० ).

अफजलखानाचा मुक्काम जेव्हा जावळींत पडला होता, तेव्हा दाभोळच्या बंदरांत तीन गलबतें मालाने भरून पाण्यावर डोलत होतीं. या गलबतांतील माल अफजलखानाच्या मालकीचा होता. त्यावेळीं महाराज जरी अफजलखानाच्या पाहुणचाराच्या गडबडींत गुंतलेले होते, तरी त्यांचें लक्ष दाभोळच्या बंदरावर होतेंच. महमूद शरीफ हा दाभोळचा सुभेदार होता.

अन् अफजलखानाला मारल्यानंतर लगेच त्यांनी दोरोजी (दौलोजी?) नांवाच्या पिसाट पराक्रमी बहादराला दाभोळवर पिटाळलें.

अनुक्रमांक २४४८२ दि. ३३
क्रमांक ...

दोरोजी निघाला अन् आला! दाभोळवर मराठी टोळधाड येत आहे, हें समजतांच सुभेदार महमूद शरीफने तीं तीन गलबतें एकदम राजापुराकडे हाकारलीं. तो स्वतःहि राजापुरास त्या गलबतांसह पळाला.

राजापूर ही फार मोठी व्यापारी पेठ होती. राजापूर बंदर समुद्राच्या ऐन किनाऱ्यावर नव्हतें. खाडींत, आंत घुसलेल्या धारेवर एका काठावर गाव होतें व दुसऱ्या काठावर इंग्रज साहेबांची वखार होती. गाव गर्द झाडींत आणि डोंगरदाटींत वसलेला होता. देशावर जाणारा कोकणी आणि फिरंगी माल प्रामुख्याने राजापुरास जमा होई आणि फोंडा, रायपाटण–अणस्कुरा वगैरे घाटांतून बैलावर लादून कोल्हापूर वगैरे भागांत रवाना होई. राजापूर हें एक फार श्रीमंत व समृद्ध शहर बनलें होतें. इंग्रजांची आयात-निर्यात मालाची वखार अशा बाजारपेठेंत हवीच! ईस्ट इंडिया कंपनीची एक वखार येथे होती.

महमूद शरीफ दाभोळहून राजापुरास पळाला तरी दोरोजीला राजापूरच्या वाटा माहीत होत्याच की! दोरोजीने राजापूरचा रस्ता धरला. पण तेवढ्यांत महमूद शरीफने तीं गलबतें राजापुरास आणलीं व तेथे असलेल्या इंग्रज व्यापाऱ्यांच्या मुख्य साहेबाला विनंती केली की, एवढी हीं गलबतें तुम्ही तुमच्या ताब्यांत घ्या! अन् तुमचीं स्वतःचींच आहेत असें सांगून सांभाळा. मग कांही मराठे तुम्हाला किंवा गलबतांना त्रास देणार नाहीत.

इंग्रज टोपीकरांच्या मुख्य साहेबाचें नांव होते, हेन्री रीव्हिंग्टन. हे सद्गृहस्थ महा उचापती होते. फायद्याचीं बाळंतपणें मोठ्या हौसेनं हे आपल्या अंगावर घेत असत! महमूद शरीफने केलेल्या विनंतीचा हेन्रीने मोठ्या सहानुभूतीने विचार केला. पण त्याला हेंहि स्पष्टपणें दिसलें की, तीनहि गलबतें, ‘आमचीं आहेत’ असें सांगून आपल्या ताब्यांत घेतलीं तर मुळीच पचणार नाहीत. तूर्त एकच गलबत

फक्त सांभाळायला घ्यावें. हेन्रीने असा विचार करून एकच गलबत महमूद शरीफकडून आपल्या ताब्यांत घेतलें. शरीफच्या पुढे मात्र, उरलेल्या दोन गलबतांचें काय करावें हा प्रश्न पडलाच. तेव्हा धूर्त हेन्री म्हणतो कसा, की, हीं दोन गलबतें तुम्ही सुरतेला घेऊन जा ! तेथे सुखरूप राहतील !

——सुरतेला होतीच एक इंग्रजी वखार. याला म्हणतात इंग्रजी सल्ला !

एवढयांत दोरोजी आलाच राजापुरावर. आता ? तो भेदरट महमूद शरीफ भाड्याच्या एका गलबतावर चढला आणि झपाट्याने तें गलबत राजापूर सोडून वेंगुर्ल्याकडे पसार झालें. तीं दोन गलबतें त्याने तशींच सोडून दिलीं.

पण त्या दोन गलबतांवरच्या खलाशांनी मात्र भराभरा तीं बंदरांतून हाकारलीं व समुद्रांत दूरवर उभी केलीं. हें बहुधा हेन्रीच्या सल्ल्यावरून खलाशांनी डोकें चालविलें असावें.

मराठे राजापुरांत घुसले. बंदरावर आले. किनाऱ्यावर इंग्रजांची वखार होती. बंदरांत त्यांचा कांही मालहि पडलेला होता. दोरोजीने बंदरावर येऊन पाहिलें. तेथे अफजलखानाचीं गलबतें दिसेनात. इंग्रजी चट्टयापट्टयाचीं निशाणें लावलेलीं टोपीकरांचीं गलबतें होतीं. मग खानाचीं गलबतें गेलीं कुठें ? दोरोजीला गोऱ्या टोपीकरांचा संशय आला. त्याने इंग्रजांकडे सरळ मागणी केली की, खानाचीं तीनहि गलबतें तुम्ही आमच्या स्वाधीन करा ! दर्यांत असतील तेथून हाकारून बंदरांत आणून स्वाधीन करा ! तेव्हा तो हेन्री रीव्हिंग्टन अत्यंत सज्जनपणाचा आव आणून गंभीरपणें बंदरावर आला. आणि दोरोजीला व इतर मराठा लष्करी अधिकाऱ्यांना म्हणाला की, आम्ही लोक फक्त व्यापार करणारे ! आम्हांला तुमच्या राजकारणाशीं कांहीहि कर्तव्य नाही ! आम्ही कोणाच्याहि विरुद्ध कोणालाहि मदत करीत नसतों !

राजकारणापासून अलिप्त ! आम्ही राजकारणापासून अलिप्त आहोंत, अलिप्त आहोंत, असें म्हणणारे लोकच सर्वांत जास्त राजकारणी डाव खेळत असतात ! हेन्रीने कोणतेंहि स्वतःचें किंवा इतरांचें गलबत दोरोजीच्या स्वाधीन करण्याचें स्वच्छ नाकारलें.[२३]

साहेब ऐकत नाही असें दिसतांच दोरोजीने एकदम इंग्रजांच्या मालावर छापा घातला आणि सर्व माल आपल्या ताब्यांत घेतला. तेथें फिलीप गीफर्ड नांवाचा इंग्रज होता, त्यालाहि दोरोजीने कैद केलें. आणखी एका दलालालाहि त्याने पकडलें.[२३]

हेन्री रीव्हिंग्टनने दोरोजीकडे खूप मागणी केली की, आमचीं माणसें व माल सोडा ! पण दोरोजीने साफ सांगितलें की, खानाचीं गलबतें तुम्हीं आमच्या स्वाधीन केल्याशिवाय सोडणार नाही ![२३]

तो दलाल जो होता तो कांही 'गोरा' नव्हता. तो 'काळा' होता. त्याला तेवढें दोरोजीने नंतर सोडून दिलें. पण फिलीप गीफर्डला मात्र त्याने सोडलें नाही. इंग्रजांचा माल व तो कैदी राजापुराहून खारे पाटणास त्याने रवाना केला.

अखेर, राजकारणापासून अलिप्त असलेले इंग्रज नेमके बोलायला लागले ! हेन्रीने दोरोजीशीं गुप्त वाटाघाटी केल्या आणि कोकणांतील एका जबर शत्रूविरुद्ध लढावयासाठी शिवाजीमहाराजांस मदत करण्याचें अत्यंत गुप्त आश्वासन हेन्रीने दोरोजीला दिलें !

दोरोजीने ही फार महत्त्वाची मसलत इंग्रजांकडून कबूल करून घेतली. फिलीप गीफर्डला त्याने मुक्त केलें नाहीच ! मालहि सोडला नाही ! त्याने हेन्रीला सांगितलें की, आमच्या महाराजांना सांगून, विचारून मग तुमचा माल आणि माणूस सोडण्याचा विचार करूं !

जगांत जशाला तसेंच मिळालें म्हणजे बरें असतें ! दोरोजी हें


नवें राजकारण घेऊन महाराजांस भेटावयास कोकणांतून देशावर यावयास निघाला.

एकूण, अफजलखानाचा पायगुण मोठा लाभदायक ठरला! महाराजांस, नेताजीस आणि दोरोजीस बुलंद यश मिळालें. महाराष्ट्राचा पराक्रम आता भरधाव दौडत होता. दऱ्याखोऱ्यांची पर्वा न करतां धाडस पैलाड उड्या फेकीत होतें. उत्साहाला जांभई माहीत नव्हती. जय आणि श्री हातांत माळ घेऊन महाराजांस शोधीत शोधीत धावत येत होती.

* * *

---

**आधारः**—(१) सभासद पृ. २२; चित्रगुप्तब. पृ.३४. (२व३) चित्रगुप्तब. पृ. ३४. (४) शिभा २४।१ व २; ५ व ६. (५) शिभा २४।५ व ६. (६) शिभा २४।१४. (७) शिभा २३।५८ ते ६१. (८) शिचप्र. पृ. २०; शिकापसासं ले. ७९० व ७९१; शिभा २३।६२ ते ७२; शिचत्रसं. २ पृ. ३५, ३६ व ६०. (९) शिभा २४।८ ते २०. (१०) शिभा २४।२१ ते २३. (११) शिचत्रसं. २ पृ ६०. (१२) शिभा २४।३० ते ४०. (१३) शिभा २४।३१. (१४) शिभा २४।३० ते ४६. (१५) शिभा २४।४७ ते ५२. (१६) शिभा २४।५४ व ५५. (१७) शिभा २४।५६. (१८) शिभा २४।६७. (१९) शिभा २४।७३. (२०) शिभा २४।७४ व ७५. (२१) शिचप्र. पृ. २१ व ५७. (२२) शिकापसासंले. ७९० ते ८१२; शिचत्रसं ३, पृ. ६५. (२३) पसासंले. ८००. २४) शिभा २४।३२.



# ३. टोपीकर इंग्रज

फाजलखान आणि रुस्तुमेजमान शिवाजीच्या हातचा जबरदस्त मार खाऊन पळून आले, ही बातमी बादशाह आणि बडी साहेबीण या दोघांना समजली. तीं दोघेंहि थक्कच झालीं. अफजलखानाच्या पाठोपाठ साडेतीन महिन्यांच्या आंत शिवाजीने हा दुसरा तडाखा दिला ! चिंतेच्या वादळी विचारांनी त्यांचें डोकें सुन्न झालें. हा शिवाजी, शिवाजी म्हणजे आहे तरी कोण ?

बेगम वैतागून गेली. ती मक्केला जाण्याच्या गोष्टी बोलूं लागली ! पण मक्केला जाऊन, शिवाजीचा बंदोबस्त कसा व्हायचा ? शिवाजीने तर सारी रियासत हैराण करून टाकली आहे. जो कोणी त्याच्यावर चालून जातो तो परतच येत नाही ! अन् आलाच तर मार खाऊन ! पळून !

दरबारचे सरदार मात्र शिवाजीमहाराजांवर भयंकर चिडले होते. त्यांतील कित्येकांना तर महाराजांचा इतका राग आला होता की, त्यांनी असें ठरवलेलें दिसत होतें की, बस्स् , आता या शिवाजीवर — — फिरून कधीहि जायचेंच नाही !

खरोखरच, महाराजांनी गेल्या बारा वर्षांत एकेका सरदार–दरखदारांचे असे हात पिरगाळले होते की, आता त्यांच्या हातांत बळच उरलें नव्हतें महाराजांविरुद्ध तलवार धरायला ! रुस्तुमेजमानचें काय झालें तें पाहिलेंत ना ? ज्या वेगाने चालून आला त्याच्या पंचवीसपट

वेगाने पळून गेला! पळून गेला म्हणण्यापेक्षा उडून गेला म्हणणेंच योग्य! शिवसैन्याची फुंकरच इतकी जबरदस्त!

मराठी फौजांनी उभ्या बादशाहींत हुतुतू मांडला होता. कोकणांत तीन हजार मराठी लष्कर सागरकिनाऱ्यावर विजेसारखें नाचत होतें. क्षणांत येथे तर क्षणांत तेथे![१] तीच स्थिति पूर्व महाराष्ट्रांत, दक्षिण महाराष्ट्रांत आणि उत्तर कर्नाटकांत. विशाळगडापर्यंतचा पट्टा महाराजांनी जातीने जिंकला. नेताजीने शाही मुलखाची लूट मांडली होती. मराठ्यांच्यापुढे प्रतिकाराला कोणीहि टिकतच नव्हता. मोठमोठ्या शाही फौजा शिकस्त खाऊन पळत होत्या, हें खरोखर अत्यंत विस्मयकारक दृश्य होतें. सतत साडेतीनशे वर्षें सुलतानांच्या गुलामगिरींत मार खात जिणें जगणारीं हीं मराठी माणसें, एकदम एवढीं बळजोर झालीं तरी कशीं? सर्वांनाच आश्चर्य वाटत होतें. गोऱ्या जळचर टोपीकरांनाहि नवल वाटत होतें.

महाराजांस सर्वत्र यश येत होतें. तिप्पट, चौपट फौज शत्रूकडून आली तरीहि मूठभर तिखट मराठी सेना शत्रूचें पार तळपट करीत होती. गोव्याच्या पोर्तुगाळी फिरंगी गोरंदोर जनरेलाने आपल्या राजाला याच वेळीं एक पत्र लिहिलें. त्यांत तो म्हणतो[२]:

'शिवाजी नांवाचा एक बंडखोर फार बलिष्ठ झाला आहे. आदिलशाही मुलुख ताब्यांत घेण्याचें काम तो झपाट्याने करीत आहे. हें त्याचें काम जर असेंच चालू राहिलें, तर तो लौकरच विजापूरचें राज्यच आपल्या ताब्यांत घेईल!'

या पत्रावर तारीख आहे, १८ डिसेंबर इ. १६५९

अगदीं असेंच पत्र वलंदेजी (डच) गोरंदोराने आपल्या व्यापारी कुंपणीच्या मुखत्यारांना (डायरेक्टर बोर्डाला) लिहिलें. त्यांत तो म्हणतो,[२०] '.......जुलमामुळे प्रजा बंड करून उठली आहे. त्यांतच

शिवाजी नांवाचा बंडखोर इतका यशस्वी झाला आहे की, अनेक किल्ले व शहरें त्याच्या ताब्यांत गेलीं आहेत. त्याचें सैन्य विजापूरच्या आसमंतात येऊन थडकलें आहे !.... '

मराठ्यांची अस्मिता साडेतीनशे वर्षांनंतर एकदम जागी झाली होती. कमळाच्या पाकळीप्रमाणे हळुवारपणें नव्हे. खडबडून ! प्रल्हादाच्या खांबाप्रमाणे कडकडून ! दुभंगून ! त्यांतूनच महा अक्राळ-विक्राळ नरसिंह प्रकटला होता. कराल दाढा, विस्फारलेले नेत्र, उगारलेले हजारो सशस्त्र हात, पिंजारलेली आयाळ, हें होतें त्याचें स्वरूप ! आणि आकाशपाताळ घुमविणारी त्याची गर्जना होती, हर हर महादेव !

मराठ्यांच्या अस्मितेंतून नरसिंह प्रकट झाला. हिरण्यकश्यपूचें पोट प्रतापगडच्या उंबरठ्यावर टरारा फाटलें ! रक्ताच्या चिळकांड्या क्षितिजाच्या पलीकडे उडाल्या ! इंग्रेज, वलंदेज, डिंगमार, फरांशीस फिरंगी आणि रुमशामच्या सलतनतीपावेतो, नरसिंहाने झटकलेल्या बोटांवरचे रक्ताचे थेंब उडाले !

युद्धामागून युद्धें जिंकलीं जाऊं लागलीं. उन्मत्तांचे संहार उडूं लागले. जनशक्तीचा आणि क्रांतीचा हा जनसिंह प्रकट तरी कोणत्या स्तंभांतून झाला ?

त्या महाप्रचंड स्तंभाचें नांव आहे, 'महाराष्ट्रधर्म !' या स्तंभावर सुलतानांच्या लाथाबुक्क्यांचे आघात होत होते. एके दिवशीं सुलतान-शाहीची घटका भरली !

या स्तंभाला शतकोन होते–आहेतहि. देव, देश, सद्धर्म आणि सुसंस्कृति या चिरेबंदी चौथऱ्यावर हा स्तंभ उभा आहे. जुलमाच्या प्रत्येक आघातागणिक नरसिंहाच्या कानावर आर्त आरोळ्या जात होत्या. देवळांतल्या मूर्ति, क्षेत्रांतील तीर्थें, शेतांतील पिकें, मायबोली मराठीचीं अक्षरें, वैदिकांच्या जिभेवरील ऋचा, वैश्वदेवाचा अग्नि आणि गोठ्यांतील

गाईवासरें, सुलतानी सत्तेमुळे स्तंभित झालेल्या मराठी तेजाला ओरडून ओरडून सांगूं लागलीं की, अरे आम्ही भ्रष्ट झालों ! आता नष्ट होण्याची वेळ आली आहे ! आम्हांला जपा ! आम्हांला वांचवा !

आणि एके दिवशी तिघांनी संगनमत केलें. तिघांनी गुप्त कारस्थानें केलीं. तिघांनी मराठी सिंहांना बंडाची चेतावणी दिली. कोण हे तिघे ?

सह्याद्रि, शिवाजी आणि समुद्र !

अन् एके दिवशी स्तंभ कडकडला !

आणि आता त्याची झेप पडत होती थेट आदिलशाहीच्या राजधानीवरच !

महाराजांनी सरनौबत नेताजी पालकराला आदिली मुलखांत मनसोक्त धुमाकूळ घालण्यासाठी स्वैर सोडलें.[३] नेताजी निघाला. नेताजी म्हणजे झंझावात. नेताजी म्हणजे सिकंदर समशेरीचा सफ्दरजंग ! नेताजीची फौज म्हणजे गेंड्यांची झुंड ! आदिलशाहीस धडक द्यावयासाठी करवीरहून ही झुंड भाल्यांचीं टोकदार शिंगें रोखून निघालीच !

महाराज कोल्हापुराहून पन्हाळ्यावर गेले.

नेताजीने कृष्णेच्या काठावरचीं एक एक आदिलशाही ठाणीं वेचावयास प्रारंभ केला. कवठें, बोरगाव, मालगाव, कुंडल, अंवप, घोगाव, सत्तीकीर, आड, सांगली, मायील, पारगाव हीं गावें तर नेताजीने इतक्या सहजपणें जिंकलीं की, जणू डाव्या हाताने घेतल्यासारखींच वाटावींत !

पण एक ठाणें मात्र मराठी झेंड्यापुढे अन् मराठी गेंड्यांपुढे वाकेना ! नेताजीने त्यावर खूप जोराची धडक दिली, पण फक्त मातीच उधळली गेली. खिंडार पडेना. तें ठाणें म्हणजे मिरजेचा किल्ला. किल्ला भुईकोट होता. भवताली खंदक होता आणि तटबंदी होती फक्त मातीची ! तरि

तीन गज रुंद ! धडक दिली तर एक वेळ अगदी भिंताडें कोलमडतील, पण मातीपुढे हत्तीनेहि शरणागती लिहून द्यावी ! तेथे सुरुंग निरुपयोगी. तोफा कुचकामी. मातीचीं भिंताडें जिंकायला उंदीर-घुशींचीच चिकाटी पाहिजे.

पण वेढा घालून बसायला नेताजीला वेळ नव्हता. लांबलांबच्या मजली मारून त्याला सगळी सगळी बादशाही बेचैन करायची होती ना !

तरी पण नेताजी मिरजेच्या किल्ल्याशीं झुंजूं लागला. ही बातमी पन्हाळ्यावर महाराजांस समजली. नेताजीने असे मातीशीं खेळत वेळ घालविणें नफ्याचें नाही, हें ओळखून महाराज जातीनिशी लगेच पन्हाळ्याहून मिरजेस आले ( जानेवारी १६६० ).

मिरज किल्ल्याला महाराजांनी स्वतः वेढा घातला आणि नेताजीला पुढच्या स्वारीसाठी मोकळें केलें.[३] नेताजीची पुढची दौड सुरू झाली.[३] मिरजेचा वेढा खास महाराजांच्या हुकमाखालीं चालू झाला.

घटका, पळें, प्रहर आणि दिवस उलटत होते. महाराज मिरजेशीं झगडत होते. पण यशाचें अद्याप चिन्ह दिसत नव्हतें.

याच वेळीं कोकणांतून दोरोजी ‘ तें ’ राजकारण घेऊन महाराजांकडे आला. दोरोजीने कैद केलेला इंग्रज टोपीकर फिलीप गीफर्ड खारेपाटणच्या किल्ल्यांत होता.[११] दोरोजीने इंग्रजांना लगावलेली ही चपराक इंग्रजांच्या गालावर अद्याप झिणझिणत होतीच. त्यांनी दोरोजीच्या मार्फत एक महत्त्वाचें राजकारण महाराजांशीं लावलें होतें. आपला माणूस व जप्त केलेला माल सोडवून घेण्यासाठी एक मोलाचा मोबदला इंग्रजांनी देऊं केला होता.[११] दोरोजीने राजापुरीचें गुप्त राजकारण महाराजांस सांगितलें. महाराजांनी ऐकलें. त्यांना अगदी तेंच हवें होतें. त्यांनी पूर्वी ह्या राजकारणासाठी इंग्रजांकडे बोलणीं लावलींहि

होतीं. परंतु राजकारणापासून ‘अलिप्त’ असणाऱ्या टोपीकरांनी कांहीच रुकार दिला नव्हता. पण आता राजकारणाच्याच चिमट्यांत नाक पकडतांच दोरोजीपाशी इंग्रजांनी तें राजकारण तडीस न्यावयाचें कबूल केलें. तें म्हणजे असें की, जंजिऱ्याच्या सिद्दीला कायमचा उडविण्याकरिता इंग्रजांनी महाराजांना जरूर त्या युद्धसाहित्याची आणि आरमाराचीहि मदत करावी.

महाराजांची फार फार इच्छा होती की, जंजिऱ्याच्या किल्ल्यावर भगवाझेंडा चढवावा. पण किल्ला अभेद्य होता. सर्व बाजूंनी समुद्र. वेटावरचा अति बळकट जलदुर्ग जिंकायचा तरी कसा? पूर्वी रघुनाथ बल्लाळांच्या बरोबर फौजा पाठवून, सिद्दीला उडविण्याचा किंवा बुडविण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. परंतु तो प्रयत्न सपशेल फसला. अफजलवधापूर्वी महाराजांनी इंग्रजांशीं बोलणीं लाविलीं होतीं की, आम्हांला जंजिरा व दंडाराजपुरी काबीज करण्यासाठी आरमारी मदत द्या. परंतु अफजलखानाच्या स्वारीमुळे तें राजकारण मागे पडलें होतें.

आता इंग्रजांनी दोरोजीपाशी मदत कबूल केली.[१३]

दोरोजीने साधलेल्या पुढच्या संधानावर महाराज खूष झाले.

तेवढ्यांत राजापुराहून हेन्री रीव्हिंग्टन टोपीकराने महाराजांस एक पत्र पाठविलें. हें पत्र घेऊन कोण आला होता हें समजत नाही; परंतु तो बहुधा, इंग्रजांकडे दुभाषा किंवा वकील म्हणून काम करणारा कोणी तरी ‘नेटिव्ह’ असावा. कदाचित् वेलजीलाच हेन्रीने पाठविलें असेल. या पत्राची तारीख होती, १३ फेब्रुवारी १६६०. पत्राचा हिंदवी तर्जुमा पुढीलप्रमाणें[१२] : ‘दंडाराजपूर प्रकरणीं आपल्याकरिता इंग्रजांनी किती दोस्तीचें वचन दिलें आहे, हें दोरोजी व इतर मराठा सेनाधिकाऱ्यांनी आपणांस कळविलें असेलच. तुमच्या लोकांकडून आम्हांला किती त्रास झाला आहे, हें सांगतां पुरवत नाही. परंतु कृपा करून आपण इतकेंच

लक्षांत घ्यावें की, ( राजापूरच्या बंदरांत असलेलीं अफजलखानाच्या मालकीचीं गलबतें आम्ही दोरोजच्या ताब्यांत देण्याचें नाकारलें आणि ) आमच्या मित्रांचें शत्रुत्व आम्हीं पत्करलें नाहीं, एवढ्याच-करिता आमचा एक दलाल व एक इंग्रज मनुष्य खारेपाटणांत मराठ्यांनी पंचवीस दिवसांपासून कैदेंत ठेवला आहे. दलालास त्यांनी सोडलें. परंतु इंग्रज माणासाला मात्र अद्याप डांबून ठेविलें आहे. आम्हांस या गोष्टीने खेद होत असून इतर व्यापाऱ्यांना सर्वत्र दहशत बसून व्यापारास धक्का बसला आहे. तरी आपण हुकूम पाठवून आमचा माल व माणूस परत आमच्या स्वाधीन कराल, यावद्दल खात्री असल्यामुळे धीर धरून आहोंत. '

महाराजांनी इंग्रजांतर्फेचा मजकूर ऐकून घेतला. पण तो ऐकत असतांना, महाराजांचें मन नक्की असें म्हणत होतें की, आमची सलतनत म्हणजे निरुपद्रवी शरीफ–सज्जनांना त्रास देणारी चोर दरवडेखोरांची टोळी नव्हे ! राजकारणापासून अलिप्त राहून व सर्वांशींच मैत्रीचे संबंध ठेवून फक्त व्यापार करणारे आपण निरुपद्रवी त्रयस्थ आहोंत, असें हे म्हणतात; मग आमच्या शत्रूला आमच्या मर्जीविरुद्ध मदत करतात तें कोणत्या हाताने ? वाटतात तितके हे गोरेगोमटे इंग्रज टोपीकर साधेभोळे खास नाहीत ! आम्ही यांना पक्कें ओळखतों ! यांना भूमीची माया फार ! हे सामान्य साहुकार नव्हेत ! व्यापार करतां करतां अखेर राज्यच साधावें, हाच यांचा मनसुवा ! यांस पथ्यावरच ठेवलें पाहिजे !

हेन्रीचें हें आलेलें पत्र महाराजांनी एरव्ही हवेंत भिरकावून दिलें असतें; पण महाराज थांबले. कारण महाराजांना इंग्रजांच्या मदतीने जंजिऱ्याच्या सिद्दीचा काटा काढायचा होता ! म्हणून पुढे साधावयाच्या मसलतीवर नजर देऊन महाराजांनी हेन्री रीव्हिंग्टनचा अर्ज मंजूर केला. त्यांनी इंग्रजांच्या माणसाची कैदेंतून मुक्तता करण्याचा व त्यांचा

माल परत देऊन टाकण्याचा हुकूम दिला. इतकेंच नव्हे, तर इंग्रजांना असेंहि दाखविलें की, तुम्हांला दिलेल्या उपद्रवाबद्दल दोरोजीला शिक्षा फर्माविली आहे ![१४]

इंग्रज काय आणि जंजिरेकर सिद्दी काय, दोघेहि महाराजांचे शत्रूच. पण एका शत्रूच्या मदतीने दुसऱ्या शत्रूला बुडवून स्वतःचें, म्हणजेच स्वराज्याचें सामर्थ्य वाढविण्याचें राजकारण महाराजांस साधावयाचें होतें. त्यांनी इंग्रजांना दया दाखविली, ती तेवढ्यासाठी.

महाराजांस दिलेलें वचन पाळण्याची जबाबदारी इंग्रजांच्या शिरावर आली. फिलिप गीफर्डची सुटका झाली. या कैदेच्या काळांत गीफर्डला जेवणखाण इंग्रज पोहोचवीत असत.[२१]

गीफर्डला सोडण्याचा परवाना महाराजांनी इंग्रजांस पाठविला. पण तेवढ्यांत खारेपाटणच्या किल्ल्यांतून त्याला काढून खेळणा किल्ल्यावर मराठ्यांनी नेलेलें होतें. हें इंग्रजांस समजलें तेव्हा त्यांचीं तीस माणसें खेळण्याच्या मार्गाने गेलीं. महाराजांचा हुकूम होता, त्याप्रमाणे मराठ्यांनी गीफर्डला इंग्रजांच्या स्वाधीन केलें.[२१]


एका इंग्रज माणसाकरिता त्याचे देशबांधव किती धावपळ आणि धडपड करतात हेंहि स्पष्ट दिसून आलें. गीफर्ड सुटेपर्यंत हेन्री रींग्टनला स्वस्थता वाटत नव्हती.

—मिरजेचा वेढा चालूच होता. हा महिना, शके १५८१ च्या फाल्गुनाचा होता. नेताजी पालकर शाही मुलखांत होळ्या पेटवीत दौडत होता. महाराजांच्या या एकूण धुमाकुळामुळे बादशाहाच्या काळजांत मात्र संतापाची आग भडकली होती.

* * *

---

**आधारः**—प्रस्तुत 'टोपीकर इंग्रज' या प्रकरणाचे आधार पुढील चौथ्या प्रकरणाच्या अखेरीस एकत्र दिलेले आहेत. ते पाहावेत.



# ४. सलाबतखान सिद्दी जौहर

सुलतान अली आदिलशाहाला तीन अक्षरांनी चिंताक्रांत करून सोडलें होतें. त्याच्या सरदारांना आणि सेनेला सतावीत होतीं तींच तीन अक्षरें. शि—वा—जी! कुठे कोणीं हीं तीन अक्षरें अगदी हळू आवाजांत जरी पुटपुटला तरी त्यांचे प्रतिध्वनि, चढत्यावाढत्या आवाजांत एका मागोमाग एकेका काळजांत सतत घुमत राहात होते. गोल घुमटाप्रमाणे!

शिवाजी!

शिवाजी! शिवाजी!

शिवाजी! शिवाजी! शिवाजी!

या प्रतिध्वनींत आश्चर्य होतें. भीति होती. कुतूहल होतें. राग होता. सूड होता. कौतुक मात्र क्वचितच होतें.

खुद्द बादशाहाच्या दाढेखाली हीं तीन अक्षरें रागाने चावलीं जात होतीं. पण काय उपाय योजावा हेंच समजत नव्हतें! शिवाजीचा काटा घर करून बसला. कोण आता असा जबरदस्त आहे की, जो 'शि—वा—जी' हीं अक्षरें दुनियेंतून साफ पुसून काढील? बादशाह आणि त्याचे मुत्सद्दी विचार करीत होते. स्मृतींचें उत्खनन चालू होतें!

आणि सापडला! एके दिवशीं बादशाहाला आपल्या स्मरणांच्या खाणींत एक काळा हिरा सापडला! तेलंगणांतील किल्ले मुहम्मदनूर ऊर्फ कर्नूळ येथील सरदार सिद्दी जौहर! बादशाहाच्या नजरेपुढे तो काळाकभिन्न धिप्पाड लोखंडी पुतळा आला. 'जौहर' या शब्दाचा अर्थ 'रत्न'. सिद्दी जौहर हा खरोखरच मौल्यवान् रत्न होता. तो

अत्यंत शूर होता. अनुभवी होता. कर्तबगार होता. जिद्दीने कामें करणारा होता. सेनापतीचे सर्व गुण त्याच्यांत पुरेपूर होते. पण विजापूर दरबारच त्याची नेहमी उपेक्षा करीत असे. त्याच्यावर बादशाहाची मेहेरनजर नव्हती. तो सरळ मार्गाचा आडदांड शिपाई बादशाही मर्जी संपादन करण्याची कलाकृति शिकलेला नव्हता. त्याचा उल्लेख शाही दरबारांत उण्या शब्दानेच घडत असे.[५] बादशाहाला आता मात्र या नावडत्या सरदाराची कळकळीने आठवण झाली.

आणि योगायोग असा की, खुद्द सिद्दी जौहरचाच स्वतःचा एक अर्ज बादशाहाकडे दाखल झाला! त्याच्या त्या अर्जाचा हिंदवी तर्जुमा असा,[५]

'........मी पूर्वी अनेक वाईट कृत्यें केलीं. परंतु आता त्यांबद्दल मला वाईट वाटत आहे. तरी हजरतींनी माझे गुन्हे माफ करावे. हजरत बादशाह मला माफीचें फर्मान धाडतील तर मी हजरत बादशाहांचे भेटीस रुजू होतों आणि कांही कामगिरी जर ते मला सांगतील तर तीहि मी आनंदाने करतों. मी बादशाहांच्या दुष्मनाचा निःपात करीन........'

सिद्दी जौहरचा हा अर्ज दरबारांत दाखल झाल्यावर बादशाहास व बड्या बड्या सरदारांस आनंदच झाला. हाक मारण्यापूर्वीच जौहरची ओ ऐकूं आली. अन् मग बादशाहाने जौहरची फार फार तारीफ गाइली.[५] लगेच त्याने जौहरला तशरीफ फर्मावली. तशरिफीच्या फर्मानांत मात्र बादशाहाने भलताच आव आणला होता. शाही फर्मानाचा हिंदवी तर्जुमा असा :[५]

'........ आमच्या निसबतीस असे दुसरे पुष्कळ लोक आहेत की, जे आजच्यासारखें ( शिवाजीला नेस्तनाबूद करण्याचें ) काम करण्याची इच्छा करीत आहेत. एवढेंच नव्हे, तर ते करूनहि दाखवितील.

पण तुम्ही स्वतः होऊन या चाकरीसाठी अर्ज केलात, म्हणून तुम्हास हुकूम करण्यांत येत आहे की, हें काम तुम्हीं करून दाखवावें आणि बादशाही मेहरबानीस उमेदवार व्हावें........ '

बादशाहाने आव तर असा आणला की, वास्तविक आम्हाला तुमची कांही जरूर नाही; आमच्यापाशी असे खूप लोक आहेत की, जे शिवाजीचा सहज नाश करूं शकतील! पण केवळ मेहेरबानी म्हणून या कामगिरीची संधी तुम्हाला देत आहोंत!

खरें म्हणजे बादशाहाची अवस्था झाली होती बहिरी ससाण्याच्या तावडींत सापडलेल्या चिमणीसारखी. पण तो मिजास मात्र मिरवीत होता शहामृगाची!

लगेच बादशाहाने काशी तिमाजी नांवाच्या दरबारी खिदमतगारास कर्नुळास रवाना केलें. सिद्दी जौहरला विजापुरास घेऊन येण्यासाठी काशीपंताची योजना झाली होती.[१८]

काशी तिमाजी कर्नुळास जाऊन सिद्दी जौहरासह विजापुरास परत आला. जौहरच्या बरोबर त्याची हबशी फौजहि आली.[२२] हबशी फौज म्हणजे काळा समुद्रच. गांधीलमाशा चावल्यासारखे जाड जाड ओठ, टपोरे डोळे, राकट भिवया, कुरळे केस अन् रंग हा असा! पण कुणाच्या रंगारूपाची थट्टा कशाला करायची! रूप काय कोणाच्या हातचें का असतें? परंतु गुण पाहा की त्यांचे! खरोखरच हबशांची जात शूरपणांत कमी नव्हती. चिवटपणा आणि प्रामाणिकपणा तर त्यांच्या रक्ताचाच गुण. ताकदवानहि तसेच ते. अंगीं रेड्याचें बळ. खांद्यावर तलवारी टाकून त्यांचे उघडेबंब देह उभे राहिले की शत्रूकडच्या हत्तींनीहि भ्यावें. हबशांची जात बुद्धिमान् नाही असें कोण म्हणतो? मलिक अंबरासारखा अत्यंत कर्तबगार, मुत्सद्दी व मुख्य वजिरी करणारा पुरुष कोण होता? सिद्दी संबूळ जंजिरेकर कोण

होता ? सिद्दी याकूत, सिद्दी रेहान, सिद्दी दर्वीश-हे कोण होते ?

हे सर्वजण हबशीच होते. अतिशय कर्तबगार व बुद्धिमान् राजकारणी माणसें होतीं हीं सर्व.

सिद्दी जौहरहि असाच विलक्षण कर्तृत्वाचा सेनापति होता. तो स्वतः मुत्सद्दी मात्र नव्हता. सरळ नाकासमोर चालणारा शिपाईगडी होता.

विजापुरांत आल्यानंतर सिद्दी जौहर दरबारांत गेला. शिवाजीवरच्या नव्या मोहिमेचा मानकरी म्हणून त्याचा आज वेगळाच थाट होता. बादशाहाने त्याचा फारच मोठा गौरव केला. त्याला ‘ सलाबतखान ’ असा किताब दिला. खिलत दिली. त्याची फारच ताजिमत—करिमत केली. या शुक्रगुजारीने सिद्दी जौहर अगदी भारावून गेला. त्याची एवढी स्तुति आजवर कधीच कुठे झाली नव्हती. आपण एवढे ‘ मोठे ’ आहोंत, हें त्याला आजच समजलें ! बादशाहाने काशी तिमाजीलाहि ‘ दियानतराव ’ असा किताब दिला आणि त्याला सिद्दी जौहरची निसबत फर्मावली.[१८]

सिद्दी जौहरला शिवाजीवरची मोहीम फर्मावून नामजाद केला तें पाहून अनेक सरदारांना हुरूप आला. बादशाहाने अनेक सरदारांना जौहरच्या फौजेंत दाखल होण्याचे हुकूम सोडले. रुस्तुमेजमान, सादातखान, सिद्दी मसूद ऊर्फ मसाऊद, मुधोळकर बाजी घोरपडे, भाईखान, पीडनाईक, बडेखान वगैरे मंडळी त्यांत होती. शिवाय त्याने फाजलखानासहि जौहरच्या बरोबर नेमणूक फर्मावली.[६]

शिवाजी यावेळीं पन्हाळा प्रांतांतील मिरज ऊर्फ मूर्तिजाबादच्या किल्ल्याला वेढा घालून बसलेला आहे, तेव्हा सलाबतखानाने मिरजेच्याच रोखाने चालून जावें असें ठरलें.

जौहरच्या फौजेचा तळ पडला. हा तळ अफजलखानाच्या फौजेपेक्षाहि प्रचंड होता. निरनिराळ्या कागदपत्रांत, जौहरच्या सैन्यदळाचे

आकडे निरनिराळे दिलेले सापडतात. कुठे म्हटलें आहे, वीस हजार घोडदळ व खूप खूप पायदळ. कुठे म्हटलें आहे, पंचवीस हजार एकूण फौज होती म्हणून. तर वेंगुर्ल्याच्या एका वलंदेजी वाकनिसाने आपल्या गोरंदोर जनरेलाला लिहिलेल्या पत्रांत म्हटलें आहे की, जौहरच्या छावणींत सोळा ते वीस हजार घोडेस्वार आणि पस्तीस ते चाळीस हजार पायदळ होतें म्हणून.[४] म्हणजे कमींत कमी एकूण फौज पस्तीस हजारांपर्यंत होती यांत शंका नाही.

विजापूर पुन्हा एकदा फौजेच्या गर्दीने गजबजून गेलें. पूर्वीच्या अनुभवाने शहाणे झालेले लोक जौहरच्या दिमतीला होते. अफजलखानाच्या मोहिमेंत झालेली एकहि चूक पुन्हा न होऊं देण्याची दक्षता आरंभापासूनच घेण्यांत येत होती. प्रत्येक तर्तुदींत जौहर जातीने लक्ष घालीत होता. तोफा भुई चेपीत धावत होत्या. वैरणीच्या गंजींनी भरलेल्या गाडया डगमग डोलत छावणीकडे रांग धरून चालत होत्या. हत्तींची मोठी थोरली रांग छावणीच्या तोंडावर उभी होती. तंबू, शामियाने, राहुट्या आणि पालें तर अगणित होतीं. दारूगोळा, खजिना, शस्त्रास्त्रें, बिगारकामगार, दाणागोटा वगैरे साराच पसारा प्रचंड होता. पस्तीस हजार तोंडांच्या फौजेला काय लागणार नाही? असा हा प्रचंड तळ विजापूर शहराबाहेर पडला.[१]

शिवाय कोकणांतील शृंगारपूरचे राजे सूर्यराव सुर्वे, पालवणीचे जसवंतराव, सावंतवाडीचे राजे भोसले सावंत वगैरे फौजबंद सरदार फर्मानें पाठवून बादशाहाने बोलावून घेतलेच होते. कोकणांतील सर्व शत्रु महाराजांविरुद्ध उठविण्याची तर्तूदहि त्याने केली होती.

एवढेंच नव्हे, तर बादशाहाने दिल्लीस औरंगझेबाकडे एक अर्ज तातडीने रवाना केला[८] की, दख्खनच्या सलतनतींत भयंकर बेफाम झालेल्या शिवाजीला कायमचा नेस्तनाबूद करण्यासाठी मी फौज रवाना

करीत आहे;[५] तरी आपणहि जास्तींत जास्त कुमक आम्हास पाठवावी ! म्हणजे शिवाजीच्या सर्व शत्रूंचीं धरणें एकदम फोडून त्यांच्या सैन्य-प्रलयाखाली शिवाजीला पार बुडवून मारण्याचा बेत आदिलशाहाने आखला होता.

बादशाहाचा निरोप घेऊन ही अफाट फौज सिद्दी जौहरच्या मागोमाग निघाली.[७] पन्हाळगडाकडे ! मिरजेच्या मार्गाने !

महाराज मिरजेस होते. त्यांना या नव्या मोहिमेच्या बातम्या समजल्या. अपेक्षा होतीच. आता योजना काय करायची याचा विचार करून महाराजांनी निर्णय घेतला की, मिरजेचा वेढा उठवून पन्हाळगडास जावयाचें. कारण एवढ्या मोठ्या सेनेशीं मोकळ्या मैदानावर झुंजण्याची त्यांची ताकद नव्हती. चिरडले गेले असते. पण महाराजांनी पन्हाळगडास परत जाऊन तेथूनच सिद्दीशीं झुंजण्याचा विचार कां केला ? ते प्रतापगडावर किंवा राजगडावर कां नाही गेले ? त्यांनी यावेळीं पन्हाळगडच निवडला याचें कारण पन्हाळगड स्वराज्याच्या टोकावर होता. राजगड, प्रतापगड, पुरंदर हे किल्ले अत्यंत अवघड असले तरी ते स्वराज्याच्या ऐन गर्भांत होते. जर महाराज तिकडे गेले असते तर शत्रूचा लोंढाहि त्यांच्या मागोमाग स्वराज्यांत घुसून रयतेची धूळधाण उडाली असती. म्हणून शक्यतोवर शत्रूला राज्याच्या बाहेर किंवा सरहद्दीवरच सांभाळावें ही महाराजांची दृष्टि. आपण जाऊं तेथे शत्रु येणारच हें ओळखून सरहद्दीवरचा पन्हाळगडच महाराजांनी निश्चित केला.

शिवाय पन्हाळगड अत्यंत बळकट होता. अन् महाराजांनी असाहि विचार केला की, आता पावसाळा जवळ येत आहे. नेताजी पालकर बाहेर मोहिमा करीत आहे. आपण पन्हाळ्यांत गेल्यावर सिद्दी जौहर गडाला वेढा घालील. किती दिवस वेढा घालून बसेल तो ? नेताजी

बाहेरून त्याच्यावर हल्ले चढवील आणि पावसाच्या माऱ्यानेहि त्याचा वेढा धडपणें चालू शकणार नाही. सिद्दी यांतच हैराण होईल आणि मग त्याच्या ढिसाळलेल्या वेढ्यांतून आपण संधी साधून पळून गेलों की, सिद्दीच्या मोहिमेंतील निम्मा जोर खलास होईल. पुन्हा नव्या किल्ल्याला नवा वेढा घालून लढत राहण्याचें अवसान आणि उत्साह त्याच्यांत उरणारच नाही. असा सर्व विचार करून महाराजांनी पन्हाळगडावरच आश्रय घेण्याचें ठरविलें.

आणि महाराजांनी एके दिवशीं मिरजेचा वेढा उठविला आणि पन्हाळगडाकडे कूच केलें.[४] मिरजेच्या किल्लेदाराच्या मिशा मात्र उगीचच अभिमानाने वाऱ्यावर उडूं लागल्या !


महाराज पन्हाळगडावर दाखल झाले. गडावर भगवे झेंडे आणि गुढ्यातोरणें चढलीं होतीं. या दिवशीं चैत्र शुद्ध प्रतिपदा होती ( दि. २ मार्च १६६० ).

नवीन वर्षाचें नांव होतें, शार्वरीनाम संवत्सर !

* * *

---

**आधार**—(१) पसासंले. ८११ (२) पसासंले. ७९२. (३) शिभा २५।१ ते ९; पसासंले. ८१२. (४) पसासंले. ८१२. (५) शिचत्रसं. २ पृ. ३६. (६) शिभा २५। १२ ते २०. (७) शिभा २५।१२ ते २४. (८) शिभा २५। २४; ३२ ते ३४. (९) पसासंले. ८१२; शिभा २५।१३ व १४. (१०) पसासंले. ८०३. (११) पसासंले. ८०० व ८०१ (१२) पसासंले. ८०१ ते ८०३. (१३) पसासंले. ७९१, पृ. १७७ व लेखांक ८०१. (१४) पसासंले. ८०४ व ८०५. (१५) शिभा २५।३५ ते ५९. (१६) जेधेशका. (१७) शिचप्र. पृ.५०; सभासदब. पृ. ५. (१८) शिचसा ६ पृ. ६८. (१९) शिचसा ६ पृ ६८; शिचत्रसं. २ पृ. ६०. (२०) पसासंले. ८३६. (२१) पसासंले. ८०६.



# ५. वेढा पडला !

नवीन संवत्सराच्या प्रारंभींच भयंकर संकटें स्वराज्यावर येत होतीं. उत्तरेकडून तर एक अतिशय प्रचंड संकट येत होतें. आदिलशाहाच्या पत्रानुसार औरंगझेबाने अवाढव्य फौज महाराष्ट्रावर रवाना करण्याचा मनसुबा ठरविला होता.

विजापुराहून सिद्दी जौहरहि येतच होता.

धुळीचे लोट पन्हाळ्याकडे फुंफाटत निघाले. जौहरची फौज दौडत होती. समोर पन्हाळा आपल्या बुरुजाच्या अव्वळ मुठींत भगवा झेंडा फडफडवीत ताठ छाती काढून उभा होता. पन्हाळा दिसूं लागतांच जौहरच्या फौजेला नवाच उन्माद चढला. ती ओरडत होती. दौडत होती. डट के चलो ! डट के चलो !

एकदम हल्ला चढवून गड जिंकणें अशक्य आहे, हें जौहर जाणून होता. शिवाजी पन्हाळ्यावरच आहे, ही मुस्तकीम खबर त्याला होतीच. म्हणून गडाला वेढा घालून शिवाजी शरण येईपर्यंत झुंजत राहायचा बेत त्याने केला होता. किती काळ शिवाजी वरून लढेल ? अन्न आणि वैरण संपली की, खाईल काय ? तो आणि त्याची पागा अन्नावाचून एक दिवशीं खास तडफडूं लागेल ! त्या दिवसापर्यंत गडाला कडक वेढा घालून बसायचें. गड जिंकण्याचा प्रयत्नहि चालूच ठेवायचा. मुठींत नाक धरून शिवाजी शरणच येईल !

—अन् मुठींत तलवार धरून लढायला उतरला तर ?—तीहि

तयारी आहे ! शिवाजीला मारायचें तरी, किंवा धरायचें तरी ! मग वर्ष लागो वा वर्षें लागोत ! जौहरचा हा निर्धार होता.

जौहर येण्यापूर्वीच महाराज मिरजेचा वेढा उठवून पन्हाळ्यास पसार झाले होते. शिवाजी मिरजेहून पळून गेला, हा एक आपला फार मोठा विजयच झाला; तो जौहरच्या फौजेला भिऊनच पळाला, असें बादशाहाला वाटलें ! बादशाहाने ही आनंददायक वार्ता आपल्या मातबर सरदारांना कळविली ! त्यांतच महाराजांचे धाकटे सावत्र बंधु व्यंकोजीराजे यांनाहि कळविली ! त्या पत्राची तारीख होती, ३ मार्च १६६०.

पन्हाळगडाच्या पायथ्याशीं औरसचौरस खूपच मोठी छावणी पडली. तंबू-राहुटयांची दाटी लागली. पंख पसरून जणू बगळ्यांचा पांढरा शुभ्र थवा उतरला. चौफेर पक्का वेढा पन्हाळ्याला घालण्याकरिता जौहरने योजना केली आणि तातडीने फौजांचे आणि सरदारांचे मोर्चे बसविले.[१] थोड्याच वेळांत गडाला पूर्ण वेढा पडला. फाजलखान, बडेखान, रुस्तुमेजमान आणि स्वतः जौहर यांनी गडाच्या पूर्व बाजूस मोर्चे दिले. सादातखान, सिद्दी मसूद, बाजी घोरपडे आणि भाईखान यांनी पश्चिमेकडून नाकेबंदी केली. उत्तर आणि दक्षिण बाजूकडूनहि जौहरने कडक वेढा ठेवला.[१]

वेढ्यांतून गडावर तोफाबंदुकांचा व बाणांचा मारा सुरू झाला. गडावरून मराठ्यांनीहि जवाब दिला आणि उभय पक्षांत अशी मारगिरी सततच चालू राहिली. जौहरचा कोणताहि मारा गडावर कारिगार होईना. महाराज अत्यंत जागरूक होते. ते शत्रूला वर सरकूंच देईनात.[२] लक्ष्मणरेषा ! एका विशिष्ट टप्प्याच्या पुढे जाणें जौहरला जमेना. त्या टप्प्याच्या पुढे कोणी सरकला की, गडावरून सुटलीच तोफ ! सुटल्याच गोळ्या किंवा बाण ! जौहरचा मारा पोहोचेना.[२]

जौहरचें बळ मात्र सारखें वाढत होतें. शृंगारपूरकर सूर्यराव सुर्वे राजे व पालवणीकर जसवंतराव हे ससैन्य येऊन जौहरला सामील झाले.[३]

दोन आठवडे ओलांडले ( दि. १५ मार्च १६६० चा सुमार ). जौहर आणि फाजल एका गोष्टीचा सारखा विचार करीत होते. गडाच्या तटापर्यंत मारा पोहोचण्यासाठी काय करावें ? लांब पल्ल्याच्या तोफांची व बारुद गोळ्यांची आवश्यकता होती. पण तशा तोफा तर वेढ्यांत नव्हत्या. तेवढ्यांत जौहरला व विशेषतः फाजलला एक युक्ति सुचली. त्यांना राजापूरच्या इंग्रज वखारवाल्यांची आठवण झाली. हेन्री रीव्हिंग्टनशीं फाजलखानाचा व रुस्तुमेजमानचा पूर्वी पत्रव्यवहारांतून परिचय झालेला होता.[४] जर इंग्रजांकडून तोफा व दारूगोळा मिळाला तर—? पण हे इंग्रज फक्त व्यापारच करतात! राजकारणापासून अलिप्त असतात. मग कसे देतील मदत ते ? पण पैसा द्यायचें आपण कबूल केल्यावर देतीलहि कदाचित्! राजकारण म्हणून नव्हें, पण व्यापार म्हणून दारूगोळा अन् तोफा विकायला त्यांना कोणती हरकत आहे ? इंग्रज कुंपणीची म्हणून ही मदत न मिळाली तरी हेन्री रीव्हिंग्टनसाहेबाने व्यक्तिशः स्वतःची म्हणून अशी मदत द्यायला काय हरकत आहे ?

—असा उलटसुलट विचार करून जौहरने व फाजलने आपला एक मुतालीक चारशे स्वारांसह राजापुरास इंग्रजांकडे तातडतोब रवाना केला.[५] राजकीय भानगडींत भाग न घेणाऱ्या इंग्रज कुंपणींतील अधिकाऱ्यांनी ‘ व्यक्तिशः ’ राजकारणें केलीं तर काय हरकत होती ? ‘ व्यक्तिशः ’ हा शब्दच लबाडांसाठी लाखामोलाचा आहे !—— कित्येकदा राजकीय उचापतींत ‘ व्यक्तिशः ’ भाग घेणाऱ्या लबाड व्यक्तींनीच कांही ‘ कुंपण्या ’ गच्चच भरलेल्या असतात!

इंग्रजांची इस्ट इंडिया कुंपणी अशाचपैकी होती.

अनुक्र. २८४८२ वि: .... नों. दि: १२-२-५९
क्रमांक ....

## भाग चौथा

सिद्दी जौहरच्या मुतालिकानें त्वरेने राजापूर गाठलें. त्याने वखारींत जाऊन हेन्री रीव्हिंग्टनची भेट घेतली आणि जौहरचें पत्र व निरोप त्याला सादर केला. लांब पल्ल्याच्या तोफा व दारूगोळा आम्हीं खरेदी करावयास तयार आहोंत, तरी आम्हांला हा माल पुरवावा अशी जौहरची मागणी होती.

हेन्री विचारांत पडला. कारण जौहरला दारूगोळा व तोफा पुरविणें, म्हणजे शिवाजीच्या वैऱ्यालाच मदत करणें आहे. नुकतेंच अफजलखानाचें साधें गलबत सांभाळायला घेतलें, तर शिवाजीच्या लष्करी अधिकाऱ्याने कशी झणझणीत चपराक भडकावली. अन् आता जर प्रत्यक्ष दारूगोळाच त्याच्या शत्रूला पुरविला तर तो शिवाजी काय म्हणेल ?

—पण लगेच हेन्रीने खोलवर आणि दूरवर विचार केला ! —हा, शिवाजी तर आता अशा भयंकर चरकांत सापडला आहे की, त्यांतून तो निभावणें अशक्यच आहे. जौहरने अफाट फौजेनिशी त्याला पन्हाळगडांत कोंडून धरलें आहे. आणि उत्तरेकडून औरंगझेबाचीहि चौपट फौज शिवाजीचें राज्य नेस्तनाबूद करण्यासाठी येत आहे. इतरहि सर्व शत्रु त्याच्यावर उठले आहेतच.

—आता शिवाजी या भयंकर दुधारी चरकांतून जिवंत तरी सुटणें शक्य आहे काय ? मरणार ! नक्की मरणार ! अफजलखानाच्याच प्रसंगीं वास्तविक शिवाजी संपायचा ! परंतु खानच भोळसटासारखा वागला. पण आता मात्र शिवाजी खासच बुडणार !

—मग जर विजयाच्या हमखास मार्गावर असलेल्या सिद्दी जौहरला मदत केली, तर काय हरकत आहे ? उद्या विजापूरदरबारकडून व्यापारासाठी सवलती मिळतील ! वखारी घालायला मालकी हक्काने जागा मिळतील !

—काय हरकत आहे जौहरला मदत करायला? किंबहुना शिवाजीच्या शत्रूला या वेळीं मदत करणेंच शहाणपणाचें! दूरदर्शीपणाचें!

हेन्रीने आपल्या मुत्सद्देगिरीची अशाप्रकारें लांबी, रुंदी, उंची मोजली. हेन्रीच्या महत्त्वाकांक्षा पालवल्या गेल्या. तोंडाला पाणी सुटलें. आणि त्याने जौहरच्या मागणीला एकदम होकार दिला![६] सुरतेच्य गव्हर्नरची परवानगीसुद्धा मागण्याची जरूरी त्याला वाटली नाही. त्याने 'व्यक्तिशःच' हा निर्णय घेतला! अवघ्या दीडच महिन्यापूर्वी आपण शिवाजीशीं काय करार केला आहे, हें लक्षांत असूनहि हेन्री शिवाजी-महाराजांच्या विरुद्ध उठला. दारूगोळा देण्याचें त्याने कबूल तर केलेंच, पण याशिवाय इंग्रज गोलंदाजहि पाठविण्यास तो तयार झाला! इतकेंच नव्हे, तर तो स्वतःहि पन्हाळ्याच्या वेढ्यांत जाण्यास निघाला! इतर साहेबमंडळीहि नव्या निमंत्रणाने खूष झाली. चला पन्हाळ्यावर! अहो, पण तो शिवाजी काय म्हणेल? छेः! आता शिवाजीला कोण भितो?

पाहिलेत हे इंग्रज कसे होते ते! राजकारणाशीं संबंध न ठेवणारे निरुपद्रवी वाणी बरें! खरोखर या इंग्रजांसारखे लबाड लोक फक्त इंग्रजच. रंगाने गोरे गोरे, डोळ्यांनी घारे घारे, बोलायला गोड अन् पोटांत खोड! यांच्या काळजांत काय दडलें आहे, हें कोणालाहि समजायचें नाही! महा बिलंदर! तागडी तोलतां तोलतां सदैव तिरक्या नजरेने यांचा डोळा राजकारणावर असायचाच. आता तर गिऱ्हाईक घरीं चालून आलें होतें.

निघण्याची तयारी झाली. इंग्रज गोलंदाजांची एक लहानशी तुकडी, एक मोठी थोरली तोफ, दारूगोळ्यांचे पेटारे आणि इतर सामानसुमान राजापूरच्या वखारींतून बाहेर पडलें. आणि विशेष म्हणजे इंग्रजांचें युनियन जॅक नांवाचें निशाणहि फडफडत बाहेर पडलें! आपलें निशाण फडकावीत फडकावीतच जौहरला मदत करण्याचा हेन्रीचा हेतु होता![७]

हेन्री राजापुराहून निघाला ( दि. २ एप्रिल १६६० ). आणि रायपाटण–अणस्कुऱ्याच्या घाटाने सह्याद्रि चढूं लागला.[७] एवढ्या मोठ्या उंच डोंगरघाटाने ती प्रचंड तोफ चढून जाणार होती. उन्हाळ्याचे दिवस होते. हेन्रीच्या दिमतीला जौहरने पाठविलेले चारशे स्वार होते.

अखेर जमिनीला भेगा पाडीत पाडीत ती प्रचंड तोफ कोल्हापुरांत दाखल झाली. सिद्दी जौहरने हेन्रीचें मोठ्या थाटांत स्वागत केलें.[८] लगेच ती तोफ आणि इंग्रजी पाहुणे इंग्रजी तालावर पन्हाळ्याच्या पायथ्याशीं वेढ्यांत येऊन दाखल झाले[८] ( दि. १० एप्रिल १६६०च्या सुमारास ).

*'अलिप्तां'चें धूर्त राजकारण...*



लगेच जौहरने हेन्रीला व्यापारी भाषेंत राजकारणी मधाचें एक बोट चाटविलें ! तो त्याला म्हणाला की, तुमचा माल पसंत पडल्यास आणखी मागणी करूं ![८] पण सर्वजण उत्सुक झाले होते तोफेचा धडाका पाहाण्यास ! इंग्रजांच्या तोफेमुळे वेढ्यांत उत्साहाच्या ऊर्मि उमटत होत्या. इंग्रजांचा इंतजाम उत्तम होता. हेन्रीच्या बरोबर मिंघॅम, फिलिप गीफर्ड, वेलजी वगैरे मंडळी होती.

कांही वेळानंतर इंग्रज गोलंदाज, हेन्री रीव्हिंग्टन व सिद्दी जौहर तोफेची परीक्षा पाहाण्यासाठी बाहेर पडले. लोकांनी ती प्रचंड तोफ ओढून, ओढून, रेटून मोर्चांत आणली. पन्हाळगडाच्या तटाचा वेध घेऊन गोलंदाजांनी तोफ 'फिक्स्' केली. तिच्या पोटांत दारू व गोळा ठासून इंग्रज उभे राहिले. तेवढ्यांत हेन्री रीव्हिंग्टनने तोफेच्या शेजारीं आपलें युनियन जॅक फडकावलें.[९] उघड उघड निशाण लावून इंग्रजांनी महाराजांशीं वैर जाहीर केलें. तें विस्तवाशींच वैर ! पण आपण काय करीत आहोंत हें त्या इंग्रजांच्या डोक्यांतहि येत नव्हतें. इंग्रज धुंद झाले होते.

गडावर महाराजांची चिंताक्रांत शतपावली चालू होती.

हेन्रीने इशारत दिली. तोफेला बत्ती मिळाली आणि—धडाड धड्ड्ड्ड्ड् !—धडाका उडाला ! केवढा प्रचंड आवाज तो ! धुराचा लोट उसळला. तटाच्या रोखाने लालबुंद गोळा उडाला.

एवढा मोठा आवाज टाकणारी तोफ गनिमाच्या छावणींत आली तरी केव्हा ? गडावर हें कुतूहल निर्माण झालें. आणि पाहातात तों इंग्रज टोपीवाल्याचा झेंडा फडफडतोय ! शेजारींच एक मोठी थोरली तोफ खुद्द इंग्रजच डागीत आहेत !

महाराजांना समजलें ! इतक्या निर्लज्ज दिमाखांत इंग्रज तोफेची सरबत्ती करीत आहेत, हें पाहून महाराजांच्या तळपायाची आग

मस्तकाला गेली. दीड महिन्यापूर्वी ज्यांच्यावर मेहेरबानी केली तेच हे कृतघ्न इंग्रज ! यांचा माल परत केला. यांचा माणूस सोडून दिला. आजवर यांचा व्यापार नीट चालूं दिला, त्या उपकाराची ही फेड ! गाईच्या आचळाला चिकटलेले गोचीड अखेर तिचें रक्तच पितात ! दूध आवडत नाही त्यांना !

इंग्रजांच्या गोलंदाजीने पन्हाळ्याला मात्र कांहीच इजा पोहोचत नव्हती. त्यांच्या गोळ्यांमुळे कांहीच वेगळें घडलेलें नव्हतें. पन्हाळगडाचा बंदोबस्त महाराजांनी अव्वल ठेवला होता.

पण हे इंग्रज तर बोलूनचालून परकेच. सिद्दी जौहरहि परकाच. परक्याला परका सामील झाला तर नवल नाही. पण परक्याला जर कोणी घरचाच सामील झाला तर त्याला काय म्हणावें ? परंतु अशा घरच्याच दावेदारांचें पीक आमच्याकडे फार. शृंगारपूरकर सुर्वे आणि जसवंतराव पालवणीकर हे तर प्रथमपासून बादशाहाचे जहागीरदारच होते. महाराजांशीं आणि स्वराज्याशीं वैर करणें हें त्यांचें कर्तव्यच होतें ! त्याला नांव द्यायचें 'स्वामीभक्ति !' पण इतरहि कांही लाचार पोटभरूंच्या पोटांतून बादशाही प्रेमाचा उमाळा उठत होता. असेच हे दोन नमुनेदार प्राणी पाहा. एकाचें नांव होतें, गोंदाजी पासलकर. हा मोसें खोऱ्यांतील राहाणारा. बाजी पासलकरांचाच बिरादर. फरक मात्र इतका मोठा की, बाजींनी स्वराज्यासाठी लढतां लढतां प्राण अर्पण केला आणि या गुणी गोविंदाने स्वराज्याच्या शत्रूशीं संगनमत चालविलें होतें. त्याने याच वेळीं बादशाहाला पाठविलेल्या अर्जातील पुढील ओळी पाहा[१०] :

'........मौजे सायतन हा गाव मला इनाम मिळावा. तसेंच मौजे वरसगाव येथे शंभर बिघे शेरी जमीन आणि मौजे जांभळी येथे ऐंशी बिघे शेरी जमीन मला इनाम मिळावी. म्हणजे मी सलाबतखान सिद्दी जौहरबरोबर खरी मसलत व चाकरी करीन.....'

चिमूटभर स्वार्थाकरिता केवढें हें पाप !

दुसऱ्या प्राण्याचें नांव होतें, केदारजी देशमुख ऊर्फ खोपडे. खंडोजी खोपड्यांचे हे भाऊबंद. याने बादशाहाला केलेला हा पाहा अर्ज.[११]

'.......मौजे नेर व पळसोसी हीं गांवें मला इनाम मिळावींत. भागवडी येथील पांच बिघे....मिळावेत. म्हणजे मी सलावतखान सिद्दी जौहरबरोबर बादशाही मसलत करीन.. . '

या दोघांचेहि अर्ज अली आदिलशाहाने एकदम मंजूर केले. करणारच. महाराष्ट्राच्या अस्तनींतील निखारे फुलवायची संधी महाराष्ट्राचा आणि महाराजांचा शत्रु कधीतरी सोडील काय ? बादशाहाने दोघांनाहि कृपेचीं फर्मानें एकाच दिवशीं पाठविलीं ( दि. ९ मार्च १६६० ).

जौहरचें बळ अहिरावणासारखें वाढत होतें, तें हें असें.

गडाचा वेढा भेदून इकडची पाकोळीसुद्धा तिकडे जाऊं शकत नव्हती. महाराजांना बाहेरची कांहीहि खबर मिळूं पावत नव्हती. गडावरच्या कांही मंडळींनी गडांतून बाहेर पडून वेढ्यांतून निसटण्याचा प्रयत्न एकदा करून पाहिला. परंतु ते सर्वजण शत्रूकडून ठार मारले गेले !

जौहरने दोन गोष्टी फार महत्त्वाच्या केल्या होत्या. एक म्हणजे पन्हाळा-गडाच्या वायव्येस असलेल्या खेळणा ऊर्फ विशाळगड किल्ल्यालाहि त्याने मोर्चे देवविले होते. सूर्यराव राजे सुर्वे व जसवंतराव पालवणी-कर या दोघां सरदारांना त्याने विशाळगडच्या मोर्चेबंदीस ठेविलें होतें.[१२]

जौहरने केलेली दुसरी गोष्ट अत्यंत महत्त्वाची व तितकीच त्याच्या दक्ष कारभाराची निदर्शक होती. पावसाळा जवळ येत होता. पन्हाळ्याखाली पाऊस फार. या पावसांतहि वेढा अत्यंत नेटाने व बिनदिक्कत चालावा म्हणून त्याने सैन्यासाठी व मोर्च्यांसाठी पावसाळी छपरें बांधावयाचें काम सुरू केलें.[१३] धो धो पावसांतहि वेढा शिथिल पडूं नये म्हणून ही व्यवस्था.

बादशाहाचे जौहरला वारंवार इशारेहि येत होते की, अत्यंत सावध राहा. तो शिवाजी फार लबाड आहे. तो काय डाव करील याचा नेम नाही. म्हणून डोळ्यांत तेल घालून सावध राहा !

गडावर महाराज आशा करीत होते की, जौहरच्या वेढ्यावर बाहेरून नेताजी पालकर हल्ले चढवील आणि जौहरचा वेढा विस्कटेल. ती संधी आपल्याला साधतां येईल. पण अजूनहि नेताजीची चाहूल ऐकूं येत नव्हती.

आकाशांत पावसाळ्याचीं पावलें वाजूं लागलीं होतीं. वैशाख संपला होता. ज्येष्ठ उगवला होता.

* * *

---

**आधारः**—(१) शिभा २५।१२ ते २४; शिचवृसं २ । पृ. ३६; पसासंले. ८१२; जेधेशका. (२) शिभा २५।२५ व २६. (३) शिभा २७।३३ व २६. (४) पसासंले. ८०२ व ८०३. (५) पसासंले. ८१२. (६) पसासंले. ८१३, ८१५ व ८२२. (७) पसासंले. ८१३; ८१५ व ८७४. (८) पसासंले. ८१५. (९) पसासंले. ८७४. (१०) ऐफासाखं. २।३४. (११) शिचसा ४।६८८. (१२) शिभा २७।२६ ते २८. (१३) पसासंले. ८२६.



# ६. औरंगझेब

विजापुराहून बादशाह अली आदिलशाहाने औरंगझेबाकडे पाठविलेला अर्ज दिल्लींत दाखल झाला. आदिलशाहाने शिवाजीमहाराजांचा अगदी कायमचा नायनाट करून टाकण्याचा मुस्तकीम इरादा मनांत धरला होता. सिद्दी जौहर व फाजलखान यांना पन्हाळ्याकडे हमराह पस्तीस हजार फौज बतौरे-इमदाद रवाना केलेंच होतें. शिवाय दिल्लीला हा अर्जहि सादर केला होता.[1] या अर्जाचा आशय असा होता की, कोहस्तानी दख्खनमध्ये शिवाजी भोसला खुद मुख्तार काफिरी सलतनतीची बुनियाद घालूं पाहात आहे. इस्लाम आणि इस्लामी रियासत यांच्या हिताच्यां दृष्टींने ही गोष्ट काफी खराब आहे. शिवाजी पुरा पुरा धोकेबाज आहे. तरी त्या बागी शिवाजीस मातीस मिळविण्यासाठी आपण जास्तींत जास्त फौजेसह एखादा तजरुबेकार शाही सिपहसालार दख्खनमध्ये पाठवावा अशी इल्तेजा आहे. आम्हीं आमची फौज शिवाजीवर रवाना करीत आहोंत. आपणहि फौज पाठवावी. दोघांनी मिळून शिवाजीला डुबविण्याचा हाच जरींन मौका आहे. खयाल केला जावा.

आदिलशाहाच्या अर्जाचा विचार औरंगझेब करूं लागला. सदैव हातांत असलेल्या त्याच्या जपमाळेचे मणी झर झर सरकूं लागले. माळेंतील एकेक मणी म्हणजे मोंगली डावपेच ! औरंगझेबानेहि असा विचार केला की, आदिलशाहाची फौज आणि सरदार शिवाजीवर गेलेच आहेत. तेव्हा आपणहि जर आताच फौज पाठविली तर बगावतखोर शिवाजीला जहन्नमरसीद करण्याचा मौजू मोका साधतां येईल.

औरंगझेबाचा महाराजांवर अतिशय राग होता. कारण तीनच वर्षांपूर्वी महाराजांनी औरंगझेबाचीं दोन ठाणीं लुटून आणलीं होतीं.[२] पहिलें ठाणें जुन्नरचें ( दि. ३० एप्रिल १६५७ ). आणि दुसरें अहमदनगरचें ( दि. ४ जून १६५७ ). या दोन्ही छाप्यांत मिळून महाराजांनी नऊशे घोडे, कापडचोपड, जडजवाहीर व चाळीस लाख रुपयांहूनहि अधिक रकमेचा खजिना पळवून आणला होता ! त्यावेळीं औरंगझेबाचा मुक्काम बीदरला होता. औरंगझेब त्याच वेळीं महाराजांवर फार संतापला होता. परंतु तो त्यावेळीं कांहीच करूं शकला नाही. कारण त्याचा बाप शाहजहान बादशाह आजारी पडला होता[३] व बादशाही तख्त मिळविण्याकरिता त्याला दिल्लीला जाण्याची घाई होती. महाराजांवरचा राग मनांत ठेवूनच तो दिल्लीला गेला.

साऱ्या भावांचे आणि पुतण्यांचे मोठ्या कलात्मक रीतीने मुडदे पाडून आणि बापाला आग्र्यांच्या किल्ल्यांत डांबून टाकून आता औरंगझेब निर्धास्त झाला होता. अफजलखानाच्या स्वारीपासूनच त्याचें लक्ष दक्षिणेकडे व विशेषतः महाराजांकडे वळलें होतें. अफजलखान हा विजापूरदरबारचा सरदार. औरंगझेबाचा अफजलखानावरहि अतिशय राग होता. कारण त्याने बीदरच्या स्वारीच्या वेळीं (इ.१६५७) औरंगझेबाला इतक्या कोंडींत घेरलें होतें की, त्यावेळीं औरंगझेब अफजलच्या हातून ठार तरी झाला असता किंवा कैद तरी झाला असता. पण मोठ्या भाग्याने व खान मुहम्मदाच्या कृपेने औरंगझेब त्यावेळीं निसटूं शकला.[४] पण त्याचा अफजलवर राग मात्र कायम होता. अफजल–शिवाजी समरप्रसंगांत कोणीहि ठार झाला किंवा विजयी झाला तरी औरंगझेबाला हसूंहि आलें नसतें अन् आसूंहि आलें नसतें. किंवा असें म्हणतां येईल की, खान ठार झाल्यामुळे औरंगझेबाला समाधान वाटलें, पण शिवाजी बचावल्यामुळे त्याला अत्यंत असमाधान वाटलें ! दोघेहि

मेले असते, म्हणजे मात्र तो परमेश्वरावर खूष होऊन गेला असता !

पण आता शिवाजीचा काटा काढायलाच पाहिजे, हें जाणून आदिलशाहाच्या अर्जाला त्याने मान डोलविली आणि शिवाजीला भरडून काढण्याइतकी अपरंपार फौज व जंगी साहित्य रवाना करण्याचा मनसुबा केला. पण सरदार कोण पाठवावा ? बा-हिम्मत, दिलेर, वाकिफे-फने-अरब, तजरुबेकार आणि वफादार जंगबहादूर हवा होता कोणीतरी. अर्थात् मोंगल दरबारांत अशा बहादुरांना तोटा नव्हता ! पण औरंगझेबास औरंगाबाद येथे दख्खनच्याच सुभ्यावर सुभेदार असलेल्या एका अत्यंत बड्या सरदाराचीच याद आली. हा सरदार म्हणजे फारच बडा होता. औरंगझेबाची दुसरी प्रतिमाच ![५] औरंगझेबाचा नातलग. प्रत्यक्ष मामाच ! अमीर-उल्-उमरा नबाबबहादूर मिर्झा अबू तालीब ऊर्फ शाइस्तेखान !

शाइस्तेखान केवळ बादशाहाचा मामा होता म्हणूनच बडा होता असें नव्हे. तर तो खरोखरच थोर मुत्सद्दी, शूर सेनापति आणि अनुभवी शासक होता. सध्या त्याचा मुक्काम औरंगाबादेस होता.

औरंगझेबाने ताबडतोब शाइस्तेखानास मोहिमेविषयी एक फर्मान तहरीर केलें. शिवाजीला नेस्त व नाबूद करण्याची तमन्ना व्यक्त केली. दख्खनच्या या स्वारीकरिता औरंगझेबाने अफाट घोडदळ, पायदळ, तोफखाना आणि तमाम शाही हरबे-जंग मंजूर केला. शिवाय जी जी मदद शाइस्तेखानास दरकार असेल ती ती फौरन रवाना करण्याचा हुकूम दिला.

औरंगझेबाने महाराजांवर सोडलेली ही पहिलीच लाट. आता त्याचें लक्ष सतत दख्खनकडे आणि महाराजांकडे लागून राहिलें होतें. जपमाळ घेऊन तो सतत जप करीत असे. पण आता प्रत्येक मण्यागणीक खुदाचें नांव ओठांतून यायच्या ऐवजी, शब्द उमटत असेल— शिवाजी ! शिवाजी ! शिवाजी !

औरंगझेबाच्या दृष्टीने महाराजांचा सर्वांत भयंकर गुन्हा एकच होता——महाराज काफीर होते !

शाइस्तेखानासाठी नवाब औरंगझेबाचें फर्मान दिल्लीच्या लाल किल्ल्यांतून चौखूर दौडत निघालें. खान औरंगाबादेस होता.[5]

खानाला फर्मान मिळालें.[7] शिवाजीवर मोहीम म्हणजे हमखास फत्ते ! शिवाजीपाशी अशी असून असून किती फौज असणार ? शिवाय विजापूरकरांची पस्तीस हजार फौज लोटलीच आहे त्याच्यावर. खानास शिवाजीचा प्रश्न सोपा वाटला. लगेच मोहिमेची तयारी करण्याचा त्याने हुकूम सोडला.

आता मात्र आठहि दिशांनी संकटांचे ढग स्वराज्यावर गोळा होऊं लागले. फौजांचा आणि शस्त्रास्त्रांचा सर्व बाजूंनी महाराजांवर मारा करून महाराजांसकट मराठी राज्याच्या चिंधड्या उडविण्याचा हा आसुरी डाव होता. एका बाजूने विजापूर दरबार आणि दुसऱ्या बाजूने दिल्ली दरबार सर्व बळानिशी स्वराज्यावर उठल्यावर आता या एवढ्याशा स्वराज्याचें होणार तरी काय ?

औरंगाबादेहूनहि फौज निघणार, ही बातमी महाराजांच्या शत्रूंना समजल्यावर आनंदीआनंद पसरला त्यांच्यांत. आदिलशाहाहि खूष झाला. आजपर्यंत चडफडत हात चोळणारे हात टाळ्या पिटूं लागले.

शाइस्तेखानाची फौज तयार झाली. केवढी अफाट फौज ती ! औरंगाबादेबाहेर जणू आणखी चार पांच शहरें एकवटून बसल्यासारखीं दिसत होतीं. एकूण सत्याहत्तर हजार घोडेस्वार[8] आणि सुमारें तीस हजार पायदळ जय्यत तयार होतें. कझाकी, पठाणी, उझबेगी, गोंड, बख्सारी, अरबी, मोंगली, रजपुती, बुंदेली वगैरे अत्यंत नामांकित जातींचे धिप्पाड लढवय्ये शेर या फौजत होते.[9]—आणि मराठेसुद्धा !

औरंगाबादेशेजारच्या देवगिरी किल्ल्याला तो सेनासमुद्र दिसत होता.

हा समुद्र महाराष्ट्राचें स्वराज्य बुडवावयासाठी जाणार हें समजल्यावर देवगिरीचा प्राण नक्की कळवळला असेल. कारण इ. १३१८ मध्ये, म्हणजे तीनशे बेचाळीस वर्षांपूर्वी अशाच शत्रुसमुद्राच्या लाटा देवगिरीचें स्वतंत्र सिंहासन बुडवून गेल्या होत्या. पारतंत्र्याच्या वेदना त्याला ठाऊक होत्या. त्या तो अजूनहि सहन करीत होता.

* * *

---

**आधारः**—(१) शिभा २४।२४; शिभा २५।३२ ते ३४. (२) जेधेशका; सभासदब. पृ. ५; पसासंले. ७३९. (३) औरंगनामा १, पृ. ३१. (४) राजा शिवछत्रपति भा. ३ पाहावा. (५) सभासदब. पृ. ३१; शिभा २५।३४. (६) शिभा २५।५७ ते ५९; सभासदब. पृ. ३१. (७) शिचत्रसं. ३, पृ. २०.



# ७. नवाब शाइस्तेखान

स्वारीची मुनज्जम तयारी झाली. हरावल फौजेचे झेंडे पहिल्या मंझीलवर रवाना झाले. पुढच्या मुक्कामासाठी पेशखाना रवाना झाला. कूचाची नौबत दणाणूं लागली. नवाब शाइस्तेखान निघाला. एका मागोमाग एकेक सरदार निघाले. खानाच्या हुकमतीखाली एकूणएक सरदार मोठमोठ्या लढाया गाजविलेले होते. त्यांची जरब मोठी होती. ती तोफांची रांग, पलीकडे ती हत्तींची रांग आणि ही सरदारांची रांग! नांवांवरून पाहा त्यांची ऐट आणि नूर! हा पहिला सरदार आहे शमसखान पठाण. हा मोंगल रियासतींतील विख्यात पराक्रमी आणि तितकाच मानी योद्धा आहे.[१] त्याच्याहून शूर, किंबहुना अजिंक्य असलेला हा पाहा दुसरा जवान, नामदारखान.[१] हा तिसरा—

—पण अशी प्रत्येकाची तारीफ कुठवर सांगायची? प्रत्येक बहादूर असाच रुस्तुम होता. गयासुदीखान, हसन मुनीम, सुलतान मिर्झा, मनचेहर, तुरूकताजखान, कुबाहतखान, हौदखान, इमाम बिरूदीखान, लोदीखान, दिलावर मौलद, अबदुल बेग, खोजा सुलतान, सिद्दी फत्तेखान, फत्तेजंग, कारतलबखान, गाजीखान, भावसिंह, किशोरसिंह, शामसिंह, राजा गिरिधर मनोहर, राजा प्रद्युम्न, राजा अनिरुद्ध, राजा पुरुषोत्तम, राजा गोवर्धन, राजा राजसिंह गौड, राजा बीरमदेव सिसोदिया, रामसिंह आणि रायसिंह सिसोदिये, राजा अमरसिंह चंद्रवत, चांदाच्या गोंड राजाचा सेनापति अरिंदम,[२] शाइस्तेखानाचा मुलगा अबदुल फत्तेखान.[३] या सरदारांत खोजा भंगड या नांवाचाहि

एक सरदार होता ![२]

—आणि ही पाहा ओळखीची मंडळी! सूरजी गायकवाड, दिनकरराव काकडे, रंभाजीराव पवार, सर्जेराव घाटगे, कमळोजीराव कोकाटे, जसवंतराव कोकाटे, त्र्यंबकराव खंडागळे, कमळोजीराव गाडे, अंताजीराव खंडागळे आणि दत्ताजीराव खंडागळे. शहाण्णव कुळीची मऱ्हाटे मंडळी ही! महाराजांपेक्षा शाइस्तेखानच यांना जवळचा वाटत होता.

—आणि या मंडळींना ओळखलेंत का? हे त्र्यंबकजीराजे भोसले, हे जिवाजीराजे भोसले, हे बाळाजीराजे भोसले, हे परसोराजे भोसले.[५] ही खाशी खाशी भोसले मंडळी महाराजांच्या रक्ताची भाऊबंद होती. हे सर्वजण महाराजांचे सख्खे चुलतभाऊ, चुलते, पुतणे, चुलत चुलते असेच नातलग होते. पण—काय लिहायचें आता?

—आणि तें पाहा केवढें आश्चर्य! एक कोणीतरी स्त्री घोड्यावर बसून चालली आहे!

स्त्री? शाइस्तेखानाच्या मोंगली फौजेंत एक अस्सल महाराष्ट्रीय ब्राह्मण स्त्री?

होय! हीच ती माहूरची महशूर महिला, पण्डिता रायबागन! या बाईची बहादुरी आलमांत रोशन होती. ही बाई अत्यंत कर्तबगार होती. धार्मिक होती. मुत्सद्दी होती. अत्यंत अभिमानी होती. परंतु तो अभिमान होता मोंगल सुलतानांच्या सेवेचा. नवरा मेल्यापासून ती पदर बांधून आणि तलवार घेऊन मोंगलांच्या फौजेंत हजर राहात आली होती. बाईची जात असूनहि तिने समशेर हातीं घेतली म्हणून तिचें कौतुक करावें की, स्वराज्याची वैरीण झाली म्हणून तिला शिव्याशाप द्यावेत?

हिचें खरें नांव सावित्रीबाई.[६] वऱ्हाडांतील माहूरच्या राजे उदाराम देशमुखांची ही बायको.[७] राजे उद्धवराव राम ऊर्फ उदाराम हे मोंगल-

शाहींतच मोठे झाले. आणि मोंगलांची सेवा करीत करीतच मरण पावले ( इ. १६३२ ). त्यांचा मुलगा राजे जगजीवनराव हा तर मोंगलांशीं इतका तन्मय होऊन गेला होता की, त्याचें बोलणें, वागणें, आवडीनिवडी आणि संपूर्ण राहाणीच शुद्ध मोंगली पध्दतीची असे![८] तो बादशाहाची सेवा खरोखरच मनःपूर्वक करीत असे. औरंगझेबाने भावांना मारून राज्य बळकावण्याकरिता केलेल्या लढायांत जगजीवनराव औरंगझेबाच्या बाजूने लढला. औरंगझेबाकरिताच लढतां लढतां मेला ( इ. १६५८ ).

आणि मुलाच्या मृत्यूनंतर आपल्या बाबूराव नांवाच्या लहान नातवाला बोटाशीं धरून सावित्रीबाई औरंगझेबाची चाकरी जातीने करीत होती. नवऱ्याच्या आणि पुत्राच्या मागोमाग नातवालाहि बाळकडूं मिळत होतें, मोंगलांच्या सेवेचेंच. जिजाबाई आईसाहेब आणि सावित्रीबाई ऊर्फ रायबागनसाहेब या दोघींतील फरक हा असा! दोघीहि वऱ्हाडांतील पऱ्हाटीच्या मुलखींच्याच. पण तफावत ही अशी. पहिलीने वऱ्हाडच्या कापसाचा पोलादी पीळ सुलतानांना दाखविला, तर दुसरीने जीवनाची फुलवात सुलतानी तख्तापुढे आमरण जळत ठेवली. एकीने आपल्या मुलाला शिकविली बंडखोरी, तर दुसरीने शिकविली मूर्तिमंत गुलामगिरी! मुजरेबाजी!

वऱ्हाडांतील माहूर, पुसद, वाशीम, मालेगांव, तुळशी वगैरे भागाची जहागीर ही बाई एकटी सांभाळीत होती.

वऱ्हाडांतील मोंगली राज्यांत एकदा हरचंदराय नांवाच्या एका सरदाराने बंड केलें. वऱ्हाडांत सहसा बंडें, दंगे, क्रांति वगैरे प्रकार घडत नसत. अल्लाउद्दीन खलजीपासून औरंगझेबापर्यंतचा सुलतानी अम्मल सुरळीत चालत आला होता. पण या हरचंदरायाने अपशकुन केला. बंड पुकारलें त्याने. औरंगझेबाने तावडतोब माहूरला उदाराम बहादुरांकडे,

हें बंड मोडण्याचा हुकूम पाठविला. या वेळीं राजांच्या घरीं कर्ता पुरुष कोणीच नव्हता. आता ?

सावित्रीबाईने स्वतः पदर बांधला. माहूरच्या डोंगरावरून फौज घेऊन ती जातीने चालून निघाली. तिने आपल्या निशाणाच्या काठीला चोळी बांधली आणि आपल्या सैनिकांना उद्देशून म्हणाली की, मी चोळीचा झेंडा करून दुष्मनांवर चालून निघालें आहें; तुम्ही तर पुरुषासारखे पुरुष आहांत ! तुमचा पराक्रम माझ्यापेक्षा जास्त असला पाहिजे ! शर्थीने लढा ! दुष्मन मारून काढा ! जिंका ! या तुमच्या बहिणीच्या चोळीची लाज राखा ![९]

आणि खरोखर तिच्या त्या शिलगावणीने तिचें सैन्य शर्थीने लढलें. तीहि जातीने लढली. आणि हरचंदरायाचा पुरा मोड झाला ! एक जबरदस्त बंडखोर खलास झाला.

आणि औरंगझेबाचे वऱ्हाडवरील राज्य सुखरूप टिकलें !

या तिच्या पराक्रमावर खूष होऊन औरंगझेबाने तिला ' पंडिता ' आणि ' रायबागन ' असे दोन किताब बहाल केले.[७] रायबागन म्हणजे राजव्याघ्री ! खरोखरच ती वाघिणीसारखी शूर होती. माहूरची वाघीणच होती ती, पण वैरीण बनली होती स्वराज्याची आणि महाराजांची.

वऱ्हाडांतील आणखी दोन विलक्षण शूर व्यक्ति शाइस्तेखानाच्या सरदारांत तोऱ्याने चालत होत्या. सिंदखेडचे दत्ताजीराजे जाधवराव आणि रुस्तुमरावराजे जाधवराव.[१०] हीं तर आईसाहेबांच्या माहेरचीं,—महाराजांच्या आजोळचीं माणसें ! आपल्या भाच्याचें व बहिणीचें कौतुक करायचें सोडून त्यांचा निःपात करावयासच सजले होते. यादवांच्या घराण्यांत कृष्ण जन्माला यायच्याऐवजी कंस जन्माला येऊं लागावेत काय ? स्वराज्य स्थापन करण्याकरिता जिवाचें रान

करणाऱ्या महाराजांना स्वजनांचाच विरोध ! मराठ्यांचें स्वतंत्र सिंहासन येथे निर्माण होतांच कामा नये हा यांचा हट्ट ! शिवाजीचा नाशच झाला पाहिजे हा यांचा आग्रह !

शाइस्तेखानाने आपल्या या अफाट फौजेसह स्वराज्याच्या रोखाने कूच केलें (दि. २८ जाने. १६६०). त्याने औरंगाबादेंत मुख्तारखानास ठेवलें. रणवाद्यांच्या दणदणाटांत खान निघाला. तोफखानाहि खूप मोठा होता. फीलनाळा ( हत्तींवरील तोफा ), शुत्तरनाळा ( उंटांवरील तोफा ), जेजाले, आराबा, गर्नाळा, घोड्यावरील तोफा, बारुदाच्या भांडत्या गाड्या तोफखान्याबरोबर होत्या. तर्बीयतखान नांवाचा एक फार मोठा वाकबगार सरदार तोफखान्याचा मुख्य अधिकारी होता.

माणसांचा तर जणू समुद्रच वाहात होता. सत्त्याहत्तर हजार घोडेस्वार, सुमारें तीस हजार पायदळ आणि नोकरपेशा ( बाजारबुणगे वगैरे ) तर अगणितच. इतकीं तोंडें खाणारीं होतीं. अन्नधान्य किती लागत असेल ? सामानसुमान—आता काय काय तपशील सांगू ? हत्तींची तर जणू प्रचंड जिवंत भिंतच चालूं लागली. केवळ फरासखान्याचे उंटच शंभर होते ! भांडते हत्ती चारशे होते. शिवाय इतर केवढा पसारा ![११]

शाइस्तेखान औरंगाबादेहून निघाला आणि चौदा दिवसांनी अहमदनगर येथे पोहोचला ( दि. ११ फेब्रु. १६६० ). त्यावेळीं महाराज मिरजेच्या किल्ल्याला वेढा देऊन बसले होते. खानाच्या अफाट स्वारीच्या बातम्या व सिद्दी जौहरच्या बातम्या त्यांना पोहोचत होत्या. एकाच वेळीं जवळ जवळ दीड लाखाहून अधिक फौज दोन दिशांनी स्वराज्यावर घसरत होती ! महाराजांचें बळ किती होतें ? पायदळ व घोडदळ मिळून जास्तींत जास्त पंधरा हजार फौज होती महाराजांची ! दीड लाखाच्या शत्रूपुढे पंधरा हजारांचा काय हिशेब ! शत्रूच्या बातम्या ऐकून महाराजांना काय वाटलें असेल ? महाराज घाबरले काय ?

अजिबात नाही! अजिबात नाही! त्यांच्या हिमतीची खरोखर कमाल! धन्य धन्य! सर्व परकीय व स्वकीय शत्रु एकवटून या वेळीं उठले होते. महाराज सह्याद्रीच्या कड्यासारखे ताठ उभे राहून सर्वांच्या पराभवाचा विचार करीत होते!

शाइस्तेखान अहमदनगरास तेरा दिवस राहिला आणि चौदाव्या दिवशीं (दि. २५ फेब्रु. १६६०) नगरहून त्याने कूच केलें. आता स्वराज्याची हद्द अगदी नजीक होती. चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या दुसऱ्याच दिवशीं खानाचीं पावलें स्वराज्यांत पडलीं. खान स्वराज्यांत घुसला (दि. ३ मार्च १६६० मुक्काम सोनवडी).

आणि स्वराज्याची 'मोंगलाई' होऊं लागली! गावेंच्या गावें घाबरून पळालीं! व्यापारी पळाले. मंदिरें आणि मठ धडाधड कोसळूं लागले. मूर्ति फुटूं लागल्या. शेती अन् बागबागायतीचा अगदी वानरविचका सुरू झाला. जाळपोळ, अत्याचार, भ्रष्टाकार–आणखी?– सुलतानांचे शिपाई व सरदार जें जें नेहमीच करीत तें तें घडूं लागलें.[१२] मोंगलाई, मोंगलाई म्हणतात ती हीच!

खानाने भीमा नदी ओलांडली. तो कऱ्हेपठारांत घुसला. सुप्याच्या गढीवरचा भगवाझेंडा उडाला. खानाने जाधवरावांना सुप्यास ठेवलें व मोंगल फौजेसाठी धान्य-वैरण पुरविण्याचें काम त्यांच्यावर सोपविलें![१३] आजपर्यंत स्वराज्यांत सुखाने घास खाणाऱ्या मुलांलेकरांच्या आणि गाईवासरांच्या तोंडचे घास मोंगली फौजेसाठी ओढून नेले जाऊं लागले. आणि तेहि जाधवरावांच्या हातून.

आगीच्या चौफेर चुळा फेकीत खानाची फौज स्वराज्यांत दौडत होती.

नंतर शाइस्तेखानाची आघाडी बारामतीकडे वळली. बारामतीस तो पोहोचला (दि. ५ एप्रील १६६०) आणि तेथेच अकरा दिवस त्याने मुक्काम केला. तेथील गढीची डागडुजी करण्याची व शिबंदी ठेवण्याची

व्यवस्था त्याने केली.[१३] याच वेळीं इंदापूरहि त्यानें जिकलें.[१४]

निर्धास्तपणें या हालचाली खान आपल्या प्रचंड फौजेनिशी करीत होता. आपल्याला विरोध करण्याची शिवाजीची हिम्मत नाही, अशी त्याची खात्री होती. पण तेवढ्यांत, बोटभर लांब बाभळीचा काटा खचकन् पायांत घुसावा, त्याप्रमाणे मराठ्यांच्या एका तुकडीने मोंगली छावणीवर बेधडक छापा घातला! कापाकाप, लुटालूट जेवढी करणें शक्य होती, तेवढी केली आणि उंदराप्रमाणे भर्रकन ते मराठे पसारहि झाले![१३]

आणि मग असें सारखेंच होऊं लागलें. ही छापे घालणारी लहानशी फौज राजगडावरची होती. जिजाबाई आईसाहेब राजगडावर होत्या.

शाइस्तेखान बारामतीहून होळ नांवाच्या नीरा नदीवरील गावीं आला ( दि. १६ एप्रील १६६० ). आणि दोन दिवसांनंतर त्याने शिरवळकडे कूच केलें. गनिमी काव्याने मराठ्यांच्या टोळ्या खानाचे लचके तोडीत होत्याच. शाइस्तेखानाने तीन हजार फौजेनिशी, या हल्लेखोर पळपुट्या मराठ्यांचा बंदोबस्त करण्याचें काम शर्झाखान नांवाच्या सरदारावर सोपविलें. शर्झाखानाने एकदा पाळत राखून मराठ्यांवर धाव घेतली. परंतु त्याच्या हातीं एकजणहि सापडला नाही. सर्वजण पळाले!

खान शिरवळास पोहोचला. शिरवळचा भुईकोट सुभानमंगळ त्याने जिंकला. तेथे त्याने सैन्य ठेवलें.[१५] शिरवळास खानाला समजलें की, शिवाजीचा राजगड नांवाचा किल्ला येथून दहा कोसांवरच आहे. राजगडच्या आसपास आणखी चार पांच किल्ले आहेत आणि शिवाजीचे मराठे या किल्ल्यांच्या आसपास आपल्यावर हल्ले करण्याकरिता दबा धरून बसले आहेत. तेव्हा खानाने शर्झाखान, राव भावसिंह, शमसुद्दीनखान आणि मीर अब्दुल मअबूद यांस मराठ्यांच्या बंदोबस्तासाठी रवाना केलें. या सरदारांच्या एकूण फौजेंत एक हजार खास बंदुकवाले हशम होते. हे सरदार मराठ्यांच्या बंदोबस्तास गेले,

पण एकहि मराठा यांच्या हातीं लागला नाही. सगळे पळून गेले ![१५] पण याच गोष्टीला मोंगल मंडळी 'विजय' समजत होती !

पण यांतील आश्चर्य किंवा कौतुक मात्र असें की, या सर्व सरदारांना झुकांडी देऊन मराठी टोळ्यांनी शाइस्तेखानाच्या मुख्य छावणीवरच हल्ला चढविला ![१५] पकडण्याकरिता लावलेले पिंजरे राहिले 'आ'करून दूरच अन् उंदरांनी नेमक्या पक्वान्नावरच छापा घातला ! शाइस्तेखानाने ओळखलें की, हें लक्षण कांही ठीक नव्हे !

खानाच्या सैन्याने राजगडच्या आसमंतांतील कांही गावें पूर्ण बेचिराख करून टाकलीं. अशीच स्थिति कऱ्हेपठारांतील गावांची झाली.[१२] लुटालुटीमुळे दर्भाची काडीसुद्धा उरली नाही, मेलेल्यांचें श्राद्ध करायला ! स्वराज्यांतील कर्तीसवरतीं पुरुषमाणसें पन्हाळ्यावर महाराजां-पाशी, गडागडावर आणि नेताजीबरोबर राहून स्वराज्यासाठीं झगडत होतीं. आणि वाळू दळणाऱ्या घाणीच्या चाकांप्रमाणे खानाची फौज मराठ्यांचे संसार भरडून काढीत होती. कधीहि आलें नाही असें दुहेरी संकट स्वराज्यावर आलें होतें.

आपल्या गरीब मराठी प्रजेच्या संरक्षणाकरिता राजगडावरून आई-साहेब जिवापाड धडपड करीत होत्या. आपल्या मायेचा पदर त्या स्वराज्या-वर पांघरवीत होत्या. परंतु शत्रूची वादळी फुंकर एवढी जबरदस्त होती की, तो त्यांचा पदर भिरकावला जात होता.

स्वराज्याच्या साऱ्या सरहद्दीवरून आक्रोश ऐकूं येत होते. जीव आणि अन्न वांचविण्यासाठी घरेंदारें सोडून लोक दीनवाणे धावत होते.[१२]

आईसाहेबांच्या स्वराज्याच्या महत्त्वाकांक्षा रुईच्या कापसाप्रमाणे वाऱ्यावर उडून जाणार की काय अशी भीति वाटूं लागली होती. सिद्दी जौहर बकासुराप्रमाणे पन्हाळ्याच्या कमरेला गच्च मिठी मारून बसला होता. आणि राजगडाला चिंतेने वेढा घातला होता.

पण आश्चर्य पाहा केवढे ! आईसाहेबांच्या मूठभर सैन्याने शाइस्ते-खानाच्या परातभर फौजेला गनिमीकाव्याने बेचैन करून सोडलें होतें.[१५] महाराजांच्या दावेदारांचे बळ अहि-महींप्रमाणे रोज वाढतच होतें. पण आईसाहेबांचें राजगडावर, महाराजांचें पन्हाळगडावर आणि प्रत्येक मावळ्याचें गडागडावर भवानीच्या प्रेरणेने भावबळ वाढतच होतें. आम्ही मराठी हाडाचीं माणसें वाकणारहि नाही आणि मोडणारहि नाही !

शिरवळाहून शाइस्तेखान शिवापुरास आला. नंतर तेथून तो सासवडास जाण्यास निघाला. गराडयाच्या खिंडींतून खानाची फौज चालूं लागली. घंटा-घुंगरांच्या तालावर हत्ती, घोडे, उंट आणि सैनिक चालले होते. अगदी संथ आणि निर्धास्तपणें. एवढ्यांत एकदम भयंकर गलका उडाला ! काय झालें ? मराठे आले ! मराठे आले ! एकदम भवतीच्या डोंगरांतून मराठी माकडें शाही फौजेवर तुटून पडलीं. सपाटून कापाकाप करून, जशीं एकदम आलीं, तशींच एकदम पसार झालीं ![१५]

गराडे ते सासवड या मुक्कामांत मराठ्यांनी खानाला फारच सतावून सोडलें.[१५] अखेर खानाने ठरविलें की, प्रथम पुण्याला जाऊन छावणी ठोकायची व मग पुढचा विचार करायचा. सासवडहून त्याने कूच केलें. राजेवाडी, पाटस, यवत, हडपसर या मार्गाने तो पुण्यास निघाला. या मार्गाने सासवड ते पुणें हें अंतर फक्त वीस कोस आहे. हें वीस कोस अंतर तोडायला खानाला फक्त नऊ दिवस लागले ! म्हणजे दर दिवसाला सरासरी सवादोन कोस वेगाने फौज 'दौडत' होती ! याचें कारण ठिकठिकाणीं मुक्काम करीत करीत खानसाहेब जात होते. खान सासवडहून निघाला त्या दिवशीं तारीख होती १ मे १६६०. खान आता पुण्याच्या अगदीं शिवारांत जाऊन पोहोचला.

—आणि पुण्यावर हल्ला आला.[१६] शाइस्तेखानाचे स्वार आणि खानाचा हत्ती पुण्यांत घुसला. मागोमाग फौजेचा लोंढा आला. पुणें

शहराला कोट नव्हता. कशाच्या आधाराने लढायचें ? जो कोट होता, तो पूर्वीच आदिलशाही रायारावाने पाडून टाकला होता. पुण्याचा अगदी सहज पाडाव झाला ( दि. ९ मे १६६० ).

शिवाजीचें पुणें कबजांत आलेलें पाहून खानाच्या डोळ्यांत वेगळाच कुर्रा चढला. मुठा नदीच्या विशाल काठावर औरस–चौरस दीड कोस खानाची छावणी पसरली. खुद्द शाइस्तेखान आपल्या सरदारांसह लाल महालाकडे निघाला. महाराजांचा राहाता वाडा लाल महाल पुणें कसब्याच्या पश्चिमभागास होता. हाच तो शिवाजीचा खासा वाडा, असें समजल्यावर खानाची तबियत निहायत खूष झाली. त्याचा आनंद जमिनीवरून घोड्यावर अन् घोड्यावरून हत्तीवर चढला.

शाइस्तेखानाने लाल महालाचा उंबरा ओलांडून आंत पाऊल टाकलें. वाडा विटाळला ! लहानपणीं महाराजांच्या ' शुभं करोति 'ने, आईसाहेबांच्या ओव्या–भूपाळ्यांनी आणि द्विजवरांच्या वेदमंत्रांनी निनादलेल्या लाल महालांत, उन्मत्त चढाव करकर वाजवीत खान शिरला. बाल शिवबाचे महन्मंगल श्वासोच्छ्वास अजूनहि ज्या महालांत दरवळत होते, तेथे शराबी सुस्कारे अन् हुक्क्याचे भपकारे उमदळूं लागले. किनखापी अन् झिरझिरीत पडदे सुटले. उगीचच मुरकत मुरकत चालणारे खोजे लाल महालांत आले. मागोमाग खानाच्या जनान्याचे मेणे आले. लाल महाल भरला. गजबजला. खानाने खुद्द जातीच्या मुक्कामासाठी लाल महालच पसंद केला.[१७] लगेच तेथे पडदे, गालिचे, पिकदाण्या, धूपदाण्या, तबकें, सुरया आल्या. तार्तर बाया, खोजे, गुलाम, लौंड्या, भटारणी, भिस्ती आणि इतर नोकरपेशा आला. कुलाशीलाच्या मराठमोळ्या लाल महालाचा मोंगली हिरवा महाल झाला !

पुण्याचा गीर्दपेशा एक लाख फौजेने व्यापून टाकला. मावळवेशी

पासून कुंभारवेशीपर्यंत चौक्या-पहारे कडक बसले. पुण्यावर हिरवें निशाण फडकूं लागलें. शेखसल्लयांत बांगेच्या आरोळ्या घुमूं लागल्या. मोगली हशम, सांडणीस्वार, महमील, गोषांचे मेणे, खोजे, फकीर, भिस्ती, हबशी गुलाम आणि अठरापगड हशमांची दाटी उडाली. तंबू, शामियाने, राहुट्या आणि पालांची दाटी लागली.

—आणि मग ढोलक्यावर खडा वाजूं लागला. चाळदार डफ झळाळूं लागले. तोंडावरचा नाजूक पडदा वर करून कुणी सलमा–रोशन–नजमा–निगार–बेहोश होऊन नाचूं लागल्या. कानावर डावा हात ठेवून उजव्या हाताचा मुरकेदार वळसा छातीवर जमा करीत करीत अन् एक डोळा झाकीत झाकीत, कुणी गुलजार मज्नू कव्वालीच्या ताना उलगडूं लागले. हास्याच्या लकेरी, हुक्क्याची खुमारी, धुराची फुंकर अन् चांदणी दहिवर! बस्स्! मोगली छावणी रंगून गेली.

मराठा ग्रंथ सं... न.
अनुक्रम २८४८२ वि. चरित्र
क्रमांक ८६७ नों. दि. १२-२-५९

---

**आधारः**—(१) शिभा २५।३६. (२) शिभा २५।३७ ते ४७. (३) जेधे शका. (४) शिभा २५।४९ ते ५५. (५) शिभा २५।४८. (६) 'वत्सगुल्म-महात्म्य'–प्रस्तावना. लेखक–डॉ. य. खु. देशपांडे. (७) मंडळ त्रै. व. १ ते ४ पृ. ४९; शिभा २५।५२; मआसिर–उल्–उमरा भा. ३ पृ. ८३. (८) मआसिर–उल्–उमरा भा. ३ पृ. ८३. (९) मंडळ त्रै. व. १ ते ४ पृ. ४९. (१०) शिभा २५।५०. (११) सभासद ब. पृ. ३१; शिभा २५।३४ व ५७ ते ५९. (१२) शिभा २५।६० ते ६२; शिभा. २६।१; पसासंले. ८८० (१३) शिचत्र सं. ३ पृ. २० व ६६. (१४) शिभा २६।२. (१५) शिचत्र सं. ३ पृ. २१ ते २४. (१६) शिभा २६।२; शिचवृसं. ३ पृ. ६७. (१७) शिचप्र. पृ. ४६; जेधेशका–शिचप्र पृ. २२; शिचवृसं. ३ पृ. ६८.



# ८. नेताजी आणि जिजाबाईसाहेब

सरनौबत नेताजी पालकरास खबर मिळाली की, महाराज पन्हाळ्यांत अडकून पडले असून सिद्दी जौहरने गडाला अतिशय बळकट वेढा घातला आहे. तसेंच, मोंगल सरदार शाइस्तेखान हाहि पुणें प्रांतांत घुसला आहे. नेताजीने आपली जबाबदारी ओळखली. महाराजांस वेढ्यांतून सोडविणें हें आपलें पहिलें काम आणि नंतर मोंगलांचा विचार. परंतु एवढा मोठा वेढा फोडायला पांच-सहा हजार फौजेनिशीच जाण्याने एकदम कदाचित् यश मिळणार नाही; म्हणून प्रथम थेट विजापुरासच धडक द्यावी, म्हणजे बादशाहाच गडबडेल आणि त्याच्या संरक्षणाकरिता जौहरला किंवा अन्य कोणाला विजापुरास नक्की जावें लागेल आणि मग पन्हाळ्याचा वेढा आपोआप ढिला पडेल,[१] असा विचार नेताजीने केला. त्याने गोकाक, दोदवाड, मुरवाड, किल्ले धारवाड, खुदावंदपूर, सांगाव, काणद, कुरुंदवाड, हेबाळ, हनुवल्ली, हूणवाड, हुकेरी वगैरे आदिलशाही ठाणीं आधीच झोडपून काढलीं होतीं.[२] आता पुढची चाल.

गदगहून नेताजीने कूच केलें. विजापूरच्या अगदी नजीक असलेल्या शाहपुरावर त्याने रात्रीच्या वेळीं अचानक धाड घातली.[२] शाहपूर गाढ झोपेंत होतें. रावणाच्या लंकेसारखी शाहपुराची दैना उडाली. नेताजीने तें जाळून लुटून फस्त करून टाकलें.

नेताजीचा धुमाकूळ विजापुरांत समजला. विजापूरची एकच घाबरगुंडी उडाली. शाहपुरांत नेताजीने मुल्ला महमद, बाबुलखान

( बहलोलखान ) व अजाप्पा नाईक या शाही सरदारांचा असा सडकून पराभव केला की, ते विजापुरास पळून गेले. त्यामुळे खुद्द बादशाह अतिशय घाबरला. या वेळीं विजापुरांत बादशाहाच्या हिफाजतीसाठी पांच हजार फौज खडी ठेवलेली होती. बादशाहाने घाबऱ्या घाबऱ्या या पांच हजार फौजेसह खवासखानास नेताजीवर रवाना केलें.

आता बादशाही तख्ताच्या गळ्याशींच ही सैतानी बला येऊन भिडली आहे; जर आपण नेताजीला पिटाळून लावलें नाही तर कठीण प्रसंग आहे, हें ओळखून खवासखान मोठ्या निकराने निघाला.

नेताजी विजापुरावर चालून येत होता. वाटेंतच खवासखानाने त्याला अडविलें ! भयंकर रणकंदन सुरू झालें. खवासखानाच्या फौजेंत गोवळकोंड्याच्या कुतुबशाहाचीहि फौज होती.[१] नेताजी आणि खवास, दोघेहि पराक्रमाची कमाल करीत होते. नेताजीला एक पाऊल-भरहि पुढे सरकतां येईना ! शाही फौज जिवाच्या कराराने लढत होती. शिवाय ती ताज्या दमाची होती. नेताजीची फौज अफजल-खानाच्या वधाच्या दिवसापासून सतत दमत होती. मराठे फार उडाले. पुढे जाणें अशक्य ठरलें ! नेताजीला माघार घेणें मुकाट्याने भाग पडलें. पुढेच जाण्याचा हट्ट त्याने धरला असता तर त्याचा पूर्ण फडशा उडाला असता. विजापुरांत शिरण्याची नेताजीची इच्छा पूर्ण पराभूत झाली ![२]

नेताजी तीन कोस माघारी येऊन थांबला. खवासखानाने त्याचा पाठलाग केला नाही. झालें एवढ्यावरंच तो खूष होता ! नेताजीची फौज अतिशय थकलेली होती. नवी कुमक येण्याची शक्यताच नव्हती. कोठून येणार ? शाइस्तेखानाने पुण्याकडे काय काय नासाडी मांडली असेल, याचीहि काळजी होतीच. अखेर निरुपायाने नेताजीने ठरविलें की, प्रथम राजगडावर जाऊन आईसाहेबांस भेटावें आणि त्यांच्याच

सल्ल्याने पुढचे बेत आखावेत. विजापुरास शह देऊन पन्हाळ्याचा वेढा ढिला करण्याचा मात्र त्याचा बेत साफ फसला.[२] जर या वेळीं त्याच्यापाशी वीस-पंचवीस हजार फौज असती तर विजापूरच्या शाही तख्ताच्या ठिकऱ्या करून त्या उधळींत उधळीतच तो महाराजांकडे गेला असता ! पण एवढी फौज सबंध स्वराज्याची मिळूनहि भरत नव्हती !

नेताजी पालकर राजगडाकडे जाण्यास निघाला. नेताजीच्या बरोबर सिद्दी हिलालहि होता.

राजगडावर आईसाहेब चिंताक्रांत होत्या. पन्हाळ्याचा फास आवळत आवळत चालला होता. शाइस्तेखानाची लाट पुण्यांत पोहोचली. नेताजीचा पराभव झाला होता. मोंगलांनी स्वराज्याची पूर्व बाजू (पुणें, बारामती, इंदापूर, सुपें, सासवड व शिरवळ) बऱ्हंशीं जिंकली होती.[३] चांगली बातमी एकहि नव्हती. स्वराज्याची व शिवबाची आहुति गिळण्यासाठी शत्रूने 'आ' पसरला होता. किती यातना, किती अडचणी, निराश करणारे किती प्रसंग, सैन्य आणि साधनांचा किती तुटवडा,—केवढी बिकट परिस्थिति होती म्हणून सांगूं! केवळ इतिहासालाच ठाऊक ! कोणीहि मन लावून वाचीत नाही किंवा कान देऊन ऐकत नाही, अशी इतिहासाची तक्रार आहे ! शिवाजीराजाची आंधळी भक्ति करण्यांतच जो तो गुंग ! उत्सवबाज !

—अशा या भयंकर स्थितींत आईसाहेब स्वराज्याची आणि किल्ले-कोटांची राखण करीत होत्या.[४] त्यांच्यापाशी थोडीशी फौज होती. त्या फौजेच्या हातून मोंगलांना सतावीत होत्या. याच फौजेने या पराभवांच्या कालखंडांत एक विजय मिळविला होता. सातारा प्रांतांतील मेढ्याजवळच्या व्याघ्रगड ऊर्फ वासोटा नांवाचा किल्ला आदिलशाही किल्लेदाराकडून जिंकून घेतला[५] (दि. ६ जून १६६०).

एकुलता एक पुत्र जौहरच्या मगरमिठींत सापडलेला असूनहि

आणि शाइस्तेखानाचें घोर संकट आलेलें असूनहि आईसाहेब डगमगलेल्या नव्हत्या. शरण जाऊन स्वराज्याचा हक्क सोडावा असा विचारहि त्यांच्या मनाला स्पर्श करीत नव्हता. मोंगलांचे क्रूर अत्याचार ऐकून त्यांना वेदना होत होत्या. पण त्या हताश मात्र होत नव्हत्या. कठोर बातम्या निश्चल मनाने ऐकून पुढचे हुकूम त्या देत होत्या.

आईसाहेबांची आणि महाराजांची भेट अकरा महिन्यांपूर्वी झाली होती ( दि. ११ जुलै १६५९ ). त्यानंतर अफजलखानाचा वध झाला ( दि. ११ नोव्हें. १६५९ ). पन्हाळा किल्ला काबीज झाला ( दि. २८ नोव्हें. १६५९). रुस्तुमेजमान आणि फाजलखान यांचा कोल्हापुरापाशी पराभव झाला ( डिसें. १६५९ ) आणि कितीतरी घटना घडल्या; आता पावसाळा जवळ आला ( इ. १६६० जून ). तरीहि महाराजांची व त्यांची भेट झालेली नव्हती. एकुलत्या एक मुलावर जीव घेणारीं संकटें कोसळत होतीं आणि नवीं संकटें येतच होतीं. अशा वेळीं त्या आईला आणि मुलाला एकमेकांच्या भेटीची ओढ लागली नसेल का ? आपल्या कुटुंबियांना भेटावें, बायकामुलांत चार दिवस राहावें हा विचार महाराजांच्याहि मनांत कधी आलाच नसेल का ? अकरा अकरा महिन्यांची ताटातूट सहन करणें एरव्ही शांततेच्या काळांत फारसें जड वाटत नसेल ! पण अफजल-जौहर-शाइस्तेखानांसारखीं प्राणावर उठलेलीं संकटें गर्दी करून आल्यावर त्या मायलेकरांना एकमेकांची केवढी आर्त ओढ लागत असेल ? पण व्रताप्रमाणे आयुष्य जगणाऱ्यांना कठोर मनाने सारे ताण सहन करावेच लागतात. महाराजांच्या भेटीसाठी आईसाहेब अहोरात्र तळमळत होत्या.[६] शिवबास बाहेरून मदत जाईल तरच तो पन्हाळ्याच्या कोंडींतून निसटूं शकेल हें आईसाहेबांनी जाणलें होतें. बाहेरून जौहरच्या वेढ्यावर घाव घालून वेढा फोडून काढणारा वीर हवा होता. परंतु हिमतीच्या आणि जोखमीच्या तलवारी तोळणारी

माणसें ठायीं ठायीं गुंतून पडलीं होतीं. नवीन कोणास रवाना करावें, तर अशा तोलाचा कोणीच दिसेना ! कोणीच सुचेना !

महाराजांना सोडवून आणील असा कोणीहि नव्हता ?

नव्हता ! आईसाहेब चिंतेंत होत्या.

—आणि मग ?—आईसाहेब स्वतःच ताडकन् उठल्या ! त्यांनी कमरेला पदर खोवला ! 'मी स्वतः जातें ! जातीने पन्हाळ्यावर चालून जाऊन शिवबाला सोडवून आणतें !' असा निर्धार त्यांनी बोलून प्रकट केला.[७] आणि खरोखरच त्यांच्या अंगांत युद्धावेश संचारला.[७] आईसाहेब अंगावर शस्त्रास्त्रें चढवून मोहीमशीर होणार ! त्यांच्यापुढे बोलायची, त्यांना थांबवायची हिम्मत कोणांतहि नव्हती. त्यांचा आवेशच विलक्षण होता. त्यांत पुत्रप्रेमाची आर्तता होती. शत्रूवरचा त्वेष होता. राजगडावरच्या मंडळींपुढे प्रश्न येऊन पडला की, आता काय करावें ?

तेवढ्यांत देव पावला ! गडाच्या रोखाने चार पांच हजार घोडेस्वार दौडत येतांना दिसले. फुपाटा मागे फेकीत स्वार दौडत होते. कोणाची फौज ही ?

सरनौबत नेताजी पालकर ! नेताजी आला ! फार फार नामी झालें. अगदी अवघड वख्ताला सरनौबत आले. रागावलेल्या आईसाहेबांच्या पुढे जायची पाळी त्यांच्यावरच !

विजापूरच्या मोहिमेवरून नेताजी आलेला होता. तो प्रथम शिवा-पट्टणास ( खेड–शिवापुरास ) गेला होता. तेथून आता राजगडास आला.[८] त्याच्याबरोबर सरदार सिद्दी हिलालहि होता. आपण महाराजांस अद्याप पन्हाळ्याच्या वेढयांतून सोडवूं शकलों नाही यामुळे तो शरमिंदा झालेला होता आणि त्याला आता तर समजलें की, खुद्द आईसाहेबच पन्हाळ्याच्या स्वारीवर निघाल्या आहेत ! त्यामुळे तर तो जास्तच शरमून गेला.[९] आईसाहेबांपुढे जावें तरी कसें, हें त्याला

समजेना. निमूटपणें तो व सिद्दी हिलाल खाली माना घालून अपराधी मनाने भीत भीत आईसाहेबांकडे निघाले.

संथ व अपराधी पावलें टाकीत दोघेहि आईसाहेबांच्या महालांत आले. समोरच आईसाहेब होत्या. त्यांची तिखट नजर नेताजीवर गेली. मुजरे करीत करीत नेताजी व हिलाल पुढे पुढे येत होते. त्या दोघांची त्यांच्याशीं दृष्टादृष्ट झाली आणि आईसाहेब त्यांच्यावर कडाडल्या,[१०]

"आपला राजा दुष्मनांच्या वेढ्यांत कोंडला गेला असतांना गनिमाला भिऊन तुम्ही पळून आलांत ना? शाबास! असे माघारीं येतांना तुम्हांला थोडासुद्धा संकोच वाटला नाही ना? आता मीच

---

*विसरला महाशय, काय लाविता जात .*



जातें पन्हाळ्यावर जातीने! सिद्दी जौहरचें मुंडकें छाटून माझ्या शिवबाला मीच सोडवून घेऊन येतें! आता शिवबावाचून क्षणभरहि राहणें मला कठीण आहे!"

आईसाहेब कोपल्या होत्या. नेताजीला त्यांच्या मनाच्या खाणाखुणा पूर्ण ठाऊक होत्या. तो त्यांची मनःस्थिति जाणत होता. तो हात जोडून आदबीने म्हणाला,[११]

"आईसाहेब, महाराजांच्या हुकमानेच मी विजापूर मारायला गेलों होतों. पुण्याच्या मुलखाला मोंगलाने तसवीस लावली म्हणून मोंगलाला मारून काढायास इकडे आलों. महाराज पन्हाळगडीं कोंडून पडलेती. पण आईसाहेब, त्यांची चिंता करूंच नका. आई भवानी आहे त्यांच्या पाठराखणीं! म्या असाच जातों पन्हाळ्याकडे! फोडून काढतों जौहराचा घेरा! शाइस्तेखान मोंगलाची काय बिशाद आहे इकडले आपले गडकिल्ले जिंकायची! इतक्या काळजीकाट्याने राखण केलेले आपले गडकिल्ले मोंगल घेऊंच पावत नाही! म्या निघालों पन्हाळ्याकडे!"

एवढे बोलून नेताजीने आणि सिद्दी हिलालाने आईसाहेबांना मुजरे घातले.

पन्हाळगडावर महाराज फार मोठ्या आशेने वाट पाहात होते की, नेताजी वेढा फोडण्याकरिता येईल. उन्हाळा संपून पावसाळा तोंडावर आला तरीहि वेढा बिनधोक चालूच होता.

नेताजी आणि हिलाल दौडत निघाले.[१२] जसे आले तसेच परतले. त्यांच्या दौडत्या फौजेंतील झेंडे धुळीच्या धावत्या लोटांतून अस्पष्ट अस्पष्ट दिसत होते.[१२] आल्या पावलीं लगेच कांही वेळांत पुन्हा स्वारीवर जावें लागलें म्हणून कोणीहि नाराज झाला नाही. आईसाहेब जशा हक्काने रागावत तशा त्या हक्काने प्रेमहि करीत. आपल्या मुलाइतकेंच त्यांचें सर्वांवर प्रेम असे.

नेताजीच्या फौजेंत सिद्दी हिलालचा तरुण व ताकदवान पुत्र सिद्दी वाहवाह हाहि होता.[१३]

पन्हाळ्याला वेढा पडून तीन महिने होऊन गेले होते. महाराज फार काळजींत होते हें खरेंच, पण त्यांच्या किंवा मावळ्यांच्या मनाला चीर मात्र पडलेली नव्हती. अजूनहि जिद्द कायम होती. परंतु पन्हाळगडाबाहेरच्या स्वराज्याच्या चिंतेने सर्वजण व्यग्र झाले होते.महाराज तर अहोरात्र विचारांत गर्क होते. आता पुढे काय होणार ? वादळांत सापडलों आहोंत !

आणि एक दिवस जौहरच्या अन् फाजलच्या छावणींत गडबड उडाली. स्वारांची चिखलांतून धावाधाव सुरू झाली. जौहर स्वतः आपल्या शामियान्याच्या बाहेर उभा राहून धावणाऱ्या लोकांस हुकूम देऊं लागला. त्याचे कांही सरदार दौडत होते. विजापुरी फौजेवर हल्ला आला होता, अन् हा हल्ला खुद्द नेताजी पालकराचा होता.[१४]

जौहरला खबर लागतांच त्याने आपली शिलकी फौज नेताजीवर पाठविली. जौहर फार वाकबगार सेनापति होता. त्याने वेढा फोडण्याचा मराठ्यांचा डाव ओळखला. ह्या दंगलीची संधी साधून गडावरून कोणीं उतरूं नये म्हणून त्याने वेढ्यांतला एकहि शिपाई हलविला नाही. उलट तोफा बंदुका ठासून जय्यत राहण्याचे इशारे दिले. तो स्वतःसुद्धा गेला नाही. स्वतः वेढ्यांत मोर्च्यांवर फिरता राहिला. त्यामुळे वेढ्याचा विळखा नखभरहि उलगडूं शकला नाही.[१५]

लढाईची धुंद माजली. छावणीपासून लांबच विजापुरी फौजेने नेताजीला गाठलें. नेताजी, सिद्दी हिलाल आणि हिलालचा मुलगा सिद्दी वाहवाह यांनी दात खाऊन विजापुरी फौजेवर चाल केली. वेढ्यापर्यंत नेताजीला येऊंच न देतां लांब अंतरावरच आदिलशाही फौजेने नेताजीला आडवा अडसर घातला. वेढ्याला धक्काहि लागला नाही.

गडावरून दूरवर हा संग्राम दिसत होता. गडावर आशेची कळी उमलली. आता हीच संधी वेढा फोडायला. महाराज मोठ्या उत्सुक नजरेने लढाई टेहळीत होते. मावळे तटातटावरून खाली वेढ्यांतील हालचाल न्याहाळीत होते, पण मोर्च्यांत थोडीहि चलबिचल दिसेना. सर्व मोर्चे तसेच कायम होते. महाराजांस आशा वाटत होती की, ही चालून आलेली आपली फौज वेढ्यापर्यंत येईल, वेढा विस्कटेल अन् ती संधी साधून आपणहि खाली चालून जाऊं. महाराज मोठ्या आशेने पाहात होते.

नेताजी आणि सिद्दी हिलाल अंगेजणीने आदिलशाही फौजेवर तुटून पडले. दोघांचीहि जबरदस्त ताकद शत्रूची आघाडी फोडीत आंत आंत घुसत होती. एवढ्यांत सिद्दी वाहवाहला एकदम जबरदस्त जखम झाली. तो घोड्यावरून किंकाळी फोडून खाली कोसळला. शत्रूने एकदम त्याला वेढलें. वाहवाह बेशुद्ध झाला. सिद्दी हिलालच्या कानावर आपल्या पोराची किंकाळी गेली. हिलालने लगाम खेचून मुलाला सोडविण्याकरिता धाव घेतली. त्याची समशेर पुत्रप्रेमाने तळमळून फिरूं लागली. पण शत्रु अफाट होता. शत्रूच्या शिपायांनी, जखमेमुळे बेशुद्ध होऊन पडलेल्या वाहवाहास आपल्या छावणीकडे नेलें. नेताजी शौर्याची कमाल करीत होता, पण अखेर घात झालाच. वाहवाहास ओढून नेलेलें पाहतांच सिद्दी हिलालची फौज घाबरून पळत सुटली. नेताजीचा अन् हिलालचा डाव फसला. शत्रूचा जोर जास्तच वाढला.[१६]

—सारी मराठी फौज पळत सुटलेली गडावरून दिसूं लागली. आदिलशाही फौज भयंकर उन्मादाने गर्जत होती. नेताजीला आणि हिलालला पळून जावें लागलें! साफ पराभव! नेताजीचा पराभव झालेला पाहून महाराजास फार फार वाईट वाटलें. एकच आशा होती, तीहि या पराभवाने करचळून गेली. पण महाराजांना सिद्दी जौहराचाच

राग आला.[१७] महाराजांस राग अनेकांचाच आला होता. जौहरचा, इंग्रजांचा, जसवंतरावाचा, शृंगारपूरकर सुर्व्यांचा, शाइस्तेखानाचा आणि सर्वच शत्रूंचा. पण तो राग त्यांना सध्या तरी झाकून ठेवावा लागत होता. अगदी निरुपाय होता.

* * *

---

**आधारः**—(१) पसासंले ८२६ । पृ. १९३. (२) शिभा २५।४ ते ९; पसासंले ८१२, ८१४, ८२३, ८२६, ८३६, ८३९, ८४०; शिभा २६।६, ७ व २०. (३) शिभा २६।१ व २; शिचवृसं. ३ । पृ. २० ते २४, ६६. (४) शिभा २६।४ व ५. (५) जेधेशका. (६) शिभा २६।८, १२, १४ ते १६ व ४६. (७) शिभा २६।४ ते १७. (८) शिभा २६।६ ते ९. (९) शिभा २६। १०. (१०) शिभा २६।१२ ते १८. (११) शिभा २६।१९ ते २४. (१२) शिभा २६।२५ ते २७. (१३) शिभा २६।२३. (१४) शिभा २६।२८ व २९. (१५) शिभा २६।२८ ते ३१. (१६) शिभा २६।३० ते ४०. (१७) शिभा २६।४० व ४१.

# ९. किल्ले पन्हाळगड आणि चाकण

पन्हाळ्याचा वेढा आवळतच चालला होता. पखालीसारखे गच्च भरलेले ढग वाढत होते. जणू फक्त सुई टोचायचा अवकाश. एकदा पाऊस सुरू झाला की, या धो धो मावळी पावसाला कंटाळून सिद्दी जौहर वेढा उठवून तरी जाईल किंवा निदान वेढा शिथिल तरी नक्कीच बनेल असें महाराजांस वाटत होतें.[१]

शिंतोडे येऊं लागले. पृथ्वीचा सुगंध घमघमूं लागला. धो धो पाऊस सुरू झाला. जणू समुद्रच आकाशांतून सांडूं लागला. तरीहि जौहरची फौज भिजली नाही. तंबूंत पाणी शिरलें नाही. पन्हाळ्याच्या डोंगरावरून पाण्याचे लोट खळाळूं लागले. वाऱ्याने तंबू डोलूं लागले. तरी फौजेची तारांबळ उडाली नाही. वेढ्यांतील लोक आपआपली जागा धरून उभेच होते. तोफांचे मोर्चे अन् वेढ्यांतील लोकांनी लावलेले बंदुकांचे मोर्चे अशा पावसांतहि चालू होते. कारण सिद्दी जौहरने त्या अडचणीवर तोड काढली होती. त्याने गवताचीं झापें उभीं केलीं होतीं[१]. खोपटीं उभीं केलीं होतीं. लोकांना निवाऱ्याला जागा तयार केल्या होत्या. पावसाचें पाणी तंबूंत शिरणार नाही अशी व्यवस्था केली होती. मुसळधार पावसामुळे वेढ्यांत थोडासुद्धा ढिलेपणा जौहरने येऊं दिला नाही. त्याचा चिवटपणा जबर होता.[१]

—महाराज पन्हाळगडावर जगदंबेपुढे सचिंत शतपावली करीत होते.

—आईसाहेब राजगडावर देवापुढच्या नंदादीपाला हाताचा आडोसा धरीत होत्या. वावटळ फार सुटली होती.

—हें पुणें महाराजांचें राहिलें नव्हतें. हा लाल महाल आईसाहेबांचा राहिला नव्हता. धुपाच्या धुरांत शाइस्तेखानाची राजकारणें रंगूं लागलीं होतीं. खान पुण्यांत येऊन एक महिना होऊन गेला होता. या महिन्यांत पुण्याचा आसमंत खानाने भाजून काढला.[१०] आपल्या देवभूमीची धूळधाण शाइस्तेखानाने मांडली आहे, हें दिसत असूनहि आमचींच माणसें त्या वैऱ्याच्या पायावर लोटांगणें घालीत भिका मिळवायला जात होतीं. किती गाऱ्हाणीं सांगूं या फितुरांचीं ? महाराष्ट्राच्या इतिहासाच्या पानापानावर ठेचा लागताहेत या दगडांच्या ! पुण्याची देशमुखी आपल्याला मिळावी एवढ्यासाठी लोणीचा कृष्णाजी काळभोर खानाला सामील झाला ![४] खानाने शितोळे देशमुखांची देशमुखी जप्त करून ती काळभोराला दिली. एक नमुना आणखी पाहा. पुण्याचा देशपांडा बाबाजी राम होनप, हाहि खानाला सामील झाला ! या होनपाचें घर महाराजांच्या लाल महालाच्या शेजारींच होतें. लाल-महालाच्या, दादाजी कोंडदेवांच्या, आईसाहेबांच्या आणि महाराजांच्या सावलीला राहूनहि हा बाबाजी होनप देशपांडा अखेर असाच निघाला ![५] काळभोराहूनहि काळा काळा भोर ! महाराष्ट्राच्या या घरच्या दुष्मनांना विशेषणें तरी कोणतीं द्यायचीं ? विशेषणेंच संपलीं !

सबंध पुणें प्रांतांत आता कुठेहि राज्याची नांव-निशाणी उरली नव्हती. सारा मुलुख खग्रास ग्रहण लागल्याप्रमाणे बेचिराग झाला होता.[२] पुण्याच्या ईशान्येला फक्त एकच भाला अजून चमकत होता. अन् तेवढाच खानाच्या काळजांत खुपत होता. तेथे मराठ्यांची गर्दन बुलंद होती. तेथे अजून मराठ्यांचा भगवाझेंडा बुलंद फडकत होता. तें ठाणें म्हणजे चाकणचा भुईकोट किल्ला. किल्ले संग्रामदुर्ग !

हा किल्ला जिंकलाच पाहिजे, त्याशिवाय पुणें-गुलशनाबादचा रस्ता निर्धास्त होणार नाही, हें खान जाणून होता. गुलशनाबाद म्हणजे मराठ्यांचें प्रसिद्ध पुण्यक्षेत्र नाशिक! खानाच्या डोक्यांत सारखें एक नांव घुमत होतें—चाकण! चाकण!

चाकणच्या किल्ल्याची जी माहिती खानाला मिळाली होती, त्यावरून त्याची खात्रीच झाली होती की, चाकणचा किल्ला जिंकणें म्हणजे अगदी मोजक्या दिवसांचें काम आहे. एकदा आपल्या तोफा किल्ल्याच्या दरवाजावर धडकूं लागल्या की, आपोआप किल्ल्याची दातखीळ उचकटेल. शिवाय आपली अफाट फौज अन् हत्ती आहेतच. एक चाकणच काय, पण सारी दख्खन काबीज करूं शकूं असें हें आपलें बळ आहे.

शिवाय खानाने दक्षिणेंतील मोंगली किल्ल्यांतून मोठ्या मोठ्या तोफा मागविल्या[६] आणि दळ उभें केलें.

मृगाचा पाऊस पडावयास प्रारंभ झाला होता. नदी-ओढे भरून वाहूं लागले होते. तरीहि मराठ्यांचे छुपे छापे पुण्याच्या छावणीवर चालूच होते.[६] खानानेहि या पावसाला न डरतां चाकणची मोहीम मुकरर केली. पावसाळ्याचे चार महिने एवढी मोठी फौज बेकार ठेवण्यापेक्षा हा किल्ला घेणेंच योग्य असा विचार खानाने केला.[६] याहिपेक्षा भयंकर पावसांत पन्हाळ्याचा वेढा आदिलखानाचा सरदार सिद्दी जौहर हा चालवीत असल्याचें उदाहरण मोंगली फौजेपुढे होतेंच. म्हणून, औरंगझेबानेहि म्हणायला नको की आदिलखानाची फौज पावसाळ्यांत झुंजते तर तुम्हांला काय झालें झुंजायला?

आदिलखान म्हणजेच विजापूरचा बादशाह आदिलशाह. परंतु त्याचा उल्लेख 'शाह' या शब्दाने करणें औरंगझेबाला पसंद नसे! त्याला 'शाह' म्हणण्याने मोंगल बादशाहीचा अपमान होतो असें त्याला वाटे! दख्खनच्या एका 'क्षुद्र' राज्यकर्त्याला 'शाह' काय

म्हणून संबोधायचें ? त्यालाहि साधें 'खानच' म्हटलें पाहिजे ! म्हणून औरंगझेबाचे कोशांत 'आदिलशाह' असा शब्द नव्हता. 'आदिलखान' असा शब्द होता.[७]

तोफखान्याला हुकूम सुटला. फौज चाकणसाठी मुकर्रर झाली. हबशखान, सय्यद हसन, ऊझबेगखान, जाधवराव वगैरे मोठमोठ्या अनेक सरदारांस निघण्याचा हुकूम झाला.[८] खुद्द शाइस्तेखान जातीने निघाला. चाकण पुण्यापासून फक्त नऊ कोस. खानाची ढाल कुंभार-वेशींतून बाहेर पडली.

चाकणच्या चौफेर चौऱ्याशी गावें आहेत. या सर्व गावांना मिळून चाकण–चौऱ्याशी म्हणतात. हीं गावें म्हणजे जसे चौऱ्याशी तांबूस मोतीच होते. अन् चाकण म्हणजे त्यांत झळझळणारा जणू तांबडा खडाच. हा मोत्याचा घास गिळायला खान निघाला. हीं चौऱ्याशी गावें अजूनपर्यंत चाकणच्या मराठी अमलाखाली होतीं.

चाकणचा किल्ला तो केवढा ? किल्ला नव्हेच. गढीच ती. जास्तींत जास्त चारशे हशम राहूं शकतील एवढेंच आवार. अवघा चार बिघ्यांचा पसारा. किल्ल्याचा आकार चौकोनी होता. चार टोकांवर चार व मध्यें मध्यें एक एक, असे भव्य अन् अत्यंत बळकट बुरूज होते. पूर्वेच्या तटांत प्रचंड बुरुजांच्या मध्यावर दरवाजा होता. तटांची रुंदी आठ हात अन् उंची तीस हात होती. चिरेबंदी बांधणीचा हा मोहरेदार किल्ला अंगाबांध्याने असा खणखणीत होता कीं, जसा कांही भीमच बसलाय मांडी ठोकून !

या दगडी तटबंदीच्या बाहेर खंदक होता. खंदकाच्या बाहेर परकोट होता. किल्ल्याच्या प्रत्येक बुरुजावर तोफा उभ्या होत्या अन् दरवाजावर उंच उंच आस्मानांत मान ताठ करून भगवा झेंडा फडफडत होता.

शाइस्तेखान मोंगल चाकणावर चालून येतोय असें पाहून

चौऱ्याशींतले शेतकरी आपल्या घरचें धनधान्य घेतां आलें तेवढें घेऊन, लांब डोंगराच्या सांदी-कोपऱ्यांत पळाले. जातांना उरलेंसुरलें तें त्यांनी जाळून खाक केलें. दात कोरायला काडी ठेवली नाही. कऱ्हेपठाराचा अनुभव लक्षांत घेऊन इथले मराठे सावध झाले होते.

खान इंद्रायणी ओलांडून पुढे आला. सारा मुलुख उजाड पाहून तो चकितच झाला. आता फौजेच्या पुरवठ्याला पुण्याहून किंवा जुन्नरहून दाणा-वैरण आणणें त्याला भाग पडणार होतें.

खान झपाट्याने अंतर काटीत निघाला. तोफांचीं चाकें, घोड्यांच्या टापा, हत्तींचे चीत्कार आणि घंटा-घुंगरांची घण् घण्, खुळ् खुळ् एकमेकांत मिसळत होती.

खान चार कोस पुढे आला. आता चाकण एकच कोस राहिलें. खानाने आपल्या सरदारांना हल्ला कसा कसा आणि कोणीं कोणीं कोणत्या बाजूने करायचा हें आधीच समजाविलेलें होतें. टापांचा वेग वाढला.

खान चाकणच्या अगदी टप्प्यांत आला. लांब झाडीच्या पलिकडून आस्मानांत फडफड करणारा भगवाझेंडा दिसूं लागला. जणू फुरफुरती मशालच. किल्ल्याच्या तटांचा अन् बुरुजांचा वरचा भाग दिसूं लागला. ताठ केलेल्या बोटांसारखी एकेक तोफ तटा-बुरुजावर दिसूं लागली.

पहिला एल्गार कारिगार जर झाला नाही तर वेढा घालायचा, हें खानाचें ठरलेंच होतें. कोणीं कोणती बाजू धरायची, कोणत्या बाजूस मोर्चे लावायचे, हेंहि खानाने आधीच ठरविलेलें होतें. त्याप्रमाणे सर्वांस हुकूमहि केलेले होते.[८]

खानाची फौज किल्ल्याच्या अगदी नजीक आली. किल्ल्याची खडी तटबंदी दिसूं लागतांच मोंगली फौजा प्रचंड आस्मानभेदी गर्जना करीत किल्ल्याकडे धावत सुटल्या. घोडे जोडलेल्या तोफा थाड थाड चाकें उडवीत दौडत होत्या. घोड्यांच्या टापांखाली जमीन पिंजत होती.

किल्ल्यावरचे लोक सरसावले. किल्ल्याच्या नौबतखान्यांत वाद्यें गर्जूं लागलीं.

मोंगली फौज किल्ल्याच्या सावलीपर्यंत आली. किल्ल्यावरच्या तोफांना एकदम बत्ती मिळाली. धडाड धडाड गोळे सुटूं लागले. बदुकांच्या फैरी फाड फाड उडूं लागल्या. खानाची फौज गांगरली. एकदम किल्ल्याला भिडायचीं स्वप्नें विरघळलीं. आरडाओरडा, रणवाद्यांचा कल्लोळ, तोफा-बंदुकांचा धूमधडाका आणि हत्ती-घोड्यांच्या ओरडण्याची त्यांतच भर. तोफांच्या धुरानें तर कांहीहि दिसेना. दारूच्या वासाने हवा सर्द झाली. घसे फोडफोडून सरदार हुकूम सोडीत होते. धुळीचे लोट उंच उंच उसळत होते. दारूगोळ्याच्या दणदणाटांत कांहीच ऐकूं येत नव्हतें.

किल्ल्यावरून होणाऱ्या माऱ्यामुळे मोंगली फौजेचा डाव फिसकटला. शाइस्तेखान स्वतः किल्ल्याच्या उत्तरेच्या बाजूस गेला. खानाच्या खास दिमतीचे सरदार गिरिधरकुंवर, बीरमदेव, हबशखान, दावाजी वगैरे खानाच्या मागोमाग गेले. शम्सुद्दीनखान, मीर अब्दुल मबूद दरोगा, सय्यद हसन, ऊझबेगखान, खुदावंतखान हबशी, विजयसिंह, सुलतान अली अरब व अलायार बुखारी हे किल्ल्याच्या पूर्वेच्या बाजूला धावले. किल्ल्याचा दरवाजा याच बाजूस होता. राव भावसिंग, शर्फराजखान, जाधवराव, जौहरखान हबशी हे दक्षिणेच्या बाजूस सरकले. आणि राजा रायसिंग हा एकटा सरदार आपल्या फौजेसह पश्चिमेच्या बाजूवर थांबला.[८]

—आणि सर्वांनीच बंदुकीच्या टप्प्याच्या अंतरापासून बरेच लांब तळ दिले. किल्ल्यास चारहि बाजूंनी मोंगलांचे मोर्चे बसले. चौफेर वेढा पडला.[८]

किल्ल्यांतील मंडळी मात्र खानाच्या फौजेची उडालेली तिरपीट अन् फसलेला बेत पाहून खूष झाली होती.

शाइस्तेखानाच्या वेढ्याचा दुसरा दिवस उजाडला. किल्ल्याच्या नजीक जाऊन तटावर यशस्वी मारा करणें जरूर होतें. परंतु किल्ल्या-वरून बाण आणि बंदुकांच्या गोळ्या इतक्या अचूक अन् असंख्य सुटत होत्या की, तटाजवळ जायचें नांवच नको! धमधमे रचून त्याच्या आड खानाच्या सरदारांनी तोफा-बंदुकांचे मोर्चे उभे केले आणि त्यांच्या आडून तटावर मारा करण्याचा प्रयत्न मोंगल करूं लागले.[८]

किल्ल्यांतील मराठ्यांनी दारूचे मोठमोठे बाण मोंगलांवर सोडण्यास सुरुवात केली.[८] त्यामुळे मोंगल अगदी हैराण झाले. त्यांचे मोर्चे कांही ठरेनात. धारिष्ट करून मोंगली हशम पुढे जात अन् गोळ्या झाडीत. पण परिणाम उलटाच होई. मावळे त्यांना अचूक टिपीत. तटाच्या आडून जांग्यांतून गोळ्या झाडणारे मावळे सुखरूप होते. बेदरकार होते.

खानाची नाकेबंदी मात्र पक्की होती.[८] किल्ल्यांत चोरूनमारून जाण्याइतकीसुद्धा फट ठेवली नव्हती. खान ही पक्की खात्री धरून होता की, आंतले लोक धान्य संपलें आणि दारूगोळा संपला की, उघड्या वाळूवर पडलेल्या माशासारखे तडफडूं लागतील. किल्ला हा हमखास मिळणारच. पण इतकी वाट बघत बसायला खानाला धीर नव्हता.

—पांच दिवस उलटले. मावळ्यांनी मोंगलांची बंदुकींनी टवाळी चालविली होती. मोंगलांचा मोर्चा दहावीस पावलें निर्धास्त पुढे येऊं द्यावा अन् मग बुरुजावरून एकच तोफ अशी डागावी की केलेली सारी धडपड आस्मानांत! आणि मग प्रत्येक मावळा हसत हसत खानाच्या फौजेकडे पाहात राही. खान मात्र चडफडे.

—तिकडे महाराज पन्हाळगडावर सुटकेकरिता तळमळत होते.

—दहा दिवस गेले. मावळ्यांच्या आता सारें अंगवळणीं पडलें. गेल्या दहा दिवसांत शाइस्तेखानाने खंडींनी दारूगोळा उडविला

होता. पण फक्त आवाज अन् धूर याशिवाय त्यांतून कांहीच निर्माण झालें नव्हतें अन् होतहि नव्हतें. किल्ल्याची मूठभर मातीसुद्धा निखळली नव्हती. रात्र झाली की, किल्ल्यांतल्या मावळ्यांना उजाडे ! मोंगली फौज श्रमाने सुस्तावे. त्यांतच पाऊस सुरू झाला होता.[८] रात्रींअपरात्रीं छावणींत सुस्त शांतता दिसली की, किल्ल्याचा दिंडी दरवाजा उघडून चाकणचा किल्लेदार आपल्याबरोबर टोळकीं घेऊन मुंगसासारखा बाहेर पडून भराभर छावणींत घुसून सपाटून कापाकाप उडवी.[८] छावणींत गोंधळ उडाला की, मोंगली शिपाई खडबडून धावत. पण तोंपर्यंत हे सारे उंदीर किल्ल्यांत पसार होऊन दिंडी लावून घेतांना त्यांना दिसत ! जवळ जायची तर सोयच नव्हती. जरा जवळ गेलें की ढः ढः ढः गोळ्या सुटत.[८]

—पंधरा दिवस होऊन गेले. खानाने शिकस्त चालविली होती. दारूगोळ्याचे पेटारेच्या पेटारे रिकामे होत होते. तोफांचीं तोंडें आग ओकून ओकून लालावलीं होतीं. चाकणची रग वाढत होती. मावळ्यांची पुरेपूर खात्री होती की, आज ना उद्या, लौकरांत लौकर आपले महाराज पन्हाळगडांतून निसटतील. आणि मग आपल्याला कुमक येईल.[९] मग बघूंच या खानाकडे ! महाराज सुटेपर्यंत या खानाला मिशीच्या केसाइतकेंहि पुढे येऊं द्यायचें नाही.

किल्ल्यांतला प्रत्येक मावळा न् मावळा जबर निष्ठेचा होता. त्यांच्या पाठीशीं किल्लेदारहि तसाच भक्कम बुरुजासारखा उभा होता. एक एक दिवस उलटत होता. पण किल्ल्याची हिम्मत वाढतच होती. किल्ल्यांतले मावळे म्हणत,[९] "जव पावतर आमचं महाराज पन्हाळगडावर त्या बळजोर शिद्दी जव्हारशीं लढत हायेत, तव पावतर आम्ही समदी मिळूनशान चाकण चौऱ्याशींत गनिमासंगं पावला पावला लढूं !"

शाइस्तेखानाला किल्ल्यांतील मराठ्यांची चिवट हिम्मत पावलो-

पावलीं प्रत्ययाला येत होती. त्याला ही गोष्ट कांही सहन होत नव्हती.[९] पण करणार काय ! त्यांतच पावसाने धो धो धार धरली होती.[८]

चाकणच्या किल्ल्यांत घुसण्याकरिता काय करावें हें खानाला समजेना.

—आणि पन्हाळगडांतून निसटण्याकरिता काय करावें, हें महाराजांस समजेना. पन्हाळगडचा वेढा आवळत चालला. जौहर–फाजलने अगदी मगरमिठी मारली. गड त्यांच्या 'बा 'ला मिळाला नसता. पण महाराजांना मात्र बाहेर निसटायला फटसुद्धा न उरल्यामुळे गुदमरल्या-सारखें झालें होतें.

—चाकणचाहि वेढा खानाने कमालीच्या नेटाने चालविला होता.

महाराजांकडून कुमक येईल या खात्रीवर चाकणचे डोळे पन्हाळ्याकडे लागले होते.

—अन् सिद्दी जौहर, फाजलखान आणि त्यांची पस्तीस हजार फौज पन्हाळ्याकडे डोळे लावून बसली होती, शिवाजी केव्हा शरण येतोय याची वाट पाहात.

स्वराज्याच्या शिलेदारींत सामील झालेल्या प्रत्येक मराठ्याची यावेळीं परीक्षाच चालू होती. त्यांचा सर्वांचा मुक्काम जणू मृत्यूच्या ओठावर होता. मृत्यूने नुसती जीभ जरी ओठावरून फिरविली, तरीहि नाश ठेवलेलाच ! पण रणांगण आणि युद्ध म्हटलें की, असेंच असावयाचें. परंतु या शिलेदारांच्या घरच्या वायकामुलांनाहि अशाच कठिण गोष्टींना तोंड द्यावयाची वेळ आली होती. बादशाह अली आदिलशाहाने तर केदारजी खोपडे देशमुखाला असा हुकूम पाठविला होता की, गनिमाच्या निसवतींचे, म्हणजे शिवाजीच्या पदरचे जे जे लोक जागोजागीं असतील, त्यांस दस्त करून हुजूर पाठव आणि त्यांची जी कांही चीजवस्त सापडेल ती खुशाल लूट ![११]

स्वराज्याचा शिपाई होणें इतकें महाग होतें !

सिद्दी जौहरने पन्हाळगडच्या वेढ्याच्या वेळीं आणखी एक गोष्ट केली होती. त्याच्या फौजेंतील दोघां प्रख्यात सरदारांस विशाळगडाकडे पाठवून विशाळगडासहि मोर्चे देण्याचा हुकूम दिला होता.[१२] हे दोन सरदार म्हणजे पालीचा जसवंतराव आणि शृंगारपूरचा सूर्यराव सुर्वे. जौहरच्या हुकुमाप्रमाणे या दोघां सरदारांनी विशाळगडास मोर्चे दिलेहि होते.[१२] विशाळगड सहा महिन्यांपूर्वीच स्वराज्यांत सामील झाला होता जसवंतराव व सूर्यराव विशाळ्याशीं झुंजत होते. पण अद्याप त्यांना तोहि गड जिंकतां आलेला नव्हता. गडावर स्वराज्याचा झेंडा फडकत होता. विशाळगड हा किल्ला पन्हाळगडाच्या किंचित् वायव्येस वीस कोसांवर आहे.[१३]

वास्तविक विजापुराहून आदिलशाह बादशाहाने दिल्लीला अर्ज पाठवून औरंगझेबाकडे मदत मागितली होती. औरंगझेबाने त्याप्रमाणे शाइस्तेखानाला पाठविलेंहि. परंतु विजापूरकरांशीं हातमिळवणी न करतां स्वतंत्रच मोहीम चालू ठेवण्याचा त्याला औरंगझेबाचा हुकूम झाला. त्यामुळे दिल्लीच्या फौजा जौहरशीं हातमिळवणी करूं शकल्या नाहीत. जर तसें झालें असतें तर मात्र पन्हाळ्याच्या वेढ्याला चालू वेढ्यापेक्षाहि महाभयंकर स्वरूप आलें असतें. परंतु या 'आदिलखाना'शीं हातमिळवणी करणें कमीपणाचें वाटलें म्हणून मोंगलांनी स्वतंत्रच मोहीम मांडली.


महाराजांनी आतापर्यंत कितीतरी सरदारांना 'बनविलें' होतें. कितीतरी मिजासखोरांना झुकांड्या दिल्या होत्या. आदिलशाहाला हे त्यांचे गुण माहीत झाले होते. म्हणूनच तो वारंवार फर्मानें पाठवून सिद्दी जौहरला हुकूम आणि इशारे देत होता की, या लबाड शिवाजीपासून सावध राहा! तो एखादे वेळीं गोड गोड थापा देईल. तरीहि तूं त्यावर विश्वास ठेवूं नकोस! तो अत्यंत बिलंदर आहे!

जौहरनेहि खरोखरच अत्यंत नेकीने, परिश्रमपूर्वक आणि डोळ्यांत तेल घालून अहोरात्र पन्हाळ्याचा वेढा सावध ठेवला होता. मुंगीसुद्धा बाहेरून गडावर, किंवा गडावरून बाहेर येऊं शकणार नाही इतका हा वेढा त्याने कडक ठेवला होता.[१४] 'अज्ञाता नैव निर्याति न चायाति पिपीलिका!'

* * *

**आधारः**—(१) शिकापसासंले. ८२६. (२) शिभा २५।६० ते ६२; पसासंले. ८८०. (३) शिभा २६।२. (४) शिचसा ४।६८७. (५) पेशवेद ३१।३८. (६) शिचत्रसं. ३ पृ. २४. (७) औनामा १ पृ. ५६, ६९ व ७०; आघइ पृ. १९३. (८) शिभा २५।६३ ते ६५; शिचत्रसं. ३ पृ. ६७. (९) शिभा २५।६६. (१०) ऐसंसा. १।१३७. (११) ऐफासा. २।२५. (१२) शिभा २७।२६ व २७. (१३) शिभा २७।१३. (१४) शिभा २७।११.

## १०. हेजीब



आषाढाचा महिना उजाडला. मुसळधार पावसांत पन्हाळा न्हाऊन निघत होता. पाण्याचे लोट डोंगरावरून उड्या मारीत खळाळत होते.[५] सगळी सृष्टि हिरवळून गेली होती.

आणि पन्हाळ्याला हिरवागार विळखा पडला होता. एवढा पाऊस कोसळत असूनहि जौहरचे हजारो हशम रात्रीं आणि दिवसां गडावर डोळे रोखून मोर्चे लावून बसले होते. पन्हाळ्यांतून सुटका होण्याच्या सर्व आशा संपल्या होत्या. कसें निसटावें याचा सतत विचार महाराज करीत होते. विचार करून करून डोक्याला भेगा पडायची वेळ आली होती. कांही अस्पष्ट अस्पष्ट अशा कल्पना डोळ्यापुढे रेंगाळत होत्या.[४]

गडावर एकूण शिबंदी सहा हजार सैनिकांची होती.[४] खासे खासे कारकून, नाईक, सबनीस, हवालदार, कारखानीस वगैरे मंडळीहि होती. त्यांत त्र्यंबक भास्कर नांवाचे एक निष्ठावंत, धैर्यशाली, शूर आणि भारदस्त ब्राह्मण होते. त्यांच्यावर महाराजांचा फार मोठा इतबार होता. तसेच, गंगाधरपंत नांवाचे एक हुशार मुत्सद्दी गडावर होते. परंतु या दोघांहि पंतांचीं आडनांवें इतिहासाला अज्ञात आहेत. यांच्याशिवाय आणखी कितीतरी मोलाचीं माणसें गडावर होतीं. त्यांतच हिरडस मावळांतील एक पाणीदार हुरमुजी मोती महाराजांच्या तुऱ्यांत चमकत होता.—बाजीप्रभु देशपांडे ! ‘ बा-जी-प्र-भु दे-श-पां-डे ’ हीं अक्षरें उच्चारलीं की, असा भास व्हावा की, जणू शेरभर निखळ शुद्ध सोन्याचा घडीव तोडाच उजव्या हातावर तोलतों आहोंत ! गडावरच्या सहा हजारांत बाजीप्रभूंचाहि मुजरा झडत होता.

मराठी ... संग्रहालय.
अनुक्रमांक 24862 वि. ...
क्रमांक ... नों दि: 12-2-59

बाजीप्रभु हिरडस मावळचे पिढीजात देशकुलकर्णी होते. देश-कुलकर्णी म्हणजेच देशपांडे. बांदल देशमुखांच्या हाताखाली ते हिरडस मावळांत कारभार पाहात. हिरडस मावळ भोर तालुक्यांत आहे.

महाराजांनी बाजींना आजवर मावळांतल्या किल्ल्यांच्या बंदोबस्ताचीं व डागडुजीचीं कामें सांगितलीं होतीं. हिरडस मावळांतल्या एका गडाच्या बंदोबस्ताची कामगिरी बाजींवर सोपवितांना, त्यांना पाठविलेल्या एका पत्रांत महाराजांनी लिहिलें होतें,

'मशाहुरूल अनाम बाजप्रभु प्रति राजेश्री सिवाजीराजे........... कासलोडगड हिरडस मावळामधे आहे. तो गड ऊस पडला........... याचें नाव मोहनगड ठेउनु किला बसवावा यैसा तह...........तरी तुम्ही.......मोहनगड गडावरी.......अळंगा मजबूद करूनु........ किला मजबूद करूनु....मग तुम्ही किल्याखाले उतरणे मोर्तबसुद.'

या पत्रावर तारीख आहे, सुहूर सन तिसा खमसैन व अलफ छ. रमजान १ (दि. १३ मे १६५९). म्हणजे अफजलवधापूर्वीचा हा हुकूम होता.

नंतर बाजीप्रभु पन्हाळाप्रांतींच्या मोहिमांत महाराजांसन्निध राहिले. या बिकट प्रसंगींहि ते पन्हाळगडावर होते.

बाजींच्या देहाची इमारत भक्कम होती. सतत वीस बावीस तास शारीरिक कष्ट करण्याची त्यांची ताकद होती. त्यांचें वय यावेळीं सुमारें पंचेचाळीस ते पन्नास असावें. ते रंगारूपाने कसे होते कोणास ठाऊक! पण त्यांच्या शेल्याच्या पट्टीखाली ती धाडसी छाती दडलेली असे. छातीच्या आंत निष्ठा दडलेली असे. म्यानांत समशेर दडलेली असे. समशेरींत पराक्रम दडलेला असे. अन् शंकराच्या मंदिरांत हात जोडतांना जो भाव हृदयांत असायचा, तोच भाव महाराजांस केल्या जाणाऱ्या त्यांच्या मुजऱ्यांत दडलेला असे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

असे मोठ्या मजबुदीचे बाजी पन्हाळ्यावर महाराजांच्या पाठीशीं होते.

आषाढ निम्मा संपत आला. शुद्ध चतुर्दशीची रात्र उगवली (दि. ११ जुलै १६६०). आकाशात चंद्र होता, पण ढगांखाली झाकाळून गेलेला. गडावरचे मावळे शत्रूपेक्षा सावध राहून गडाची राखण करीत होते. विचार करून करून शिणलेल्या महाराजांस अलगद निद्रा लागली. रात्र चिणाचिण वाजत होती. क्षणाक्षणाने संपत होती.

पहाट झाली. कांहीं तरी विलक्षण स्वप्न महाराजांस पडलें.[1] ते अर्धवट अर्धवट जागे झाले आणि त्याच स्थितींत त्यांनी हात जोडले. वारंवार नमस्कार करीत करीतच ते पूर्ण जागे झाले. जागे झाले तरीहि ते वंदन करीतच होते.[2] कोणाला? रामवरदायिनी भगवती तुळजाभवानीला. महाराजांस कांही एक विलक्षण प्रेरणा मिळाली होती.[3]

सूर्योदय झाला. अर्थात् ढगाआडच. महाराजांनी आज अखेरचा निर्णय घेण्याचें निश्चित केलें. वेढा उठण्याची अन् उठविण्याची आशा आणि प्रयत्न संपले होते. येथून पुढे गडांत कोंडून राहाणें हें घातकारक होतें. कांहीहि करून बाहेर पडण्याचा महाराजांनी निश्चय केला. कांही तरी भयंकर धाडसी बेत त्यांच्या मनांत घोळत होता. धोक्याचा, हिमतीचा, जिवावरचा! भवानीचें नांव घेऊन अन् तिच्यावर सर्व भरवसा टाकून![3]

महाराजांनी गडावरच्या आपल्या डाव्या उजव्या मातवर जिवलगांना सदरेवर बोलाविलें. त्यांत अर्थात् बाजीप्रभु, त्र्यंबक भास्कर आणि गंगाधरपंत होतेच. आपल्या मनांतली धाडसाची मसलत महाराजांन आपल्या सरदारांस सांगितली. महाराज म्हणाले,[6]

"—चैत्रापासून आज चार महिने झाले, हत्यार उभें धरून आपण शर्थीने झुंजतों आहोंत. हा आषाढाचा महिना निम्म्यावर आला. ज्यांचा पराक्रम गनिमांना सोसवणार नाही, असे समशेरबहादूर आम्ही लोक

असूनहि सिद्दी जौहर आमच्या हातून उडूं शकलेला नाही. सरनौबत नेताजी पालकरांनीहि सिकस्त खाल्ली! जौहरचा वेढा आम्हाला थोडा सुद्धा उठवितां येत नाही. जौहर बळजोर आहे. जंगबहादूर आहे. त्याची फौजहि मातबर आहे. त्याला मोडणें आज तरी आपणांस दुरापास्त आहे. तिकडे पुण्याचा परगणा मोंगल फौज पायाखाली घालीत असतां, सिद्दी जौहरशीं झुंजण्यांत मी येथे फार काळ गुंतून पडावें, हें वाजवी वाटत नाही. तिकडे मोंगलांशीं झुंज दिलीच पाहिजे. तेवढ्यासाठी मी आता येथून निघून गेलेंच पाहिजे!—"

महाराजांचे हे शब्द ऐकून सदर चमकली. त्यांत काळजी होती अन् उत्सुकताहि होती. महाराज जाणार तरी कसे येथून? गडाला तर चिरेबंदी वेढा आहे शत्रूचा! मग अशी कोणती मसलत महाराजांनी ठरविली आहे? ती जाणायला मंडळी आतुर झाली.

महाराजांची मसलत खरोखरच भयंकर धाडसाची होती. जिवावर बेतणारी होती. तडीला जाण्यास अतिशय अवघड होती. ती त्यांनी त्या विश्वासाच्या निवडक मंडळींना सांगितली.

—आणि गडावर कांही मोजकीं माणसें,—नक्की किती तेंहि कुणाला ठाऊक नाही—एका अवघड कामगिरीसाठी हिरीरीने तयार होऊन उभीं राहिलीं. हीं माणसें कोण? त्यांचीं नांवें काय?—माहीत नाही! इतिहास त्यांच्या सावल्यांवर पाळत ठेवून उभा होता. त्यालाहि त्यांचीं नांवें–गावें समजलीं नाहीत! पण त्यांची गुप्त धाडसी करामत मात्र इतिहासाला समजली! तीहि अंधुक अंधुक. काळाच्या काळोखांत कोणा एका कवींद्राच्या प्रतिभेची वीज फक्त एकदाच झर्कन् चमकून गेली.[१६] आणि तेवढ्या निमिषार्धांत, त्या साहसी सावल्यांचे तोंडावळे उजळले गेले. अन् इतिहासाला समजलें की, ते धाडसी मर्द म्हणजे महाराजांचे हेर होते![१६] सिद्दी जौहरच्या वेढ्यांतून पसार होण्यासाठी

कुठे एखादी फट सापडते का, हें हेरून काढण्यासाठी, हे हेर गडाखाली उतरणार होते! मगरीच्या जबड्यांत शिरून तिच्या दातांत कांही फटी आहेत का, हें शोधण्याइतकेंच हें काम सोपें होतें!! पण ही कामगिरी त्या मर्दांनी उचलली! महाराजांच्या मसलतींतील सर्वांत पहिली आणि महत्त्वाची कामगिरी हीच होती.

अगदी गुपचूप हे हेर गडांतून बाहेर पडले (ही वेळ अर्थात् रात्रीचीच असली पाहिजे). सतत जागे असलेल्या शत्रुसैनिकांच्या डोळ्यांत किंवा गोळ्यांत न गवसतां वेढ्यांत एखादी नाजूक जागा शोधायची होती. कोठून केव्हा फाडकन् गोळी सुटेल, कोठून सर्रर्र

*अचूक माहिती तर निश्चित यश. हीच तर हेरगिरी!*



आणि गंगाधरपंत खाली खाली उतरत होते. थोड्याच वेळांत पंत तळाशीं आले. छावणींत आले. जौहरच्या शामियान्यांत दाखल झाले. त्यांच्या वागण्यांत वकिली नम्रता होती. जणू काळ्या मुलीचें लग्न ठरवायला आलेला बापच !

—गडावर महाराज जगदंबेचीं पावलें स्मरीत पुढचा बेत आखीत होते.

—मोठ्या आदबीने पंतांनी जौहरला महाराजांचें पत्र सादर केलें. महाराजांनी अत्यंत नम्र भाषेंत पाठविलेल्या फार्सी मजकुराचा हिंदवी तर्जुमा असा[८] :

'....आपण पन्हाळगडाकडे येत असल्याची वातमी पूर्वीच जेव्हा मला समजली, तेव्हाच माझ्या मनांत इच्छा निर्माण झाली की, आपणास सामोरे येऊन, आपली कृपा संपादन करून, संकटांतून मुक्त व्हावें आणि सर्फराज व्हावें. परंतु भय आणि कमनशीब यांनी माझें मन वेढून टाकलें होतें. आपलें शुभ आगमन किल्ल्याच्या पायथ्याशीं पूर्वीच झालेलें आहे. आपण जर परवानगी द्याल तर रात्रीच्या वेळीं मोजक्या लोकांसह मी आपल्या सेवेस हाजीर होईन आणि माझी इच्छा आपणास निवेदन करीन. आपला कृपायुक्त उपदेश मी माझ्या हृदयांत साठवून घेईन. माझी खात्री आहे की, आपल्या कृपेमुळेच माझ्या आशा सफल होतील. परमेश्वराची आणि बादशाहांची कृपा झाल्यावर अगदी सामान्य मनुष्यहि मोठेपणास का पोहोचणार नाही ? मीं केलेले मोठे मोठे गुन्हे आपण मला माफ करावे. कोणत्याहि संकटापासून वडीलपणाने आपणच माझें संरक्षण करावें. मी स्वत: आपणास जातीने भेटावयास येण्यास तयार आहें आणि माझी सर्व दामदौलत हजरत बादशाहांच्या नांवाने आपल्या स्वाधीन करण्यासहि मी तयार आहें...'

हें पत्र पाहून सिद्दी जौहर स्तब्धच झाला. बिनशर्त शरणागती ? हा क्षण आपण फार सावधपणाने सांभाळला पाहिजे, कारण या

वाटाघाटी त्या महा लबाड आणि कारस्थानी शिवाजीशीं आहेत, तो केव्हा फसवील याचा नेम नाही, अशी सिद्दीला मनांतून टोचणी होती. बादशाहाने वारंवार दिलेले सावधतेचे इशारेहि त्याच्या डोक्यांत गस्त घालीत होते. महाराजांच्या आजपर्यंतच्या सर्व लबाड्यांचा हिशेब आणि वचक मनांत धरूनच तो विचार करीत होता. परंतु महाराजांचें तें स्पष्ट स्पष्ट पत्र आणि गंगाधर पंडितांचा प्रांजळ निर्वाळा ऐकल्यावर जौहर मुग्धच झाला. यापेक्षा आपल्याला तरी दुसरें काय हवें आहे ? शिवाजीने बिनशर्त शरण यावें आणि बळकावलेले एकूण एक किल्ले आणि मुलुख बादशाहाच्या स्वाधीन करावेत, हीच आपली इच्छा आहे. मग शिवाजी तर हीच गोष्ट अगदी स्पष्ट शब्दांत लेखी कबूल करीत आहे! अगदी स्वत: होऊन आपल्यासमोर तो हजर होणार आहे! सर्व बळकावलेली दौलत आपल्या स्वाधीन करणार आहे! आता उरलेंच काय बोलायचें? मुद्देच संपले!

—आणि समजा, शिवाजीने येथे येऊन दगाफटका केला तर? पण तें अशक्य आहे! शिवाजीला तें आता जमणार नाही! पस्तीस हजार फौजेच्या गराड्यांत येऊन आपल्यासारख्या सावध आणि शूर माणसाशीं अफजलखानाप्रमाणे दगाबाजी करण्याची त्याची काय हिम्मत आहे! असे कांही वेडे चाळे करण्याइतका तो खास मूर्ख नाही! अन् जर यांतूनहि त्याने असा कांही खुळा प्रयत्न केलाच तर चुराडा उडेल त्याचाच! आपण कमालीचे सावध आहोंतच.

—आता अवकाश फक्त एकच दिवसाचा आहे. उद्या रात्रीं तो येणारच आहे. युद्धप्रसंगावाचून फक्त एका घासांत शिवाजीसकट सबंध मराठी बंड आणि मराठी दौलत अलगत गिळतां येणार! हें यश अतुलनीय, अद्वितीय आणि सर्वश्रेष्ठ आहे.

—अन् कबूल करूनहि शिवाजी उद्या रात्रीं आलाच नाही तर ?

—तर वेढा चालूच आहे. चालूच राहील. अन्नावाचून तडफडून तो मरेपर्यंत चालू राहील. मग कितीहि दिवस लागोत. शिवाजी हातीं येईपर्यंत आपण येथून हलणारच नाही हें खास !

अशा अगदी जवाबदार सावधपणाने जौहरने मनाशीं सर्वांगीण विचार केला. दुसरा विचार तो काय करणार? त्याला बोलायला महाराजांनी जागाच ठेवली नव्हती.

गंगाधरपंत उत्तराच्या अपेक्षेने नम्रपणें उभे होते.

जौहरने महाराजांच्या अर्जाला मंजुरी दिली !

पंत जौहरचा निरोप घेऊन गडावर जाण्यास निघाले. पंतांच्या डोळ्यांत मिस्किल आनंद दडलेला होता.

जौहरला मनापासून आनंद झाला होता. पण बेसावधपणा त्यांत नव्हता; जवाबदार भारदस्तपणाच होता. चार महिन्यांच्या कडकडीत वेढ्यानेच शिवाजीसारखा पटाईत वाघ आपण होऊन शरण येतोय हें पाहून जौहरला थोडा तरी अभिमान वाटावा, हें साहजिकच होतें. तो गुप्तपणें खूष होता ! याला म्हणतात कर्तबगारी ! सलाबत ! बुलंद तकदीर !

गडावरून शिवाजीचा वकील आला आणि करार ठरवून गेला, या गोष्टीचा जौहरच्या छावणीवर परिणाम झाला ! छावणींत शिवाजी बिनशर्त आपल्या स्वाधीन होणार ही खबर पसरली ! उद्याच शिवाजी हातीं येणार ! म्हणजे संपलीच की मोहिमेची यातायात ! फौजेला आनंद झाला. खरोखर ही बातमी अफूच्या गोळीसारखी होती. प्रत्यक्ष अजून न मिळालेल्या विजयाच्या गाफील आनंदाची धुंदी चढूं लागली.

अगदी न कळत वेढ्याचा कडकडीत पीळ ढिला होत चालला ![१०] माणसाला, शिजेपर्यंत दम निघतो, पण निवेपर्यंत दम निघत नाही म्हणतात, तो असा !

सूर्य ढगाआड होता. त्याचीं पावलें तो टाकीतच होता.

गडावर महाराजांनी सर्व योजना आधी अगदी काटेकोर दक्षतेने तयार केलेली होती. महाराजांचें प्रत्येक काम योजनाबद्धच असे. मग तें किल्लेकोटांच्या बांधणीचें असो, लढाईचें असो, लुटीचें असो, छाप्याचें असो वा उत्सवमहोत्सवाचें असो. पन्हाळगडावरून पळून जाण्याचा मनसुबाहि असाच त्यांनी योजनाबद्ध ठरविला होता. गडावरून रात्रीच्या प्रहरांत (म्हणजे दि. १२ जुलै १६६०, आषाढ पौर्णिमा, गुरुवार रोजीं रात्रीं १० वाजायच्या आंत), सुमारें सहाशे हत्यारबंद पायदळ शिपाईगड्यांसह गुपचूप उतरायचें आणि जौहरच्या फौजेला चाहूलहि लागूं न देतां विशाळगडाकडे पसार व्हायचें!

योजलेल्या या डावांत महाराजांच्या जिवाला केवढा भयंकर धोका होता! वेढ्यांतून जायला कमींत कमी धोक्याची फट शोधलेली होती; गंगाधरपंडित वकिलांच्या मार्फत जौहरला शरणागतीची हूल दाखवून शत्रुसैन्याला गाफील बनविण्याची योजना केलेली होती; तरी यशाची खात्री काय? शत्रूचा डोळा चुकवून—छे: छे:! तें काय सोपें होतें? बेत फसला, दगा झाला तर! मरणच! राईराईएवढे तुकडे!

या योजनेंतील उत्तरार्ध अधिकच अवघड होता. पन्हाळगडावरून निसटून विशाळगडावर जायचें! विशाळगड काय सुखरूप होता काय या वेळीं? नव्हता! विशाळगडालाहि विजापूरकरांच्या दोन सरदारांनी आधीपासूनच नाकेबंदी करून मोर्चे दिले होते! सूर्यराव सुर्वे आणि जसवंतराव पालवणीकर या दोघांनी फौजेसह विशाळगडाला घेरलें होतें.[१४] म्हणजे पाहा केवढा भयंकर अवघड डाव योजला होता महाराजांनी! पन्हाळ्यांतून निसटणें कठीण आणि विशाळडावर पोहोचणें कठीण! दोन्ही गडांच्या पायथ्यांशीं यमदूतांचा वेढा होता!

मग महाराज हें वेडें धाडस करावयास तयार तरी कसे झाले? त्यांनी दूरवर कांही विचार केला होता की नाही?

होय, केला होता. एक तर, दिवसेंदिवस परिस्थिति इतकी कठीण होत चालली होती की, जर आताच, त्यांतल्या त्यांत पावसाळ्याच्या गडबडींत, पळण्याचा यत्न केला नाही, तर पावसाळ्यानंतर जौहर जास्तच प्रबळ वेढा घालून प्रखर चढाया सुरू करील; पावसाळ्यानंतर त्याची फौज अधिकच ताजीतवानी होईल; मग तर गडांतून निसटून जाणें अशक्य—कालत्रयींहि अशक्य होऊन बसेल. शिवाय शाइस्ते-खानाचा वरवंटा पुण्याच्या बाजूनंतर कोकणावर व मावळांत फिरूं लागेल. मग तो नाश वांचविणें कधींहि शक्य होणार नाही. स्वराज्य मरून जाईल! पन्हाळ्यांतून निसटायचें असेल तर हाच डाव, हीच वेळ, हीच संधी, अखेरची! यानंतर वाट पाहायची असेल तर फक्त मरणाचीच पाहावी लागेल! जास्तींत जास्त अभ्यासपूर्वक दूरदर्शीपणाने, तर्कशुद्ध, काटेकोर, पूर्ण सुसज्ज असा योजनाबद्ध डाव करून उडी घेणें हाच एकमेव उपाय होता.

पूर्ण प्रयत्न आणि श्रीभवानीवर पूर्ण भरवसा हें महाराजांचें जीवनसूत्र होतें. त्यांचीं पावलें तशींच पडत होतीं.

पन्हाळगडापासून विशाळगडापर्यंतचा मुलुख महाराजांच्या नजरे-पुढून फिरत होता. अवघे वीसच कोसांचे अंतर हें. परंतु पृथ्वीप्रदक्षिणे-इतकें अफाट वाटत होतें. वाट सुधी नव्हती. वाट नव्हेच ती. तेथून पावलें टाकीत जायचें होतें म्हणूनच केवळ वाट म्हणायचें. दगडधोंडे, खोलगट घळी, रानझुडपें, पाण्याचे लोट, शेवाळ्याचा अन् चिखलाचा बुजबुजाट आणि असेच शेपन्नास अवगुण या वीस कोसांवर निसर्गाने अंथरून ठेवलेले होते. अन् तेथूनच जावें लागणार होते. ही वाट म्हणायची! रात्रीची वेळ म्हणजे अंधारच. पण हा अंधार मात्र खरोखर फार प्रेमळ होता. महाराजांना तो विश्वासाच्या दिलाशाने म्हणत होता की, शिवबा, काळजी नको करूस. माझ्या काळ्या शेल्याखाली झाकून

अनुक्रमांक २४४८२ दि: १११
क्रमांक ८६५ नों: दि: १२-२-५९

तुला घेऊन जाईन !

अंधाराची अन् महाराजांची दोस्ती अगदी जन्मापासूनची. महाराजांचा तो जिवलग सखा. महाराजांचे मोठमोठे धाडसाचे मनसुबे नेहमी ठरत ते अंधाराशी गुप्त खलबत केल्यानंतरच !

गंगाधरपंत गडावर आले. महाराजांना त्यांनी आपल्या वकिलीचा करिणा सांगितला.

आता पुढचें पाऊल ! एवढा बिकट मनसुबा ऐकून महाराजांचें जिवलग डरले काय ? छे: ! उलट आनंदाने तरारले. त्यांच्या त्या आनंदांत गांभीर्य होतें, वीरश्री होती, काळजीहि होती. प्रत्येकाला तेंच हवें हात. हौस धाडसाचीच. आत्यंतिक शारीरिक कष्ट करण्याची तयारी आणि कमालीची निष्ठा हेंच तर महाराजांच्या मित्रांचें मुख्य लक्षण !

आजच्या रात्रींच पहिल्या प्रहरांत निघावयाचें होतें. आता वेळ तसा फार राहिला नव्हता. तयारी सुरू झाली होती. सर्वांची मुख्य तयारी एका निमिषांतच झाली होती.—मनाची !

महाराजांनी पन्हाळगडाची जबाबदारी त्र्यंबकपंतांच्या शिरावर दिली. ते त्यांना म्हणाले,[६]

" पंत, हा अजिंक्य पन्हाळा तुम्ही सांभाळा ! शत्रूच्या मोर्च्यांशीं कार्तिकेयाप्रमाणे लढा ! लढत राहा ! आता गडाची धुरा तुमच्या हातीं ! "

धैर्यशाली त्र्यंबक भास्करांनी ही जोखीम झेलली.[१३]

रात्रीं आपल्याबरोबर किती लोक घ्यायचे, हत्यारें अन् सामान काय घ्यायचें, केव्हा निघायचें, कसें निघायचें कोणत्या बाजूने जायचें, कुणीं कुणीं काय काय करायचें, कोणकोणती काळजी घ्यायची, जर आयत्या वेळीं कांही गडबड उडाली तर काय करायचें वगैरे गोष्टींचा बारकाईने खल करून महाराजांनी मनोमन सर्व तयारी पूर्ण केली.

गडावर सुमारें सहा हजार मावळे होते.[११] त्यांपैकी सहाशे गडी रात्रीं महाराजांच्यासंगें निघावयाचे होते. या सहाशेंत हिरडस मावळांतील, बाजीप्रभूंचे शूर मावळेहि जायचें ठरलें होतें.[१२]

—गडाखाली उद्याच्या आनंदाला आजच भरती आली होती !


सूर्य मावळला. रात्र झाली. आकाशांत पौर्णिमेचा पूर्णचंद्र होता. पण काळ्या ढगांआड त्याचा मागमूसहि लागत नव्हता. विजा चमकत होत्या.[१५] निमिषभर सारी सृष्टि लख्ख उजळून निघत होती. गडावर चाललेली मावळ्यांची लगबग, तटावरचे पहारे, दरवाजावरच्या भगव्या झेंड्याची फडफड झर्रकन् झळकून जाई. की लगेच पुन्हा अंधार ! पहिल्यापेक्षाहि दाट !

आता पाऊस झिमझिमूं लागला होता. वारा सुटला होता. लौकरच जोराचें वादळ सुटणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसत होतीं.[१५]

* * *

**आधारः**—(१) शिभा २६।४२. (२) शिभा २६।५०. (३) शिभा २६।४२ ते ५०. (४) पसासंले ८२६ (५) शिभा २६।५२ व ५३. (६) शिभा २६।५६ ते ६५. (७) पसासंले. ८३१. (८) शिचवृसं. २। पृ. ३५; पसासंले ८३१. (९) पसासंले ८३१. (१०) शिभा २६।४८ व ७२; शिभा २७।२. (११) पसासंले ८२२ व ८२६. (१२) जेधेशका. व करिणा. (१३) शिभा २६।६३ ते ६७, ७१ ते ७७; पसासंले ८३१. (१४) शिभा २७।२६ ते २८. (१५) शिभा ७१ व ७५; पसासंले ८३१. (१६) शिभा २६।७१ व ७७. (१७) शिभा २७।१० व ११.

# ११. गजापूरची खिंड



पन्हाळगडाखाली जौहरचे सैनिक इतक्या बेमालूमपणें गाफील झाले होते की, तें त्यांच्याहि ध्यानांत येत नव्हतें. ते आणि जौहरच्या हाताखालचे सरदारहि मोहीम फत्ते होऊन शिवाजी हातीं आल्याच्या स्वप्नांत रंगून गेले. जणू कोणीं तरी त्यांच्यावर मोहिनीमंत्रच टाकला होता.[१] आज साडेतीन महिने अहोरात्र पालीसारखे सावध राहून ते पाळत ठेवीत होते. धो धो पावसांतहि त्यांचीं पावलें आणि डोळे जागा सोडून गेले नव्हते. पण आज मात्र गंगाधरपंतांनी शरणागतीची मोहिनी टाकली. त्यांतच वारा सुसाट वाहूं लागला आणि पाऊसहि बरसूं लागला. विजांची लखलख आणि ढगांचा गडगडाट सुरू झाला.[२]

गडावर धावपळ, गडबड नव्हती. पण सर्वांचीं हृदयें मात्र धडधडत होतीं. गडाच्या नित्याच्या बंदोबस्तांत थोडीहि ढिलाई नव्हती. उलट अधिकच दक्षता होती. कारण गडाची जोखीम सर्वस्वीं मावळ्यांच्या शिरावर आली होती. महाराज अर्ध्या एक घटकेने गडावरून जाणार होते.

सर्व तयारी झाली होती. सहाशे हत्यारबंद मावळे अंधारांत भुतांसारखे गप्प, पण महाराजांची वाट पाहात बसले होते.[३] आंत महालांत महाराज निघण्याच्या तयारींत होते.

महाराजांनी अंतःकरणपूर्वक जगदंबेचें स्मरण केलें. जणू कांही तुळजाभवानीला ते म्हणत होते की, आईसाहेब, तुमच्या कौलावेगळे आम्ही कधींहि वागलों नाही. वागतहि नाही. तुमच्या मर्जीवाचून सर्व व्यर्थ

आहे. आशीर्वाद असो द्यावा ! आम्ही निघालों ! उदयोऽस्तु, उदयोऽस्तु !

महाराज निघण्याकरिता वळले. त्र्यंबकपंत चिंताव्यग्र मनाने उभे होते. महाराज त्यांना म्हणाले,[४]

" त्र्यंबकपंत, आम्ही निघालों ! गड सांभाळा ! "

सर्व वातावरण अतिशय गंभीर होतें. महाराज एक महादिव्य करण्यासाठी निघालेले पाहून पन्हाळगडाच्या तटाबुरुजांचे चिरेहि सद्गदित झाले होते. काळोखांतून मुक्या मनाने ते महाराजांना जणू म्हणत होते की, राजा, गडाची चिंता करूं नकोस. आम्ही फार पक्के आहोंत. जीव खालीवर होतो तुझ्याचसाठी !

महाराज गंभीरपणें पावलें टाकीत निघाले. त्यांच्या हृदयस्थानीं धैर्यलक्ष्मी उभी होती. त्यांच्या प्रत्येक श्वासांतून जणू कांही आदेश उमटत होता की, पन्हाळगडच्या निष्ठावंत तटबुरुजांनो, माझ्या प्राणप्रिय मावळ्यांनो, माझी चिंता करूं नका ! यश देणारी श्रीशक्ति आदिमाता आहे ! जिवावरचें धाडस आहे. जगदंबेचीच इच्छा दिसते की, हें स्वराज्य संकटांच्या निखाऱ्यांतून तावून सुलाखून निघावें. आपण एकदा पोत हातीं घेतला. आता खाली ठेवणें नाही ! आपआपलें कर्तव्य कसोशीने पार पाडण्याचा ध्यास धरा.

महाराज महालांतून बाहेर पडले. महाराजांबरोबर कोणी जोखमीचें वडीलधारें माणूस कोण जाणार होतें ? जोखमीचे तर सर्वच होते ! सहाशेजण ! पण वडीलधारे अन् हक्काने महाराजांना सांगणारे होते ना ! कोण ?—बाजीप्रभु देशपांडे ! अशा अवघड वख्ताला बाजीच हवेत. बाजींच्या बरोबर त्यांचे, म्हणजेच बांदल देशमुखांच्या निसवतीचे मावळेहि होते.[५]

महाराजांसाठी एक पालखी तयार केलेली होती. महाराज येतांच सहाशे मावळे उठले.

पन्हाळगडापासून विशाळगड उर्फ खेळणा वीस कोस लांब होतां. पायीं जाण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. महाराजांना पालखींतून पळवीत पळवीत न्यायचें असें ठरलें होतें.[६]

आणखीहि एक पालखी तयार होती. ही दुसरी पालखी कोणाकरिता?

—कोण जाणे!

महाराजांनी पालखींत पाऊल ठेवलें. प्रत्येकाचें काळीज धडधडत होतें. पन्हाळगड देवाला साकडें घालीत होता की, पार्वतीपरमेश्वरा, आमचा राजा निघाला; आता तुम्हींच त्याच्या बोटांना धरून त्याला घेऊन जा! सुखरूप पोहोचवा!

—डाव्या पापण्यांनो, लवलवूं नका! वळचणीच्या पालींनो, चुकचुकूं नका! अपशकुनी रातपाखरांनो, फडफडूं नका! आमचे महाराज निघाले आहेत!

मावळ्यांनी पालखी उचलली. बाजीप्रभु निघाले. मावळे निघाले. ती रिकामी दुसरी पालखीहि. पाऊस पडत होता. वारा अधिकाधिक फोफावत होता.[२] आभाळांतील काळे ढग एकमेकांना दरडावीत होते. विजांचे तडाखे एकमेकांना देत होते. आभाळांत भाऊबंदकी माजली होती. गडद काळोखाचें साम्राज्य होतें. पौर्णिमेच्या पूर्ण चंद्राच्या हातांत कांहीहि सत्ता नव्हती.

अगदी पुढे वाटाड्ये हेर चालले होते.[७] मागोमाग सर्वजण अंधार पोखरीत चालले होते. सांगाती दिवा नव्हता, दिवटी नव्हती, मशाल, हिलाल कांहीहि नव्हतें. पालखी खालीवर लवलव करीत होती. आणि सहाशे हृदयेंहि. रात्रीचा हा पहिला प्रहर चालू होता. (रात्रीं दहा वाजेपर्यंतची वेळ.)

गडाचा दरवाजा खुलला. पालखी बाहेर पडली. चैत्री पाडव्याला (दि २ मार्च १६६०) महाराज पन्हाळ्यावर आले होते; त्यानंतर

आज (दि. १२ जुलै १६६०) पुरेपूर साडेतीन महिन्यांनंतर ते गडांतून बाहेर पडत होते.

दरवाजा मागे पडला. हेरांच्या मागोमाग मंडळी चालली होती. किती गुपचूप, किती जपून, किती सावकाश अन् किती झपझप. अंधारामुळे दिसत कांहीच नव्हतें. पण हेर अचूक चालले होते. पाऊस व सोसाट्याचें वादळ चालूच होतें. विजांच्या चमचमाटामुळे सर्वांच्या काळजांत धस्स होई. भीति वाटे की, या लख्ख उजेडांत आपणास शत्रूने पाहिलें तर?—जीव खाली वर होत होता. पालख्यांना किती झोके-हेलकावे बसत असतील, पावसाच्या झडीखाली मावळे कसे चालले असतील, विजेच्या उजेडांत त्या चिंब भिजलेल्या मावळ्यांचीं अंगें कशीं चमकत असतील याची कल्पनाच केलेली बरी. महाराज श्रीचें स्मरण करीत होते, जगदंब–जगदंब !

सबंध डोंगरावरून पाणी खळाळत होतें. मोठमोठे धबधबे धो धो धो आवाज करीत खोल दऱ्यांत कोसळत होते. रातकिड्यांनी कर्कश सूर धरला होता. काजव्यांची चमचम चौफेर चालू होती. सारें वातावरण भयानक होतें. त्यांतच डोंगरभर पावसाच्या पाण्यावर वहरून गेलेल्या कळंब, कुंद आणि कुड्याच्या जाळी धुंद सुगंध उधळीत होत्या. केवडा घमघमत होता.[८]

गडाचा निम्मा डोंगर वादळाशीं झगडत झगडत संपला. आता छाताडें जास्त धडधडूं लागलीं. वेढा जवळजवळ येत चालला. हेर अचूक चालले होते. लखाखणाऱ्या विजांमुळे हेरांनी हेरून ठेवलेल्या वाटेवरच्या खुणा दिसत आणि कांहीसा फायदाच होई.[२]

पायथा जवळ येत चालला. वेढयाची हद्द जवळ येत चालली.—आली ! थोडें अंतर राहिलें. आता अगदी जिवाचा करार ! त्या मुसळधार पावसांतहि प्रत्येकाच्या अंगांतून, धास्ती–धसक्यामुळे घामाच्या धारा

वाहात असतील कदाचित् ! अत्यंत सावध होता प्रत्येकजण. काळजी ! काळजी ! काळजी ! त्या निधड्या छाताडांतील हृदयांच्या उखळांत दणदण कांडण चाललें होतें. वीज कडाडली की, काळजांत धस्स होत होतें. जणू मुसळाचा घाव उखळाच्या काठावरच आदळत होता.

वेढा आता अगदी नजीक आला. शंभर पावलें-चाळीस-पंचवीस ! पावसाचा आणि वादळाचा सोसाटा भयंकर होता. क्षितिजाच्या पलीकडून जमीन आणि आस्मानाच्या दोन्ही ओठांतून वायु एवढी जबरदस्त फुंकर सतत घालीत होता की, जणू पृथ्वीची गति रोधली गेली होती. हेरांनी शोधलेल्या मार्गावर अन् इतरत्रहि सामसूम दिसत होती.

—दहा पावलें गेलीं ! पांच गेलीं ! ऐन वेढाच लागला ! सृष्टीचें थैमान चाललेलें आणि मावळ्यांच्या खांद्यांवर स्वराज्याची जोखीम !— हो ! आठवलें, आठवलें !—युगायुगांनी अशीच एखादी रात्र उगवते. फार फार शतकांपूर्वी, कलियुगापूर्वी एका भयाण अंधारकोठडींत एक दिव्य बालक जन्माला आलें. जन्माला आल्याबरोबर त्याला ठार मारण्यासाठी राक्षसांनी त्या कोठडीला वेढा दिला होता. ती रात्र अशीच होती. असाच पाऊस अशाच विजा. असेंच काळीज धडधडत होतें. असाच असुरांचा वेढा भवती होता. वसुदेवाने बाळाला घेतलें आणि धडधडत्या काळजाने, भेदरलेल्या दृष्टीने, टकमका चौफेर पाहात, देवाचें नांव घेत—

बाजीप्रभूंनी आणि मावळ्यांनी वेढ्यांत पाऊल टाकलें ! चपळाईने, झप, झप, झप, मावळे पालखी घेऊन पळत होते. प्रत्येकाचा जीव मुठींत होता. शत्रूच्या ऐन ओठांत होते ते. पावसाचे आडवेतिडवे फटकारे बसत होते. विजा किंचाळत होत्या. हेरांनी निवडलेल्या त्या सांधी—सापटींत मुळांतच पहारे नव्हते.[२२] जे मोर्चे आणि चौक्या—पहारे

नेहमी किंचित् दूर असत तेहि या तुफान वादळामुळे जागा सोडून तंबूंत बसले होते. हाच तो गाफीलपणा. परंतु तेवढ्यांत जर एखाद्या हशमाने पाहिलें तर ? फाडकन् एखादी गोळी कोठून सणाणली तर ? कोणाचींच हृदयें जागेवर राहिलेलीं नव्हतीं. सर्व भरवसा जगदीश्वरावर टाकून एक एक पडतें पाऊल पदरांत घेत ते चालले होते. वेढ्याची हद्द संपत आली. थोडीशी उरली.

जौहरच्या हशमांना कल्पनाहि नव्हती. ते आपआपल्या डेऱ्यांत सुखी होते ! एवढ्या भयंकर पावसांत अन् वादळांत कोणता हशम पहारेकरी तंबूच्या बाहेर येईल ?—अन् तेंहि उद्याच रात्रीं शिवाजी जातीने जौहरसाहेबांच्या तंबूंत स्वतः होऊन हजर होणार हें नक्की ठरल्यानंतर ? आता जरूर काय पहाऱ्यांची नि मोर्च्यांची ?

जौहरचे हशम अवघ्या एका दिवसासाठी एवढे गाफील बनले ! महाराजांना घेऊन सहाशे लोकांची टोळी वेढ्यांतून निघून जात होती. शत्रूला फक्त निसर्गाचाच सडसडाट ऐकूं जात होता.[९] शिवाजी पळतोय, याची त्यांना कल्पनाहि नव्हती अन् चाहूलहि नव्हती.[९] महाराजांना निसर्गाने अनुकूल साथ दिली.[११]

वेढ्याची हद्द संपली ! ओलांडली. सर्वांच्या हृदयांतून आनंदाची झुळूक आरपार निघून गेली. पण भय संपलें नव्हतें. वेढा मागे पडत चालला. पालखी पुढे पळत होती. शत्रु मागे राहिला. चुटकीच्या अंतरावर, टाळीच्या अंतरावर, हाकेच्या, शिळेच्या, शिंगाच्या अंतरावर. आपण सुटलों, या आनंदाने मावळ्यांचीं मनें मोहरलीं.

आता विशाळगडाच्या रोखाने पावलें धावत होतीं. महाराज सिद्दी जौहरच्या मगरमिठींतून,—नव्हे मगरमुखांतून सहीसलामत निसटले होते. खरोखर आश्चर्य ! तुळजाभवानीनेच शत्रूला भूल घातली खास ![१०]

पालखी वेढ्यापासून झपाट्याने दूर चालली होती. आता डोंगराची मुरमाड जमीन संपून चिखल सुरू झाला.[१२] पचक् पचक् पावलें वाजूं लागलीं. अंधार मी म्हणत होता. पावसाने भिजत असलेलीं झाडांचीं पानें विजेने क्षणोक्षणीं चकाकत होतीं.

आणखी कांही अंतर तुटलें की, निर्धास्त अन् बिनबोभाटपणें विशाळगडाच्या पायथ्यापर्यंत तरी पोहोचायला हरकत नव्हती. कुठे उंच, तर कुठे खोल, कुठे गवत तर कुठे दगडधोंडे, कुठे शेवाळें तर कुठे चिखल, अशी ती अडचणींची वाट होती. कांही कांही ठिकाणीं तर जांघड जांघड चिखल होता.[२] महाराज पालखींत बसले होते, पण मन—— ?

आणखी बरेंच अंतर काटलें गेलें. पालखी पुढे पुढे धावत होती. त्या सहाशे काळ्याकुट्ट सावल्या भुतांप्रमाणे गुपचूप पळत होत्या. मधूनच एखादी डरकाळी उठे! काळजांत चर्रर्र होई. वाघांच्या डरकाळ्या होत्या त्या! पावसाने सतावलेले वाघ झाडींतून डरकाळ्या फोडीत होते.[१२] पानापानांवरून टपटपणारा पाऊस आणि रातकिड्यांचें एका सुरांतलें किर्रर्र संगीत अखंड चालू होतें. जौहरची छावणी आता खूप मागे पडली होती. इतक्या भयाण अंधारांत. मुसळधार पावसांत आणि खडतर आडरानांत कोणीहि माणूस फिरकणेंच अशक्य होतें. धोका संप—! शू: ऽऽ! झाडींत खुजबुजलें? वाघ? वाघाचे डोळे चमकले? कोण? कोण?


—कोणी नाही!

—नाही, नाही! तें पाहा, तें पाहा! कुणीतरी आहे तेथे! कोण? कुणास ठाऊक, पण माणूसच! नक्की कुठे? कितीजण? नाही माहीत! भयाण काळोखांत इतिहासालाहि नाही माहात. परंतु हेरच ते जौहरचे![१३] महाराजांना घेऊन पळतांना सहाशेच्या टोळीला त्या हेरांनी पाहिलें![१३]

झुडपें थरारलीं. खूप जोरांत आस्मान कडाडलें. महाराजांच्या आणि मावळ्यांच्या काळजांत वीज सळसळून गेली. सगळेच दचकले. आपल्याला कोणींतरी पाहिलें? पण कोठून आणि कितीजणांनी? आता त्या भयंकर रानांत, भीषण अंधारांत कसें समजायचें? कसें ओळखायचें? कसें शोधायचें? जौहरच्या छावणींतीलच ते हेर होते. एकटा नव्हे; दोघेजण किंवा दोघांपेक्षा जास्तच![१३] इतिहासाला एवढेंच फक्त माहीत आहे. आता त्या अंधारांत हेरांना शोधण्याचा प्रयत्न करणेंहि अशक्य आणि धोक्याचें होतें. कुठे सापडायचे ते? आणि तेवढ्यांत त्यांच्यापैकी एखादा जरी निसटून जौहरच्या छावणीकडे पळाला तरीहि शत्रु पाठलागावर येणारच! म्हणून वेळ धोक्यांत व्यर्थ घालवण्यापेक्षा जोरांत पळणें हाच केवळ उपाय होता! आता दुसरा उपायच नव्हता! नाही तर शत्रु येऊन आडरानांत शिकार गाठणार हें नक्की होतें!


एकच क्षण गेला आणि मावळे थांबले. भराभरा ती रिकामी पालखी पुढे आली. मावळ्यांच्या टोळींत एकजण अगदी महाराजांप्रमाणे पोशाख केलेला होता. गडावरून निघतांनाच हा सर्व साज–शिणगार त्याने केलेला होता. या गड्याला दाढीहि होती. त्यामुळे तो महाराजांसारखाच दिसत होता. आता विचार करायला वेळ नव्हता. जो विचार करायचा तो पूर्वीच केलेला होता. तो मावळा गडी झटकन् त्या रिकाम्या पालखींत बसला! त्याच्या पालखीसांगातीं पंधरा वीस मावळे राहिले. नव्या 'महाराजांची' नवी पालखी सरळ नेहमीच्या मार्गाने चालूं लागली आणि खुद्द शिवाजीमहाराजांची पालखी मावळ्यांच्या मोठ्या टोळीसह एकदम आडरानांत घुसली![१४] बाजीप्रभु अर्थात् महाराजांच्या पालखी-बरोबर होते. नेहमीची वाट सोडून त्यांनी मुद्दामच वेगळी आडवाट धरली.[१४] शत्रूचा पाठलाग होईल तो घोड्यावरून होईल; म्हणून शक्य

किल्ले विशाळगड




हा भग्न तट असे गडागडाचा आजी
हा भग्न आज जयदुर्ग आंसवामाजी ।


विशाळगड–प्रवेशद्वार



करीत पावन अर्पुनि पंचप्राणांचा पिंड
हिरडस मावळचा श्रीबाजी ती पावनखिंड ॥



कोण गडाचा उभा बुरुज हा बांका बरकंदाज ?—



किल्ले चाकण

तेवढें अंतर काटण्याकरिता व शत्रूचा वेळ फुकट वाया घालविण्याकरिता ही युक्ति ![१४]

महाराजांची पालखी आडवाटेने विशाळगडच्या रोखावर निघाली, तरीहि काळजी संपलेली नव्हती. पाठलाग होणार हें नक्कीच होतें. शत्रूला हुलकावणी दिल्यामुळे, फक्त आणखी कांही तास शत्रु महाराजांना गाठूं शकणार नव्हता. तेवढ्या वेळेंतच अतिशय जोराने जाऊन अंतर काटायचा प्रयत्न मावळे आणि बाजी करूं लागले. जिवापाड प्रयत्न !

आणि खरोखर भयंकर घाईघाईने मावळ्यांनी पळावयास सुरुवात केली. मावळ्यांच्या आणि बाजींच्या जिवाची उलघाल सुरू झाली. महाराजांना भविष्य दिसूं लागलें. पालखी हिन्काळत होती. गोंडे हिंदोळत होते. नव्हे, महाराजांचें काळीजच–! पण महाराज मावळ्यांच्या आणि बाजींच्या ताब्यांत होते. पालखींतून पायीं उतरून चालण्याने महाराजांना त्रास फार फार झाला असता. पळण्याच्या वेगांत कसूर तर, पालखी खांद्यावर घेऊनहि होत नव्हती. महाराजांना घेऊन पळत राहायचें, एवढेंच मावळ्यांना आणि बाजींना समजत होतें. बस्स् !

शत्रूचे हेर तर केव्हाच अंधारांतून सळसळत छावणीकडे धावत गेले होते. जौहरला बातमी देण्यासाठी की, दुष्मन् शिवाजी भाग गया ! दौडो !

भयंकर प्रसंग हा ! आता वेढयांतली गनिमी फौज येणार ! पाठलाग होणार ! बाजींच्या काळजांत चिंतेची चिता पेटली. महाराजांना पालखींतून उतरूं न देतां बाजींची आणि मावळ्यांची पराकाष्ठा चालली होती, जास्तींत जास्त जोरांत धावण्याची. खाली उतरून पायीं पळण्याकरिता बाजींना किंवा मावळ्यांना महाराजांनी काय काय म्हटलें असेल तें केवळ त्यांचें त्यांनाच माहीत. इतिहासाला माहीत नाही.

अजून किती तरी दूर दूर दूर विशाळगड होता. काय होणार आता ?–तें श्रीभवानीच फक्त जाणत होती.

आणि खरोखर मावळ्यांनी कांही कांही उसनें ठेवलें नव्हतें. खाली दोन दोन वीत चिखलाची रबडी भरली होती.[१२] पायांत काटा मोडतोय का घोट्यांत पाय मुरगाळतोय याचा विचारहि ते करीत नव्हते. महाराजांना आपल्या माणसांचे ते कष्ट पाहावत नव्हते. पण ते त्यांच्या निष्ठेचे अन् प्रेमाचे सख्त कैदी होते.

सिद्दी जौहरचे हर शिवाजी पळाल्याची भयंकर वातमी घेऊन छावणींत येऊन धडकले ![१३] सगळ्या छावणींत ही बातमी पसरली.[१४] गडबड उडून गेली. शिवाजी पळाला ! शिवाजी पळाला ? असा कसा पळाला ? कोण जाणे ! पण पळाला ! अजून पळतोय ! विशाळगडाच्या रोखाने ! पालखींत बसून पळतोय !

ही बातमी सिद्दी जौहरच्या कानावर आदळली ! वज्राघातच होता तो त्याच्यावर ! त्याचे कान, डोळे, मन एकदम सुन्नच झाले ! आपण हें काय ऐकतों आहोंत हेंच त्याला समजेना ! तो डोळे ताणून पिसाटा-सारखा स्तब्धच होऊन पाहूं लागला. जणू महाभयंकर जलप्रलयांतील भोवऱ्यांत सापडून तो गरगरा गरगरा फिरत होता ![१५] असें वाटलें की, आता हा एकदम वेडा होणार. शिवाजी–शिवाजी पळाला ? पळाला ? कसा ? कसा ? कसा ? साडेचार महिने हज्जारो हशमांच्या फौजेसह, तोफखान्यासह, मोठमोठ्या सरदारांसह बळकट वेढा घालूनहि अखेर तो पळाला ? सिद्दी जौहर भयंकर उद्विग्न होऊन, पश्चात्तापाने म्हणाला,[१६]

" या अल्लाह यह क्या हुवा ? इस परनाले किलेपर जेर किया हुवा दुश्मन हमको धोका देकर भाग गया ! ये कैसे हुआ ? अब हज़रत शाह आदिलशाह की खिदमत में मैं कैसे पेश होऊं ? इस्लाम का भारी दुश्मन मेरे पंजेसे छुट गया ! यह सुनकर शाइस्तेखाँ और सारे सरदार मुझे क्या कहेंगे ? मेरे शिकंजेसे एक बेशकीमती ज़ेवर गायब हो जानेसे मुझे कितनी ख़स्तगी हो रही है यह कैसे बताऊं ? "

जौहर कमालीचा उद्विग्न झाला.[१४] आता काय करूं अन् काय नको, हें त्याला समजेना. सर्व सरदारहि दिङ्मूढ झाले. बाहेर पाऊस पडत होता. छे: !—जौहरच्या साडेतीन महिन्यांच्या अविश्रांत प्रामाणिक कष्टावर पाणी पडत होतें तें. जौहरच्या पुढे सिद्दी मसूद उभा होता. जौहरने एकदम त्याच्याकडे बोट करून म्हटलें,[१७]

" दिलेर मसाऊद, तुम फौरन शिवाजी का पीछा करो। मेरे हाथोंसे एक बेनज़ीर नगीना निकल गया। हमारी आँखों में धूल झोंककर शिवाजी भाग गया। मसाऊद तुम ही उसका पीछा करो ! जाओ ! "

सिद्दी जौहरचा हुकूम होता क्षणींच मसूद घाईने निघाला.[१७] छावणींत फौजेची एकच धांदल धावपळ उडाली. दोन हजार घोडेस्वार आणि एक हजार पायदळ मसूदच्या हुकमाखाली तयार झालें.[१४] स्वारांची फौज बिनीवर घेऊन मसूद दौडत सुटला. विशाळगडाकडे !

हा सिद्दी मसूद अतिशय शूर व जौहरचा निष्ठावंत सरदार होता. तो मुळीं जौहरचा जावईच होता. मुलीचा नवरा.

मसूदची फौज निघाली. खूप जोरांत निघाली. पण तो पाऊस, तो अंधार, ती भयंकर खराब वाट, शेवाळें, निसरडें, चिखल वगैरे अडथळे अटळ होते. त्याचे हशम शेवाळ्यांत रपारप पडत होते. कांही ठिकाणीं तर त्यांच्या घोड्याचे पाय गुडघ्यागुडघ्या इतक्या चिखलांत रुतत होते.[१८] सर्वांत अडथळा अंधाराचा होता.

धडपडत धडपडत मसूद विशाळगडच्या रस्त्याने चालला होता. किती तरी वेळ तो आणि त्याचें सैन्य रस्ता तुडवीत होतें. पण शिवाजीची कांहीच चाहूल लागेना ! पळत होते. पडत होते. अंगभर चिखल माखला जात होता. तरीहि पळत होते. शिवाजी हवा होता ! विजांच्या चमचमाटांत फक्त झाडी, गवत, चिखल आणि धोंडेच दिसत होते.

बराच बराच रस्ता तुडविल्यानंतर विजेच्या प्रकाशांत मसूदला एकदम पंधरा-वीस माणसें आणि एक पालखी पळतांना दिसली! एकदम आनंदाची उकळी आणि आरोळी फुटली! शिवाजी! शिवाजी! पकडो! पकडो! ठायरो ऽ! ठायरो ऽ!

मसूद आणि मसूदचे स्वार चिखल उडवीत ताड ताड दौडत निघाले. पंधरा-वीस मावळे पालखी पळवीत होते. एक क्षणांत पालखीला स्वारांचा गराडा पडला![१४] पालखी थांबली. पालखींत कोण आहे, असें मसूदने दरडावून विचारलें. मावळ्यांनी सांगितलें की, पालखींत शिवाजीमहाराज आहेत!

शिवाजी?—म्हणजे सापडलाच! मसूदचा आनंद सैन्यांत मावेना! फसवून पळून चाललेला तो लबाड अखेर सापडलाच! मसूदने पाहिलें. अंधारांत शिवाजीमहाराज पालखीचा गोंडा धरून बसले होते! आता नशिबांत काय जें लिहिलेलें असेल तें भोगायला महाराज तयार होऊन बसले होते. मसूदला विजयाचा आनंद होत होता. फत्ते! शिवाजी जिंकला म्हणजे सर्वच जिंकलें! पन्हाळगड जिंकला! प्रतापगड जिंकला! सारी मराठी दौलतच जिंकली! नव्या आनंदाच्या, नव्य कल्पनांच्या, अमाप उत्साहाच्या विजा विजापुरी सैन्यांत चमकत होत्या. मसूदने पालखीच्या भवताली सशस्त्र हशमांचा पहारा घालून पालखीसह महाराजांना कैद केलें. मावळेहि पकडले. आणि पालखी पन्हाळगडाखाली छावणींत घेऊन जाण्याकरिता आपल्या फौजेचें तोंड त्याने माघारी वळविलें![१४]

आता अगदी आनंदाने चिखल तुडवीत मसूदची विजापुरी फौज परत माघारी निघाली.

——आणि पालखीसह छावणींत आली. महाराज पळून गेल्यामुळे छावणी अगदी उदास झाली होती. जौहर पश्चात्तापानें जळत होता.

एवढयांत ओरडत गर्जत विजापुरी फौज माघारी आली. छावणींत बातमी पसरली, शिवाजी सापडला ! कैद झाला ! जौहरलाहि समजलें. जौहरला केवढा आनंद झाला ! हरपलेलें यश सिद्दी मसूदने खेचून आणलें ! जौहरला जावयाबद्दल केवढी धन्यता आणि अभिमान वाटला असेल तें तोच जाणे !

चिखलाने माखलेले विजयी वीर आले. त्यांचे चेहरे मात्र कमळासारखे फुललेले होते. पालखी आली. जौहरने आणि इतर सरदारांनी पाहिली. पालखी थांबली. महाराज पालखींतून उतरले. मंडळी निरखून पाहूं लागली. आणि त्यांच्या चेहऱ्यांवरचा आनंद घरंगळूं लागला ! शंका आाणि संशय उमटले. बळावले. अन् मंडळींची खात्रीच झाली की, हा शिवाजी नव्हे ! दुसराच कोणीतरी असला पाहिजे ! पूर्वी कांहीजणांनी शिवाजीला प्रत्यक्ष पाहिलेलें होतें ! घात झाला ! त्यांनी 'महाराजांची' चौकशी केली. आणि त्यांना समजलें की, हे प्रत्यक्ष शिवाजीमहाराज नसून 'शिवाजी' नांव असलेले एक न्हावी आहेत ![१४]

भयंकरच घोटाळा झाला ! एकदम वातावरण पालटलें. सोसाट्याच्या वाऱ्यांत आनंद पार उडून गेला. फजिती ! निव्वळ फजिती ! जौहर भयंकर वैतागला. छावणींत पुन्हा धावाधाव सुरू झाली. चिडून हुकूम सुटले. मसूदला तर मेल्याहून मेल्यासारखें झालें. त्याने पुन्हा तडकाफडकी फौज बाहेर काढली. पुन्हा पाठलाग !

—एवढया वेळांत महाराज खूप खूप दूर गेले होते. मध्यरात्र उलटून गेली होती.

मसूद आता अगदी चिडून संतापून निघाला. दोन हजार घोडदळ दौडत निघालें. मागोमाग एक हजार पायदळ निघालें.[१४] पुन्हा तीच वाट. तोच चिखल. तेंच शेवाळें. अंधार आणि अडथळे.

महाराजांची पालखी घेऊन मावळे झपाट्याने चाललेच होते.

तासामागून तास चालले होते. मावळे शिकस्तीने पालखी पळवीत होते. सिद्दी मसूदहि शिकस्तीने पाठलाग करीत होता. मागचा शत्रु यायच्या आंत विशाळगडाखालच्या शत्रूला जिंकून गडावर महाराजांना जायचें होतें! हें शक्य होतें काय? अशक्य! कारण अजून जवळ जवळ दहा कोस लांब विशाळगडचा पायथा होता! विशाळगडाच्या पायथ्याशीं जसवंतराव व सूर्यराव मोर्चे लावून बसलेच होते.

पहाट झाली! चिंता वाढत होती, मागच्या आणि पुढच्या दोन्ही शत्रूंची. किती भयंकर यातनांतून स्वराज्य आणि महाराज चालले होते!

उजाडलें! आषाढ वद्य प्रतिपदा उगवली (दि. १३ जुलै १६६०). एक प्रहर दिवस वर चढला.

—आणि आली! सिद्दी मसूदच्या घोडेस्वारांची आरोळी आली! महाराजांच्या आणि सर्वांच्याच हृदयांत चर्र झालें. अजून पांच कोस जायचें होतें अन् तेथेहि वेढा फोडून विशाळगडावर चढायचें होतें. आता?—

—सिद्दी मसूद दौडत येत होता. चिखलाने भरलेलें तें त्यांचें लष्कर मागोमाग दौडत होतें.

—मावळ्यांची, बाजींची आणि महाराजांची उलघाल उडाली. मोठ्या मेटाकुटीने त्यांनी गजापूरची घोडखिंड गाठली.

—आणि आलाच मसूद! त्याचें घोडदळ आक्रंदत येतांना स्पष्ट दिसूं लागलें. विशाळगड अजून चार कोस दूर होता. आता शत्रु हमखास गाठणार; तो संख्येनेहि खूप आहे; पुढे सूर्यराव सुर्व्याशीं आणि मागून मसूदशीं एकदम लढणें अशक्य आहे; आपली फौज रात्रभर चालून दमली आहे; दोघां शत्रूंच्या कात्रींत ती साफ कापली जाईल, हें महाराजांना आणिं बाजींनाहि स्पष्ट दिसलें. आता विचार करायलाहि

वेळ नव्हता. असें संकट कधीहि आलें नव्हतें. असें कधी येऊंहि नये. आता काय करायचें ?

—बाजींनी सारें कांही ओळखलें. महाराजांच्या जिवाची तडफड त्यांना दिसत होती. महाराजांनी एक क्षणभरहि थांबणें घातक होतें. समोरून खिंडीच्या रोखाने शत्रू चवताळून येत होता. खिंड उंच होती. वाट अरुंद होती. घशासारखी अरुंद वाट. घटसर्पाने स्वराज्याचा प्राण या खिंडींत गाठला होता. घसा आवळत आवळत बंद होण्याची वेळ येऊन ठेपलेली पाहून महाराजांना बाजी कळवळून विनवूं लागले की, तुम्ही इथे थांबूं नका ! गनीम अफाट आहे. आपण थोडे आहोंत. गनीम दावा साधील. तुम्ही थेट गडाकडे धावा. मी इथे खिंड रोखून धरतों. एकालाहि खिंड चढूं देत नाही. तुम्ही जा ! जा ![१९]

केवढें धाडस ! महाराज पुढे गेले तरी सुखासुखी गडावर पोहोचूं शकत नव्हते. कारण जसवंतराव व सूर्यराव विशाळगडाच्या पायथ्याशीं फौजेनिशी मोर्चे बांधून राहिलेले होते. बाजी म्हणत होते की, तुम्ही गडावर पोहोचेपर्यंत शत्रूला अडवून धरतो ! म्हणजे अजून कांही तास !

काय माणसें हीं ! हीं माणसें महाराष्ट्राचा संसार थाटण्यासाठी जन्माला आलीं. स्वतःच्या जिवाची यांना पर्वाच काय ! यांच्या एका हातावर तुळशीपत्रें उमलत होतीं अन् दुसऱ्या हातांत निखारा फुलत होता आणि महाराजांना तीं आपल्या निःशब्द प्रेमाने विचारीत होतीं, ' महाराज ! सांगा, यातलें संसारावर, घरादारावर काय ठेवूं ? '

धन्य धन्य महाराष्ट्र ! धन्य महाराष्ट्राची जातकुळी !

—शत्रू खिंडीच्या पायथ्याशीं येऊन ठेपला. घाई गर्दींत बाजींनी महाराजांना निर्वाणीने म्हटलें,[१९]

" महाराज, तुम्ही जाणे ! या खिंडीमध्ये मी निमे मावळे घेऊन दोन प्रहरपावेतो तुमच्या पाठीवर फौज येऊं देत नाही. साहेबी निमे

लोक घेऊन निघोन जाणें ! गडावर जातांच तोफांचे आवाज करणें ! तोंपावेतो गनिमाची फौज येऊं देत नाही ! आम्ही साहेबकामावरी मरतों ! ”

जा, जा ! आमची चिंताच करूं नका महाराज ! आम्ही येथे सुखी आहोंत, असें म्हणून त्यांनी महाराजांना वळें बळें विशाळगडाच्या वाटेला लावलें. निम्मे मावळे महाराजांबरोबर दिले आणि निम्मे आपल्या सांगातीं ठेवले. बाजींच्या सांगातीं राहिलेले मावळे हिरडस मावळांतील होते.[५]

बाजींनी महाराजांना अखेरचा मुजरा केला. हर हर महादेव !

तीनशे मावळ्यांसह बाजी खिंडीच्या तोंडावर येऊन उभे राहिले. ते आवेशाने सिद्दी मसूदच्या फौजेला जणू आव्हानच देत होते की, या या, लेकांनो ! आमचा राजा हवाय नाही का तुम्हांला ? या इकडे !

शत्रूची पहिली भयंकर लाट खिंडीवर थडकली. बाजींची वानरसेना खवळली होती. खिंड चढून येऊं पाहाणाऱ्या आघाडीच्या हशमांचीं डोकीं नारळासारखीं खडाखड फुटूं लागलीं ! उसाच्या कांड्यासारखीं हातापायांचीं हाडें मोडून पडूं लागलीं. धोंड्यांचा मारा करणें हा तर मावळ्यांचा नेहमीचा आवडता खेळ. शत्रूचा एका मागोमाग एकेक हशम गड गड गड गड कोलमडत खिंडीच्या पायथ्याशीं आपोआप पोहोचूं लागला.

—महाराज विशाळगडाकडे दौडत होते. गडाचा पायथा अजून चार कोस दूर होता. म्हणजे पायथ्याशी पोहोचायलाच कमींत कमी दीड–दोन तास हवे होते.

तिकडे पन्हाळगडाच्या पायथ्याशीं सिद्दी जौहर आणि फाजलखान यांनी गडाचा वेढा पुन्हा सख्त केला होता. जौहर स्वतः वेढयांतच थांबला होता. बहुधा त्याला असें वाटलें असावें की, कदाचित् खरा

शिवाजी अजून गडावरच असेल! जर वेढा ढिला पडला तर खरा शिवाजी पळून जाईल!

—बाजी आणि त्यांचे मावळे कमालीच्या शौर्याने खिंडींत लढत होते.[२०] दिवस माथ्यावर चढत होता. सूर्य पुढे पुढे चालला होता. पण ढगाआडून!

—महाराज विशाळगडाकडे धावत होते. पायथा अगदी जवळ आला होता. थोडेंच अंतर उरलें होतें. गडावरती भगवाझेंडा उंच उंच फडफडत होता.

गडाच्या तळाशीं शत्रूचे, म्हणजे शत्रु बनलेल्या आपल्याच मराठ्यांचे मोर्चे लागलेले होते. काय व्हायचें असेल तें होईल, अशा निर्धाराने महाराज तीनशे मावळ्यांनिशी झाडींतून झर झर झर चालले होते.

तिकडे खिंडींत शर्थीची झुंज चालूच होती.

—विशाळगडाखालचे सूर्यरावाचे व जसवंतरावाचे मोर्चे सावध झाले. दोघांहि सरदारांना समजलें की, मावळ्यांचा जमाव घेऊन खासा शिवाजीराजा गडाकडे येतोय! उठलेच लगेच ते चंद्र-सूर्य, महाराजांना अडवायला, मारायला, पकडायला! स्वराज्याचें हें कमनशीब! हीं आमचींच माणसें! काय, बोलावें तरी काय यांच्या बाबतींत? वास्तविक या सूर्यरावाने गजापूरच्या खिंडीकडे धाव घेऊन बाजीप्रभूंना म्हणावयास हवें होतें की, बाजी, तुम्ही रात्रभर थकलेले आहांत. मी उभा राहातों खिंडींत! तुम्ही मागे व्हा!

—आणि मग मसूदवर यश मिळवून अन् बाजींना सुखरूप घेऊन सूर्यरावाने महाराजांच्या मुजऱ्यास अभिमानाने जावयास हवें होतें. पण हें केवळ स्वप्नच, स्वप्नच! अंधाराची सेवा करण्यांतच भूषण मानणारे सूर्य हे! ते चालून निघाले महाराजांवरच![२१]

सूर्यराव सुर्व्याचा हल्ला आला. महाराजांची भवानी म्यानांतून बाहेर

पडली. मावळे न डरतां न हटतां उसळून शत्रूवर निघाले. शर्थ करून गडावर पोहोचायचेंच असा त्यांचा निर्धार होता. लढाई जुंपली.[३१]

—तिकडे खिंडीवर हल्ल्यावर हल्ले चढविण्याचा मसूदने सपाटा लावला. खिंडींत बाजी अडसरासारखे उभे राहून लढत होते. भयंकर रणकंदन चाललें होतें. मसूदची नवी ताज्या दमाची कुमक रीघ लावून वर चढत होती. बाजी आणि त्यांचे मावळे लालीलाल झाले होते. रात्रभर दमूनहि ही झुंज त्यांनी नेटाने चालू ठेवली होती. जखमांनी लालबुंद झालेल्या बाजींच्या तलवारी फिरतच होत्या. जणू आगीचा तांबडा लाल उभा लोळच ठिणग्या उधळीत नाचत होता. बाजींच्यांत एवढी ताकद आली तरी कोठून?

—महाराजांना पाऊल पाऊल झुंजून पुढे सरकावें लागत होतें. त्यांना ओढ लागली होती गड गाठायची. सूर्यराव जीव खाऊन त्यांना प्रतिरोध करीत होता. महाराज जणू पुराच्या उलट्या धारेंत पोहून उगम गाठायची धडपड करीत होते. शत्रूच्या प्रतिकारलाटा त्यांच्यावर थडाथड आपटत होत्या.

दुपारचे दोन वाजले! सूर्य मावळतीकडे ढळला.

सूर्यरावाचा प्रतिकार महाराजांपुढे फिका पडूं लागला.[३१] तो व जसवंतराव आपल्या मोठ्या फौजेसह हल्ले चढवीत होते. पण तरीहि महाराज पुढे पुढेच घुसत होते.

—दुपारचे चार वाजले! खिंड चढून जाण्यासाठी मसूद पराकाष्ठा करीत होता. त्याला अजूनहि मुळीच यश येत नव्हतें.

—विशाळगड चढून जाण्याकरिता महाराजहि पराकाष्ठा करीत होते. अन् अखेर सुर्व्यांची कोंडी फुटली! महाराजांनी व मावळ्यांनी गडावर धाव घेतली.[३१]

आता खरोखर बाजींची शर्थ झाली होती. ते अजूनहि खिंड अडवून

उभेच होते. त्यांना खूपच जखमा झाल्या होत्या. रक्त गळत होतें. अनेक मावळे मरून पडले होते. शक्ति आटत आटत चालली होती. तरीहि झुंजत होते. कारण गडावरून अजूनहि तोफा ऐकू आल्या नव्हत्या ना!

—अखेर महाराज गडावर पोहोचले! लढून, चढून दमलेले महाराज गडांत शिरले. पन्हाळगडावरून काल रात्रीं निघाल्यापासून बरोबर सात प्रहरांनी, म्हणजे एकवीस तासांनी (दि. १३ जुलै १६६०. सायंकाळीं सुमारें सहा वाजतां) ते विशाळगडावर दाखल झाले.[२३] महाराजांना ओढ होती बाजींच्या भेटीची.

बाजींना ओढ होती तोफांच्या आवाजांची. कालपासून सतत

*तोफेआधीं मरे न बाजी सांगा मृत्यूला......*



एकवीस तास चालण्याचे व लढण्याचे श्रम करून शरीर विलक्षण थकलें होतें. जखमांनी देह पिंजून गेला होता. शरीर आता निकराने उभें होतें. तरीहि झुंजत होतें. अजूनहि तोफांचा आवाज उमटत नव्हता. खिंड रक्ताने भिजून गेली होती.

एवढयांत—धडाड धडडडड !—आवाज कडाडला ! पहिली तोफ उडाली ! धडडडड ! दुसरी—तिसरी....तोफा उडूं लागल्या. विशाळगडावरून महाराजांनी सरवत्ती सुरू केली.[१९] नव्हे नव्हे, महाराजच तोफेच्या तोंडाने ओरडून ओरडून हाका मारीत होते, बाजी, बाजी, लौकर या ! मी गडावर पोहोचलों ! तुमची मी वाट पाहातोंय ! लौकर या !'

तोफांचा धडाका बाजींनी आणि मावळ्यांनी ऐकला ! अन् केवढ तो आनंद ! महाराज पोहोचले ! महाराज पोहोचले ! बाजी आनंदले.

एवढयांत—घात झाला ! बाजींचा आर्त स्वर उमटला ! शत्रूकडील कोणाचासा अकस्मात् एक घाव सपकन् बाजींवर पडला ![१९] घळ्ळ्कन् रक्ताचा लोंढा फुटला !

स्वातंत्र्याच्या सूर्या, प्रसन्न हो ! आता तरी प्रसन्न हो !
बाजींची मूर्ति कोसळली !
गजापूरची खिंड पावन झाली !
पावनखिंड !


दाट वृक्षराजीखाली, लवलवत्या तृणांकुरांच्या संगतींत, निर्जन एकांतांत, सह्याद्रीच्या कुशींत, समाधीच्या पावित्र्याने आणि सतीच्या गांभीर्याने उभी असलेली ती पाहा ती गजापूरची खिंड. पावनखिंड. पन्हाळगडापासून सतरा कोसांवर. उंच आहे. अवघड आहे. हिचा मार्ग खाचाखळग्यांनी आणि काट्याकुट्यांनी सजला आहे. एका भयंकर घटसर्पाच्या तडाख्यांतून, हिरडस मावळांतल्या गरीब शेतकरी मावळ्यांनी

स्वराज्याचे प्राण वांचविले, ते याच खिंडींत. बाजी प्रभूंच्या आणि त्या मावळ्यांच्या रक्ताचे अन् घामाचे थेंब टपटपले ते याच खिंडींत. पावन खिंडींतल्या मातीला सुगंध आहे बाजींच्या त्यागाचा. जर तेथील मूठभर माती पाण्यांत टाकली तर पाण्याला रंग चढेल बाजींच्या रक्ताचा. जर तेथील जमिनीला कान लावला तर आवाज येईल, बाजींच्या तोंडून कडाडलेल्या महाराष्ट्राच्या महामंत्राचा! — हर हर महादेव! हर हर महादेव!

* * *

24862 चरित्र
क्रमांक 886 नों. दि. 12-2-58

**आधारः**—(१) शिभा २६।४८, ७२; शिभा २७।२, १२. (२) शिभा २६।६९ ते ७१; पसासंले. ८३१. (३) शिभा २६।६७. (४) शिभा २६।५६ ते ६५. (५) जेधे करीणा. (६) शिभा २६।६७; पसासंले. ८३१. (७) शिभा २६।७१ व ७७. (८) शिभा २६।६९ व ७०. (९) शिभा २६।६७ ते ७७; पसासंले. ८३१. (१०) शिभा २६।४८ व ७२. (११) शिभा २६।७० या श्लोकांत, 'अनुकूल वारा' म्हणजे वादळी सोसाट्याचा वारा हेंच अभिप्रेत आहे. श्लोकांत 'मंथरः' असें विशेषण आहे. पण 'मंद' वारा कोणत्या दृष्टीने महाराजांस अनुकूल ठरेल? याप्रसंगीं सोसाटयाचें वादळ व पाऊस चालू असल्याचें, पसासंले. ८३१ मध्येंहि स्पष्ट म्हटलें आहे. (१२) शिभा २६।७३ ते ७७. (१३) शिभा २७।१४. (१४) पसासंले. ८३१. (१५) शिभा २७।१५. (१६) शिभा २७।१६ ते २०. (१७) शिभा २७।२० ते २३. (१८) शिभा २७।२४. (१९) एकलमी ३९. (२०) जेधेशका. व करीणा. (२१) शिभा २७।२६ ते २८. (२२) शिभा २६।७७. (२३) शिभा २७।१३. शिवाय शिचवृसं. खंड २ व ३ पाहा.



# १२. विशाळगड

बाजीप्रभु पडले. उरलेल्या मावळ्यांनी माघार घेतली. महाराज गडावर पोहोचले होते. ज्याकरिता एवढा अट्टाहास मांडला होता, तें काज फत्ते झालेलें समजल्यावर खिंडींत थांबण्याची गरज नव्हती. मावळ्यांनी सांभाळून सांभाळून माघार घेतली आणि ते जंगलांत, पहाडांत पसार झाले.

खिंडींतील बांध नाहींसा होतांच एकदम मसूदच्या फौजेचा लोंढा खिंडींत घुसला. जवळ जवळ दोन प्रहर, म्हणजे सहा तास मसूदचें सैन्य खिंडीशीं झुंजत होतें. तीन हजार शत्रूंशीं बाजीप्रभु फक्त तीनशे मावळ्यांनिशी सहा तास झुंजले.[१] अनेक मावळे ठार झाले. शेवटची आहुति पडली बाजींची. सिद्दी मसूद तडक विशाळगडाकडे दौडत निघाला. त्याचें सैन्य व तोहि फार श्रमले होते. त्या 'न्हाव्याने' फजिती केल्यामुळे मसूद खजील होऊन इरेला पेटला होता.

अखेर मसूद विशाळगडाच्या पायथ्याशीं येऊन पोहोचला. तो येतांच सूर्यराव सुर्वे व जसवंतराव त्याला सामील झाले. शिवाजी गडावर पोहोचला, हें समजतांच मसूदला फार खेद झाला. आता ही शिकार गवसणें अत्यंत कठीण आहे, हें त्याला स्पष्ट दिसलें. कारण शिवाजी एका ताज्या दमाच्या किल्ल्यांत घुसला. आता पुन्हा पहिल्या-पासून, विशाळगडाला वेढा घालण्यापासून तयारी करावी तेव्हा कदाचित् शिवाजी शरण यायचा ! छेः ! तीहि आशाच नको. वेढा घालायच्या आधीच एखाद्या चोरवाटेने तो दुसऱ्या किल्ल्यावर पसार होणार अन् मग ही शिवाशिवी कधीच संपायची नाही ! मसूद हताश झाला. आणि

चिडलाहि. चिडून त्याने सूर्यराव–जसवंतराव यांच्यासह विशाळगडास पुन्हा वेढा घालण्यासच सुरवात केली.[२] पुन्हा एकवार तोच प्रयत्न!

गनीम गडाला पुन्हा वेढा घालतो आहे हें महाराजांनी पाहिलें. वेढा पडायच्या आंतच तो उडविला पाहिजे असें ठरवून महाराजांनी गडावरून आपले शूर मावळी पायदळ मसूदवर सोडलें.[२]

गडावरचे ताज्या दमाचे मावळे आले आणि दमलेल्या मसूदला आणि सूर्यरावाला त्यांनी सळो की पळो करून सोडलें. त्यांच्या तिखट हल्ल्यापुढे विजापुरी फौज तगेना. असंख्य लोक ठार झाले. जखमी झाले. हात, पाय, मुंडकीं गडाच्या पावलांवर तुटून पडलीं.[२] काळ्या खडकावर तांबडालाल शिडकावा पडला. मावळ्यांच्या हल्ल्यापुढे मसूदचा टिकाव लागेना. वास्तविक त्याच्या फौजेंत असंख्य शूर हबशी हशम होते.[२] धिप्पाड हबशी आणि चपळ मावळे कडाक्याने झुंजले. जणू ग्रहगोलांची टक्करच! मसूदचे ग्रह फिरले! अतोनात प्रयत्न करूनहि यश येईना. मसूद फार खिन्न झाला. मराठ्यांच्या तोंडावर उभें राहाणेंहि अशक्य झालें. त्याने हवालदिल होऊन माघार घेतली. नुसती माघार नाही,–पलायन![२] सूर्यरावहि पळाला! जसवंतरावहि पळाला!

मोठ्या दुःखी मनाने मसूद पन्हाळ्याकडे निघाला. शिवाजी भोसल्याने केलेला पराभव आणि शिवाजी 'न्हाव्याने' केलेली फजिती त्याच्या उरांत ठणकत होती.

सिद्दी जौहर मोठ्या आशेने आपल्या शूर जावयाची वाट पाहात होता. शिवाजी मसूदच्या हातीं लागेल ही आशा त्याला होती. पण तीहि निराशा झाली. मसूद लाजेने मान खाली घालून आला. जौहरला फार वाईट वाटलें. साडेचार महिने केलेले वेढ्याचे कष्ट केवळ एका रात्रीच्या गाफीलपणाने साफ वाया गेले. आता पश्चात्ताप करून कांहीहि उपयोग नव्हता. मसूदला जिवंत परत आलेला पाहूनच

जौहरला हायसें वाटलें ! कारण शिवाजीशीं झुंजायला जाणारा माणूस परत सुखरूप बचावून येणें मुश्कील असतें, हें त्याला ठाऊक होतें.[३]

शिवाजी पळून गेल्याची वातमी समजल्यावर बादशाह काय म्हणेल, दरबार काय म्हणेल, जग काय म्हणेल, आपला उपहास करील काय, हीच चिंता जौहरला लागून राहिली.[४] आपण इमानदारीने वागलों, कष्ट केले, एवढें तरी बादशाह मानील का ? की, तो आपल्यालाच बेइमान ठरवील ? तो दुर्दैवी जौहर या चिंतेंत बुडून गेला.


तरीपण पन्हाळगड जिंकून घ्यायचाच असा निश्चय त्याने केला.

याच वेळीं नवाब शाइस्तेखान चाकणच्या किल्ल्याला वेढा घालून बसलेला होता. तोहि अहोरात्र अविश्रांत धडपड करीत होता चाकण जिंकण्यासाठी. पण किल्ला काबीज होण्याचीं अजून तरी कांहीहि चिन्हें दिसत नव्हतीं. मराठ्यांच्या हातून मोंगलाचीं माणसें मात्र रोज मरत होतीं. अजून किती दिवस वेढा घालून बसावें लागणार आहे, याचा शाइस्तेखानाला अंदाजच येत नव्हता.

सिद्दी मसूद, सूर्यराव सुर्वे आणि जसवंतराव पालवणीकर विशाळगडचा नाद सोडून पळून गेलेले पाहून विशाळगडावर आनंदीआनंद उडाला होता. महाराज वाट पाहात होते बाजींची ! आपल्या सौंगड्यांवर प्राणापलीकडे प्रेम करणाऱ्या महाराजांपुढे दुःखाने गच्च भरलेलें ताट, नियतीने वाढून आणलें. बाजीप्रभु ठार झाल्याची बातमी गडावर आली आणि महाराजांस समजली ! — वज्राघात !

**आधार**:—(१) एकलमी ३९. (२) शिभा २७।२९ ते ४३ (३) शिभा २७।४३. (४) शिभा २७।१७ व १८

लोकमान्य ... ग्रंथसंग्रहालय
क्र. २४४८२ दि.
क्रमांक ८६ नों: दि: १२-
८८७१



REFBK-0009871